पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवचरनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ५ अंक १७ वा । मूल्य : रु. ४० । दिनांक : १ ते १५ मे २०२३

## माझ्या 'संसाराला...

येताना दादा जयंतीला
बुद्धाची मूर्ती आणा मला
मला काही नाही उणे
माझ्या संसाराला...

साडी चोळी घेतली
चार दिसात फाटून गेली
आठवण मूर्तीची
राहील जन्मभरी
माझ्या संसाराला
मला काही नाही उणे
माझ्या संसाराला...

माडी बंगला बांधला
चार दिसात पडून गेला
आठवण बुद्धाची
राहील जन्मभरी
माझ्या संसाराला
मला काही नाही उणे
माझ्या संसाराला...



पाक्षिक समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ५

अंक १७ वा । मूल्य : रु. ४० । दिनांक : १ ते १५ मे २०२३

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com


(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकूर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.


**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट   8888541822


- **जाहिरात विभाग संपर्क**
  ९८२११४४५४०९ / ८८०५१५१४५२

अंकाची वार्षिक वर्गणी ८००/– रुपये फक्त

- **द पीपल्स पोस्ट बँक अकाऊंट डिटेल्स्**

द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

**ऑनलाईन पेमेंटसाठी येथे स्कॅन करावे**

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा



**संपादकीय :** लढला नाहीस तरी चालेल, पण विकला जाऊ नकोस – ३ /लोकशाहीचे जनक, भगवान गौतम बुद्ध – **प्रा. भगवान माने – ५** / प्राथमिक शिक्षणाचा कोसळतोय पाया – **प्रा. डॉ. दिलीप चव्हाण – ११**/ **दिल्ली दरबार :** मोदींच्या कर्तबगारीवर मलिकांचा प्रहार – **विचक्षण बोधे – १४**/ 'मूलभूत रचनेत' आर्थिक समानतेला स्थान का नाही? – **१७ – प्रा.एच.एम. देसरडा** / **रेशीम आणि किडे :** मलिक, मालिक आणि हतबल राजा – **संजय पवार – १९** / विचार अभिव्यक्ती, विवादाचे स्वातंत्र्य – **बी.जी. वाघ – २२** / भटक्या विमुक्त जमाती : लोकशाही आणि भारतीय संविधान – **प्रा. सुनील अनवले – २५** / शत्रू ओळखण्यातच ओबीसींचे हित – **धनाजी गुरव – २७** / दलित-आंबेडकरी चळवळ आणि संघाचे आव्हान – **सुरेश सावंत – २९** / उत्क्रांतीवादात मानवतावादाची बिजे : अभ्यासक्रमातून वगळणे म्हणजे अंधार युगाला आमंत्रण! – **प्रा. जयप्रकाश म्हात्रे – ३२** / **पंढरपूर संमेलनातील मांडणी :** २०२४ : राज्य संविधानाचे, की मनुस्मृतीचे? – **उल्का महाजन – ३४** / **ग्रंथ परिचय :** भारतीय मूलतत्त्ववाद्यांचा नवा प्रयोग : हिंदू गोर बंजाऱ्यांचा कुंभमेळा – **प्रभू राजगडकर – ३६** / **कोणता भारत : ३८ – तात्या विंचू** – बुद्धाच्या एका मूर्तीसाठी व्याकूळ झालेली बुद्धिस्ट महिला । देव देव खेळू या डार्विन, डार्विन मारू या... । त्र्यंबकला देवीच्या दारांत होणारा पंगत भेद संपला / **कविता बुद्धांच्या : – ४१ –** बुद्धाची ज्ञानगंगा – **सौ. लता कांबळे** । मार्गदाता – **अनिकेत काशीद** । अहंकाराचा संहार – **प्रा. नागार्जुन वाडेकर** । शरण बुद्धाला आलो – **प्रा. डॉ. आनंद रत्नाकर अहिरे** । बुद्ध करूणासागरा – **प्रा. निशांत गुरू** । 'त्रिवार वंदन तथागता' – **करूणा वाडेकर.**



हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक चेतन भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

संपादकीय

# लढला नाहीस तरी चालेल, पण विकला जाऊ नकोस

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती म्हणजे जगाच्या दृष्टीने एक मोठा कुतुहलाचा विषय बनला आहे. दिवसेंदिवस हे कुतुहल वाढतच जाते आहे. जगाच्या पाठीवर महिनाभर जयंती साजरी होते ती बाबासाहेबांचीच. झोपडपट्टीपासून युनोपर्यंत, काळ्यापासून गोऱ्यांपर्यंत, पाड्यापासून वाड्यापर्यंत ती व्यापक होत निघाली आहे. पूर्वी तो एखादा समारंभ वाटायचा. पण आता तो समूह जीवनाचा भाग बनतो आहे. वेगवेगळ्या अंगांनी तिला महत्त्व प्राप्त होत आहे. एखाद्या धार्मिक उत्सवापेक्षा ही जयंती विराट होते आहे आणि कर्मकांडाऐवजी आनंदावर आणि विचार जागरावर उभी राहू पाहते आहे. काही मध्यम, उच्च मध्यमवर्गीय, उच्चभ्रू तिच्यातील नृत्याकडे, गाण्याकडे नाक मुरडून बघत असले, तरी ते काही खरे नाही. त्यात अकारण द्वेषच अधिक दिसतो. एक तर ही जयंती बाबासाहेबांच्या हयातीतच चालू झाली. आपल्या हयातीतच ते भीमरावचे बाबासाहेब झाले. जय भीमचा नारा झाले. महाक्रांतिकारक आणि राष्ट्रपुरुषही बनले. एकूणच समाजासाठी, देशासाठी त्यांचे सारे जीवन ऊर्जाकेंद्र बनले. अखंड उजेड देत महासागरात चुकल्यामाकल्यांना उजेड देणारे दीपस्तंभ बनले. कोट्यवधी कुळांचा उद्धार झाला होता आणि त्यातून एक नवा माणूस आणि त्याचा समाज जन्माला आला होता. इतिहासाच्या कोणत्याही पानावर बाबासाहेबांनी केलेला महासंग्राम दिसणार नाही.




ही जयंती म्हणजे महासंग्रामाला काळजाच्या देठापासून केलेला जय भीम असतो. प्रत्येक वेळेला ही जयंती काही वैशिष्ट्ये तयार करते. कधी हे वैशिष्ट्य प्रचंड गर्दीत असते, कधी वाद्यात, कधी भव्यतेत, कधी विस्तारात तर कधी अर्थिक उलाढालीतही असते. बाबासाहेबांनी दीक्षा घेतल्यानंतर त्यांच्या समाजातील देवदेवता आणि त्यांचे उत्सव हद्दपार झाले. सांस्कृतिक क्षेत्र उजळवण्यासाठी या समाजाकडे महत्त्वाचे वाटावेत, गाजवावेत असे दोनच दिवस उरले. एक भीम जयंती आणि दुसरी बुद्ध जयंती. हिंदू धर्माने समाजात रोज दोन-चार वाटावेत असे उत्सव पेरले आहेत. त्यातून सुटका करून घेतलेला समाज भीम जयंती, बुद्ध जयंती, म. फुले जयंती, राजर्षी शाहू महाराजांची जयंती आदी समाज सुधारकांकडे वळला. त्यातही भीम जयंती कळसावर पोहोचली आणि खातीही विस्तारत गेली.

भीम जयंती सर्वांत गाजते ती तळातल्या निळ्या लेकरांमध्ये. त्यांच्या नसानसात भीम विरघळला आहे. रोज जगण्याच्या विवंचनेत असलेल्या या वर्गाला एकच साहेब तो बाबासाहेब वाटतो. जय भीमचा तो जोरात नारा देतो, तेव्हा आसमंत थरारतो. त्याच्या वाद्यावर भोवताल थरारतो, त्याच्या गाण्यावर दिवस आणि रात्र ठेका धरायला लागतात. तो बेभान होऊन नाचतो, गातो, घोषणा देतो. त्याची जयंती सिनेमा आणि बुकाचा विषय बनते. त्यांच्यातला नवमध्यमवर्ग मात्र बिचकत बिचकत हे सारं करतो. खालचा वर्ग बाबासाहेबांचे गगनचुंबी होर्डिंग उभा करतो. वरचा वर्ग, त्यातही जास्त शिकलेला नवश्रीमंत झालेला वर्ग मोबाईलच्या स्टेट्सवर बाबासाहेबांना ठेवतो. स्क्रीनवर ठेवतो. आलिशान सोसायटीसमोर वॉचमनच्या मदतीने तोही होर्डिंग उभा करतोय. त्याची समृद्धी, त्याचे वर्गांतर त्याला मोकळठाकळं होऊ देत नाही. कॉलनीत असं व्यक्त होणं त्याला अडचणीचे वाटते. तो 'जय भीम' या बुलंद नाऱ्याचं संक्षिप्तीकरण करतो. अनेकदा जय भीम ऐवजी 'जेबी' म्हणतो. तो युद्धात अपवादानेच उतरतो.

तळातल्यांनी ही युद्धे आपल्या अंगाखांद्यावर घेतलेली असतात. हा एखादी कविता लिहून व्हॉट्सॲपवर चालवतो आणि हा तळातला 'तू खातोस त्या भाकरीवर बाबासाहेबांची सही हाय रं' हे गाणं तुफान गर्दी करून ऐकतो, 'जय भीम वाली पोरं' ऐकतो आणि भगताचं 'बाहेर ये पुतळ्यातून' हे गाणंही ऐकतो. रात्री बारा वाजता आपापल्या शहरातील बाबासाहेबांच्या पुतळ्याजवळ शक्तीप्रदर्शन करतो. श्रद्धा आणि भक्ती प्रदर्शन करतो. ती त्याच्या जगण्याची आणि मनाची गरज बनलेली असते. काही असो; पण मिरवणूक धडाक्यात निघाली पाहिजे, वातावरण बिलकुल निळे झाले पाहिजे असा त्याचा अट्टहास असतो. होर्डिंगवरची त्याची भाषा वेगळी, बोली वेगळी असते. या भाषेत त्याचं समाजकारण, राजकारण, अर्थकारण आणि अर्थातच प्रचंड भीम स्तुती असते. 'एकच साहेब बाबासाहेब' ही घोषणा त्यांनीच काढली आणि बाकीचे आपले उच्चभ्रू कसे आहेत याकडे अंगुलीनिर्देष केला. एका भीमामुळे कोट्यवधी कुळांचा उद्धार कसा होतो, हे गाऊन सांगितले. यंदाच्या मिरवणुकीतही रिक्षाच्या टपावर, होर्डिंगवर असंच एक राजकीय विधान दिसलं.

आंबेडकरी समाजाच्या राजकारणाचे चित्र कसे आहे, यावर भाष्य करणे क्लेषदायक आहे. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणालाच चरित्रकार खैरमोडे यांना एक वाक्य सुचलं होतं. ते बाबासाहेबांच्या अकराव्या किंवा बाराव्या चरित्रखंडात आहे. 'जेव्हा सूर्यास्त होतो, तेव्हा काजव्यांचे राज्य सुरू होते' हे ते वाक्य आज आपण अनुभवत आहोत. बाबासाहेबांनंतर खूप लवकर असे काजवे तयार झाले. प्रत्येकाची छावणी वेगळी आणि लुकलुकणारा उजेड वेगळा आहे. ज्या अन्यायकारी, मूलतत्त्ववादी व्यवस्थेविरूद्ध लढण्यास या साऱ्यांनी शिकवले आणि स्वतःही लढले, तेच बहुतेक जण या व्यवस्थेत आतून-बाहेरून गेले. रमाबाई नगर दंगलीच्या वेळी या सर्वांनी कोणाविरुद्ध भाषणे केली होती आणि आज हे कुणाबरोबर आहेत, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. भाजप, शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस या साऱ्या पक्षांत त्यांनी संसार मांडला आहे. कुणाला दिवा मिळालाय तर कुणाला मिळायचा आहे. साध्या शब्दात दुष्मनाशी मैत्री त्यांनी केली आहे आणि त्याला ते सत्ताकारण, तडजोडीचं राजकारण असं नाव देत आहेत. हे सारं करताना ते कधी जनतेला विश्वासात घेत नाहीत. एका रात्रीत ते छावण्या बदलू शकतात. इथं राजकारणालाही नैतिकता, शील, चारित्र्य असावं लागतं हा बाबासाहेबांचा आग्रह मागं पडतो. मोजता येणार नाहीत एवढे नेते आणि गट-तट तयार झाले. जनता शांत. तिचा काही राजकीय-सामाजिक दबाव नाहीय. तरीही त्यातून ती भीम जयंतीला व्यक्त होण्याचा प्रयत्न करते आणि त्यातूनच 'लढला नाहीस तरी चालेल, पण विकला जाऊ नकोस' असं एक आवाहन आणि आव्हानही बाहेर पडतं. कुठं तरी विक्री चालू आहे, कुणी तरी विकलं जातंय, तीच राजकीय संस्कृती बनते आहे हे तळातल्या निळ्या पाखरांनाही कळलं असणार. तसं तर भीमाची लेकरं हुशार, चतूर, प्रतिभावंत असतातच. वरच्यांनाही कळत असते, त्यांचे राजकारण विचारांकडून व्यवहाराकडे सरकलेले असते. मग हा राजकीय व्यवहार कोणाशीही होत असतो. राजकारणाला विचारांशी काही देणेघेणे नसावे. काहीही करून सत्तेत जा एवढेच शिल्लक राहतात. सत्ता किती महत्त्वाची असते




हे बाबासाहेबांइतके कुणी सांगितले नसावे, हेही खरे आहे. प्रश्न असतो तो कसं आणि कोणत्या मार्गानं जायचं. हिंदू कोड बिलाला विरोध झाला म्हणून बाबासाहेबांनी मंत्रिपदावर लाथ का मारली होती? अर्थात, याचं उत्तर सर्वांनाच ठाऊक आहे. पण आपल्या वरच्या कारभाऱ्यांना ते पटते; पण पचत नाही. परिणाम असा झाला, की गेली अनेक वर्षे आपला कोणताही गडी स्वबळावर निवडून जाऊ शकत नाही. जिंकण्याऐवजी स्वतःला हरवून कुणाला तरी जिंकून देण्याचं राजकारण सुरू झालं. त्यालाच लढाई म्हणण्याची रीत सुरू झाली. हे तळातल्या जनतेला कळून चुकलं आणि तिनंच मनापासून होर्डिंगवर लिहिलं, की 'भाऊ, बंधू तू लढला नाही तरी चालेल, पण विकला जाऊ नकोस.' विक्रीनंतर काय उरतं दादा? सगळेच गमावतो आपण... विचार, अस्मिता, आत्मसन्मान आणि स्वातंत्र्यसुद्धा. खालच्यांना कळणारी गोष्ट आपल्या कारभाऱ्यांना कळत नसेल असं कोण म्हणणार? २०२४ मध्ये हिंदू राष्ट्र आणणार असं म्हणणाऱ्यांबरोबरही काही जण गेले. हिंदुत्व आमचा प्राण म्हणणाऱ्यांबरोबरही गेले. आम्हीच कडवे हिंदुत्ववादी, आम्हीच मशीद पाडली असे म्हणणाऱ्यांबरोबरही गेले आणि निवडणूक जिंकणारी (आता हरणारी) यंत्रणा बनलेल्या काँग्रेसबरोबरही गेले. हिंदुत्ववादी पुरोगामी की काँग्रेस-राष्ट्रवादी पुरोगामी अशा गणितात दोन्ही काँग्रेसच्या बाजूने कौल दिला. ही वेळ का येते, हा प्रश्न कोणी पुन्हा पुन्हा विचारत नाही आणि तिचं उत्तर असतं आपल्या बेकीतून. ते मान्य केलं तर एवढ्या साऱ्या छावण्या चालत नाहीत आणि स्वतःची छावणी सोडायला कोणी तयार नाही. वैतागलेला समाज नेहमीच वैतागत असतो असंही नाही, तो स्वतःला होर्डिंगवर तर आणतोच; पण तो रस्त्यावरही येत असतो. 'विकला जाऊ नकोस' असे सांगणे कदाचित पूर्वतयारीचे चिन्ह असू शकते.

●●●

# लोकशाहीचे जनक, भगवान गौतम बुद्ध



प्रा. भगवान माने

**आज वैश्विक पातळीवर विविध देशांच्या राजकीय व्यवस्थेत मूलतत्त्ववादी, वंशवादी परस्पर द्वेषाचे राजकारण सुरू आहे. जनतेचे मोर्चे, आंदोलने, आक्रोश सुरू आहे. परस्परांत युद्धामुळे मोठी मनुष्यहानी आणि वित्तहानी होत आहे. जनता आणि राज्यकर्ते अज्ञान आणि अंध:कारातून राज्यकारभाराचा रथ हाकतात. मानवाला कल्याणकारी राज्याचा उपभोग घेता येण्याची परिस्थिती नाही. बुद्धांच्या देशातही जातीय द्वेष, असहिष्णुता आणि दहशतीचे वातावरण दिसते. गरिबी, दारिद्र्य, अज्ञात, सुशासन याकडे लक्ष दिले जात नाही. अशावेळी सर्वांना आणि बुद्धांच्या लोकशाही मार्गाशिवाय पर्याय नाही. बुद्धांनी शांती मानवमुक्तीचा मार्ग सांगितला. तसेच न्याय स्वातंत्र्य, समता, बंधुभावाचा, लोकशाही विचारही सांगितला आहे.**

प्राचीन भारतात राजेशाही अस्तित्वात होती. राज्याची निर्मिती देवाने केली, ही कल्पना वैदिक काळापासून सामाजिक करारातून निर्माण होते. याचा उल्लेख बौद्ध धर्मग्रंथ दिघनिकायमध्ये आढळतो. राज्याच्या उदयासंबंधी आणि राज्याच्या प्रामाण्याविषयी (Legitimacy of state) राज्याच्या उदयाचा दैवी सिद्धांत सामाजिक कराराच्या (The social contract theory) दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. राज्याच्या उदयाच्या दैवी सिद्धांतात राज्याची निर्मिती परमेश्वराने केली आहे. राज्य हे मानवाने निर्माण केले नसून ते ईश्वरी वरदान आहे, असे या सिद्धांताचे मत आहे. राजा हा ईश्वराचा प्रतिनिधी असून त्याच्यामध्ये ईश्वराचा अंश आहे. त्याला पृथ्वीतलावर राज्यकारभार करण्यास पाठविले आहे, असे वैदिक वाङ्मय, ऋग्वेद, ऐतरेय ब्राह्मण शतपथ ब्राह्मण, तैतिरीय ब्राह्मण, तसेच महाभारताच्या शांतिपर्वात दैवी सिद्धांत आणि मनुस्मृतीत अधिक स्पष्ट केले आहे. प्राचीन भारतातील राजांनी सूर्य, चंद्र, राम, कृष्ण अशा देवतांशी संबंध जोडून आपले महत्त्व वाढविले; परंतु राज्याच्या उदयाच्या दैवी सिद्धांताला कोणताही ठोस पुरावा सापडत नाही. हिंदू परंपरेत आजही दैवी सिद्धांत गूढ शक्ती असून त्याचे अनाकलनीय कोडे उघडले नाही. दुसरा सिद्धांत सामाजिक कराराचा सिद्धांत असून समाजव्यवस्था निसर्ग अवस्थेत असताना अराजकता, अस्थिरता होती. या अवस्थेत लोक एकत्रित येऊन त्यांनी सामाजिक करारातून राज्य निर्माण केले. त्यांनी सामाजिक कराराने १६ व्या शतकापासून ते १८ व्या शतकापर्यंत हॉब्ज, लॉक



आणि रूसो या विचारवंतांनी सामाजिक करार सिद्धांताचा पुरस्कार केला. बौद्ध वाङ्मय, दिघनिकाय जातक कथामध्ये सामाजिक करारातून राजा निवडल्याचे वर्णन आढळते.

गणराज्यपद्धती इ.स.पूर्व आठव्या शतकात उदयास आली आणि प्राचीन राजकीय गणराज्ये इ.स.चौथ्या शतकापर्यंत अस्तित्वात होती. प्राचीन भारतात ८२ गणराज्ये अस्तित्व टिकवून होती.

प्राचीन भारतीय राजसत्ता आणि तत्कालीन पाश्चात्य राजसत्ता यामध्ये महत्त्वाचा फरक दिसून येतो. प्राचीन ग्रीक राज्ये ही एकेक शहर राज्ये होती आणि त्यांचा कारभार सिनेटर्स, पाच ते सहा मुख्य घराण्याचे वयोवृद्ध व निवडलेल्या राज्यांकडून पाहिला जात असे. भारततही अशा प्रकारची प्रजासत्ताक किंवा गणराज्ये होती.

डॉ.के.पी. जयस्वाल यांच्या मते, गणराज्ये आर्थिक आणि लष्करीदृष्ट्या कमकुवत झाल्यामुळे त्यांचे अस्तित्व धोक्यात आले होते. बौद्ध वाङ्मयात आदर्श गणराज्याची लक्षणे सांगितली आहेत. गणराज्यांच्या दुहीमुळे गणराज्ये नष्ट झाली. अजातशत्रूने हेरामार्फत लिच्छवी गणराज्यात फूट पाडून त्यास पराभूत केले. मगधच्या राजाने वज्जी गणराज्यावर आक्रमण केले तेव्हा बुद्धांनी आदर्श गणराज्याची लक्षणे सांगून निर्माण होणारे धोके टाळण्याचे उपाय सांगितले होते.

**आधुनिक राज्यांचा उदय**

राजकीय तत्त्वज्ञानात राजकीय विचार आणि राजकीय सिद्धांताचा अभ्यास केला जातो; परंतु व्यावहारिकदृष्ट्या राजकीय सिद्धांताचा

मानवी कल्याणासाठी किती उपयोग होतो, हे महत्त्वाचे आहे. हजारो वर्षांपासून राज्याचा विकास विविध टप्प्यांत झाला. त्यामध्ये पौर्वात्य साम्राज्य (The Oriental Empires), ग्रीक नगर राज्यात अथेन्स, स्पार्टा, कोरीन्य, अरगॉस, थीपस राज्ये होती. रोमन साम्राज्याचा (Roman Emire) इ.स. ५१० मध्ये अस्त होऊन गणराज्ये स्थापन झाली. तसेच सरंजामी राजांना जनतेने विरोध केल्यामुळे सरंजामशाही नष्ट झाली आणि युरोपमधील धार्मिक सुधारणा, ज्ञानाच्या पुनरुज्जीवन चळवळीमुळे आधुनिक राज्यांचा उदय झाला.

बुद्धांनी इ.स.पूर्व ६ व्या शतकात चार्तुर्वर्ण्य व्यवस्थेविरुद्ध प्रतिक्रांती करून समतेचा पुरस्कार केला. आपल्या देशात अस्पृश्यता, उच्चनीचता, जातीव्यवस्था घट्ट होऊ लागली, तेव्हा आपल्या राष्ट्राचे कर्तृत्व नष्ट झाले. इ.स. ५०० वर्षांपूर्वी जैन आणि बौद्ध धम्माच्या प्रभावामुळे भारतात सम्राट अशोकासारखा सर्वधर्मसमभावाचा पुरस्कार करणारा पहिला सम्राट उदयास आला. दुर्दैवाने नंतरच्या काळात अस्पृश्यता, जातीव्यवस्था, विषम समाजरचना जाती-पोटजातीमुळे समाजाची विभागणी झाली. या काळात शकांनी आक्रमण करून देशाला पराभूत केले.

बुद्धांनी जगाला मानवतेचा संदेश देऊन मानवाच्या दुःखमुक्तीचा मार्ग दाखविला. सत्य, अहिंसेची महान शिकवण दिली. बुद्धांनी काम, क्रोध, माया, मत्सर, द्वेष, तृष्णा, आसक्ती, स्वार्थ या षड्रिपूंवर विजय मिळविला. बुद्ध धम्माबरोबर जगाला कल्याणकारी राज्याचा सिद्धांत सांगितला. राज्यकारभार करताना निती महत्त्वाची असून निती हेच धम्माचे सार आहे. त्याशिवाय धम्म नाही. धम्मात माणसाने माणसावर प्रेम केले पाहिजे. आज्ञांची आवश्यकता नाही. देवाला संतुष्ट करण्यासाठी माणसाने नीतिमान व्हायचे नाही, तर स्वहितासाठीच माणसाने माणसावर प्रेम केले पाहिजे. पाश्चिमात्य तत्वज्ञ प्लेटो, ॲरिस्टॉटल, रूसो, व्हॉल्टेअर आदींनी राज्याच्या उदयाचे सिद्धांत मांडले. काहींनी ईश्वरवादी सिद्धांताचा पुरस्कार केला; परंतु बुद्धांनी आपल्या तत्त्वज्ञानात अखिल मानवाचे कल्याण, लोकशाही, गणराज्य, संसदीय शासनाचे तत्त्वज्ञान मांडले.

बुद्धाच्या तत्त्वज्ञानाने ब्राह्मणवाद केंद्रित मानून त्यापुढे आव्हान उभे केले. ब्राह्मणवादाला आव्हान देणारे बुद्ध हे पहिले महापुरूष होत. ब्राह्मणवादाने विषम सामाजिक आणि धार्मिक रचनेला सुरुवात केली होती. बुद्धांना जाणीव झाली, की समाजातील काही घटकांना धार्मिक हुकुमशाहीला बळी पडावे लागत असून एका विशिष्ट समूहाकडून उर्वरित समाजावर वर्चस्व निर्माण केले जात आहे. ब्राह्मण लोक परमेश्वर किंवा ईश्वरामधील दुवा असल्याचे ठासवून सांगत होते. ब्राह्मणवादातून असा एक धार्मिक प्रवाह निर्माण केला जात होता, की ज्यामुळे सामान्य माणूस ब्राह्मणी हितासाठी राबेल, त्याची सेवा करील. बुद्धांचे तत्त्वज्ञान हिंदू किंवा वैदिक केंद्रीकरणाच्या पूर्णत: विरोधी होते. मनूच्या पौर्वात्य वर्णवर्चस्वी त्यांनी विचाराला विरोध केला. तसेच प्राचीन ग्रीक विचारवंतांच्या वर्गीय राजकीय नितीला आणि न्यायाच्या विरोधी तत्त्वज्ञान मांडले आहे. बुद्ध पूर्वकाळातील वैदिक वाङ्मयाचे संहिता, ब्राह्मणे, उपनिषदे, सामवेद आणि अथर्ववेदाचा समावेश होतो. वैदिक वाङ्मयाचा कालखंड इ.स.पूर्व तीन हजार ते इ.स.पूर्व सहाशे असा आहे. यामधून वैदिक देव-देवता, त्यांच्या विधी पूजा-अर्चा, यज्ञांची माहिती मिळते.

## बौद्ध तत्त्वज्ञानाचे मूळ :

सुखात जीवन कंठणाऱ्या सिद्धार्थाला राजधानीतून फेरफटका करताना एक जर्जर म्हातारा, एक महारोगी व एक प्रेत यांचे दर्शन घडले. तेव्हा जीवनातील दुःखाची त्यास प्रथम कल्पना आली आणि त्यांनी परिव्रजा घेतली, असे पारंपारिक बुद्ध चरित्रात सांगितले आहे. डॉ. आंबेडकरांना हे मान्य नव्हते. शाक्य आणि कोलीय या दोन जमातींमध्ये रोहिणी नदीच्या पाण्यावरून झालेला तंटा सोडविण्यासाठी युद्धाचा मार्ग स्वीकारण्यास सिद्धार्थाचा विरोध होता; परंतु शाक्य संघातील बहुसंख्य सभासदांनी लढाईचा निर्णय घेतला. या युद्धात सामील होण्यास बुद्धांनी नकार दिला. या गुन्ह्याबद्दल मृत्यूची किंवा हद्दपारीची शिक्षा देण्यात येत असे; परंतु कोसल देशाच्या राज्याच्या संमतीवाचून ही शिक्षा देण्याचा शाक्य संघाला अधिकार नव्हता. हा तिढा सोडविण्यासाठी सिद्धार्थाने स्वेच्छेने परिव्रजा घेतली, असे आंबेडकरांनी 'बुद्ध आणि धम्म' या ग्रंथात प्रतिपादन केले आहे. जगात दुःख आहे ही बौद्ध धर्मातील एक मूलभूत संकल्पना आहे.

जुन्या परंपरेप्रमाणे जन्म, जरा, व्याधी आणि मृत्यू ही दुःखाची कारणे मानली जातात; पण जन्म हेच जर दुःखाचे कारण मानले, तर कोणताही धर्म किंवा तत्त्वज्ञान या जगात माणसाला सुख मिळवून देऊ शकणार नाही. जरा, व्याधी आणि मृत्यू ही दुःखाची कारणे असली तरी ती नैसर्गिक आहेत. वर्गावर्गातील कलह हेच सामाजिक दुःखाचे मूळ कारण होय. सामाजिक अन्याय, विषमता आणि संघर्ष यांमधून दुःखाचा उद्भव होतो, ही कारणे नष्ट करण्याचा मार्ग बुद्धाने दाखवून दिला आहे. असा बाबासाहेबांनी बुद्धांच्या शिकवणुकीचा अर्थ सांगितला आहे.

गौतम बुद्धांनी आपले पहिले भाषण हे 'हरिण बागेत' दिले. त्यानंतर त्यांची नियमित शिकवणूक सुरू झाली. यातूनच त्यांनी संघाच्या स्थापनेला सुरुवात करून त्यांनी आपली 'तत्त्वे जी अष्टांगमार्ग म्हणून प्रसिद्ध झालीत, ती अशी- योग्य विचार, योग्य इच्छा, योग्य- भाषण, योग्य- वर्तन, योग्य उपजीविकेची साधने, योग्य अष्टांग मार्गाच्या तत्त्वांमध्ये बुद्धांच्या तत्त्वज्ञानाची मुळे आहेत. कोसंबी डी.डी. यांच्या मते, ही आठ तत्त्वेच बुद्धांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा आहेत.'

### बुद्धांचे राज्यविषयक तत्त्वज्ञान :

बौद्ध वाङ्मय पाली भाषेत असून त्यामध्ये सुत्त, धम्म आणि विनय या त्रिपिटकांचा, दीपवंश, महावंश, दिव्यावदान मिलिंद पन्ह, बौद्ध चरित्र धम्मपद आणि जातककथांचा समावेश होतो. 'दिघनिकाय' ग्रंथात बुद्धांची शिकवण असून समाज, राज्य आणि राजपद (Kingship) यासंबंधीचे विचार मांडलेले आहेत.

प्राचीन भारतीय राजसत्ता आणि पाश्चिमात्य राज्यसत्तात मूलभूत फरक आहे. प्राचीन ग्रीक राज्यात एकेक शहर राज्ये होती आणि

त्यांचा कारभार सिनेटर्स किंवा पाच ते सहा वयोवृद्ध लोकांकडून पाहिला जात असे. इंड्सव्हली समाज समूहातून भारतीय उपखंडात अशी शहर राज्ये असल्याचे दर्शविले जाते. भारतीय राज्यसत्ता जमातींच्या प्रजासत्ताक स्वरूपाकडून गणसंघ म्हणून अस्तित्वात आल्या आणि ही राज्ये जनपद अवस्थेनंतर मगध साम्राज्यात रूपांतरित झाली. पाश्चिमात्य गणराज्ये आणि भारतीय गणराज्यांचा विचार करता पाश्चिमात्य राष्ट्रात राज्यसत्तांची उत्क्रांती झाली. त्यानंतर त्यांचे रूपांतर उच्च दर्जाच्या रचनात्मक राजसत्तेत झाले. त्यांच्या उत्पत्ती आणि स्वरूपाच्या चर्चेला ग्रीकमधील राजसत्ता ग्रीकांच्या राज्यसत्ता पूर्वीच्या आहेत. बुद्ध तत्त्वज्ञानाची राजकीय चिकित्सा करताना ब्राह्मणवादाचा विचार करणे महत्त्वाचे ठरते. ब्राह्मणवादाने शतकानुशतके आत्मा, कर्म यांसंबंधी विचार केला. मात्र बुद्ध तत्त्वज्ञानाने वैदिक आदिभौतिक संकल्पनांचा त्याग करून प्रत्येक घटनेचा कार्यकारणसंबंध तपासला. प्रत्येक रचना आणि संस्थेचा मानवी कल्याणासाठी कसा उपयोग करता येईल, याचा विचार केला.

**राज्यसत्तेचे ब्राह्मणवादी आणि बुद्धांचे तत्त्वज्ञान :**

राज्यसत्तेबाबतचे ब्राह्मणवादी विचार आणि बुद्धांचे विचार हे परस्परविरोधी विचारप्रवाह आहेत. ब्राह्मणवादी विचारप्रवाहाने तत्कालिन आदिवासी जमातीची लोकशाहीवादी राज्ये नष्ट करण्याचा प्रयत्न केला. बुद्धाने वज्जीयन राज्याला राज्यकारभाराचे स्वातंत्र्य बहाल केले होते; परंतु अजातशत्रूने वज्जीयन जमातीचे संघराज्य स्वतःच्या राज्यात समाविष्ट करण्याचा कट रचला होता. त्यास बुद्धांनी विरोध केला होता. साम्राज्यवादी लालसेने आणि ब्राह्मणवादी विचार प्रवाहामुळे अजातशत्रूने वज्जीयन जमातींच्या जीवनशैलीचा विचार न करता वज्जीयन राज्य स्वतःच्या राज्याशी जोडून त्याचे साम्राज्य बनविले. त्याला स्वतःच्या महत्त्वाकांक्षेपुढे वज्जीयन लोकांची मते क्षुल्लक वाटली. अजातशत्रू 'वज्जीयन'संबंधी म्हणतो, की ''वज्जीयन कितीही दूर असले तरी मी त्यांच्यावर हल्ला करून या वज्जीयन जमातीला समूळ उखडून टाकेन, मी त्यांचा सर्वनाश करेन, मी या वज्जीयन जमातीला संपूर्ण उद्ध्वस्त करेन'' म्हणून कडव्या हिंदू राष्ट्रवाद्यांना अजातशत्रू महानायक वाटतो, हिंदूचा आदर्श राजा म्हणून प्रतिमा उंचावण्याचा प्रयत्न केला जातो. एक शक्तिशाली प्रतीक म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते. कारण त्याने वज्जीयन जमातीची संघराज्ये नष्ट केली होती. वास्तविक, बुद्धांनी वज्जीयन संघराज्याचे कौतुक केले होते. ही संघराज्ये टिकून रहावीत, असे त्यांना वाटे.

**वज्जीयन जमातीला बुद्धांचा उपदेश :**

बुद्धांना वज्जीयन लोकांविषयी प्रथम जाणून घ्यायचे होते, की या जमातीच्या संघराज्यात नियमित स्वरूपात लोकसभा घेऊन त्यामध्ये मोकळी, खुली चर्चा होईल की नाही? लोकशाही प्रणालीचे या लोकांकडून सन्मान आणि संरक्षण केले जाईल का? वज्जीयन जमात साधू-संतांचा सन्मान करीत होते का? परदेशी लोकांना आश्रय देतात का? या सर्व प्रश्नांसंबंधी जेव्हा आनंदने सांगितले, की होय या संघराज्यांनी बुद्धांनी अपेक्षा केलेल्या सर्व तत्त्वांचे पालन करीत आहेत. सर्व उत्तम परंपरांचे मनोमन पालन करीत आहेत. तेव्हा बुद्धांनी ठरविले, की वज्जीयन जमातीला केवळ विनाशापासून वाचवायचे नाही, तर त्यांना त्यांची प्रगती व्हावी यासाठी सहकार्य करायचे. यासंबंधी के.पी. जयस्वाल असे म्हणतात, ''बुध्दाने आपल्या भिक्खू संघाची सभागृहात सभा बोलविली आणि त्यांना समाजकल्याणाच्या अनेक गोष्टी सांगितल्या.''

**एका तांदळाची गोष्ट आणि सत्तेचा उदय :**

हिंदू सिद्धांताच्या उलट बुद्धांनी आपला कार्यकारणभाव सिद्धांत मांडला आहे. बुद्धांच्या मते, निसर्गाच्या कारभारामध्ये सर्व वस्तू सर्वांशी सलोख्याने वागतात. माणूस दुसऱ्या माणसांशी सहकार्याने वागतो. मात्र जेव्हा गरजेच्या वस्तू उदा. अन्न, पाणी यांची कमतरता जाणवते तेव्हा तो इतरांशी स्पर्धा, ईर्ष्या करू लागतो. स्वतंत्र अस्तित्वाचे जीवन स्वीकारण्यामागील ही जी फारकत आहे, त्यालाच निसर्गाचे शासन असे म्हटले असावे. याचे वर्णन दुलावाच्या तिसऱ्या खंडामध्ये आले असून 'दिघनिकाय'मध्ये ते दिसून येते. बुद्धांनी मोग्गलमच्या विनंतीनुसार जगाची नवनिर्मिती आणि प्राचीन लोकांच्या वसाहतीबाबतचे वर्णन केले आहे. पाचव्या खंडात हीच कथा बुद्धांनी स्वतः भिक्खूंना सांगितल्याचे म्हटले आहे. ''जेव्हा लोकांना संध्याकाळी खाण्यासाठी किंवा सकाळच्या खाण्यासाठी तांदूळ हवे असत, तेव्हा आवश्यक ते तांदूळ मिळविण्यासाठी ते बाहेर पडत आणि तांदूळ मिळवित; परंतु त्यांच्यातील आळशी माणूस मात्र एकदाच सकाळ आणि संध्याकाळसाठीचे पुरेसे तांदूळ तो घ्यायचा. तेव्हा दुसऱ्या एकाने त्याला विचारले, चल आपण तांदूळ आणायला जाऊ, तेव्हा तो म्हणाला, तुझ्यासाठीचे तांदूळ घेऊन ये, मी अगोदरच दोन्ही वेळचे घेऊन आलोय. तेव्हा दुसरा उत्तरला व्वा, हे तर फार छान झाले. तुझे भांडवल चांगलेच म्हणायचे, मीसुद्धा आता एकाचवेळी दोन, तीन, सात दिवस पुरेल एवढे तांदूळ आणून ठेवेन आणि त्याचप्रमाणे त्याने केले.'' त्यानंतर असे घडले, की दुसरा एक माणूस त्याला म्हणाला, चल आपण तांदूळ घेऊन येऊ, मात्र माणूस त्याला म्हणाला, तू तुझ्यासाठी तांदूळ घेऊन ये, मी एकदाच आठवडाभराचे तांदूळ घेऊन आलोय. छान, तो दुसरा म्हणाला, मी पंधरवड्यासाठी पुरेसे तांदूळ घेऊन येतो. कदाचित महिनाभर पुरतील एवढेही घेऊन येईन आणि त्याप्रमाणे त्याने पुरेसे तांदूळ आणले.

घटनांचे उत्तम आकलन कसे होते, याचे ही कथा उत्तम उदाहरण आहे. या कथेतून माणूस कसा इतरांशी करारबद्ध प्रणालीमध्ये अडकला आणि अधिकारी व्यक्तींचा किंवा सत्तेचा कसा उदय झाला, हे दिसून येते. या कथेत तांदूळ हा पदार्थ सांकेतिक असला, तरी त्यातून बुद्धांच्या तार्किकतेबाबत महत्त्वाचे दिग्दर्शन होते.

बुद्धांच्या मते, संस्था स्वरूपात संपत्ती निर्माण करण्याच्या करारामध्ये मानवाने पहिल्यांदा करार केला आणि राज्य किंवा सार्वभौम सत्ता स्थापण्याच्या प्रक्रियेतील माणसाचे हे पहिले पाऊल होते. निसर्गाच्या सत्तेला वास्तविक जे टिकवून ठेवायला हवे होते, ते माणसाने संपविले आणि साधन संपत्तीच्या संस्थेमध्ये राहण्यास त्याला भाग पडले, याचे माणसाला दुःख झाले. बुद्धांनी सांगितलेल्या माणसाचा हा पहिला करार आपल्याला बायबलमधील लॉकच्या पहिल्या कराराची आठवण करून देतो. लॉकच्या सांगण्याप्रमाणे, निसर्गसत्तेतील माणसाने स्वयंस्फूर्तीने स्वतःला

बंदिस्त जीवनाचा स्वीकार केला. स्वत: माणूस समूहजीवनात राहण्यास सहमत झाला आणि त्याने अशा समूहांना अंगिकारले, जेणेकरून सर्वांना सुखकारक, सुरक्षित आणि शांततामय जीवन जगणे शक्य झाले. विशेषत: त्याला स्वतःच्या संपत्तीचे रक्षण करून त्याचा उपभोग घेता आला आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे वर उल्लेख न झालेल्या एका उच्चतम सुरक्षिततेचाही अनुभव घेता आला. लॉक जरी या कराराला 'सामाजिक करार' म्हणत असला, तरी एक संस्थात्मक अशा प्रकारची सांपत्तिक सुरक्षिततेची निर्मिती आणि रक्षणासाठीची ही सहमती होती. बुद्धाच्या या अगोदर सांगितलेल्या तांदळाच्या गोष्टीनंतर असे झाले, की एकाने दुसऱ्याचे तांदूळ घेतले. त्या दुसऱ्यांनी त्याला तसे करताना पाहिले. त्यांनी विचारले, दुसऱ्याचे तांदूळ त्यांच्या परवानगीशिवाय का घेतलेस, आपले स्वतःचे असल्यासारखे? तू पुन्हा असे करू नकोस. त्याने हे न ऐकता पुनःपुन्हा अशाच प्रकारे तांदूळ घेतले. पुन्हा जेव्हा इतरांनी त्याला पाहिले तेव्हा त्याला पकडले आणि सर्वांनी त्याच्याभोवती गोंधळ करीत बोलले, 'महाशय, ही व्यक्ती दुसऱ्यांची परवानगी न घेता त्यांचे तांदूळ घेते, हा अपराध आहे. मग ते त्याला उद्देशून म्हणाले, ''तू असे दुसऱ्याच्या परवानगीशिवाय तांदूळ का घेतलेस? तू आता जा. पण यापुढे पुन्हा प्रमाद करू नकोस; परंतु तो तांदूळ चोर सर्वांना उद्देशून म्हणाला, ''महाशय या लोकांनी मला पकडून जबरदस्ती करून अशा प्रकारे या सभेत घेऊन आले. तेव्हा थोड्याशा तांदळाच्या निमित्ताने'' यातून संस्था स्वरूपाचा करार आणि राज्य स्थापन्याचा, एकत्र येण्याचा उद्देश स्पष्ट होतो.



बुद्ध राजकीय तत्त्वज्ञानी होते. त्यांचा पद्धती आणि तार्किकतेच्या दृष्टीने विचार करता, राजसत्तेच्या उगमासंबंधी बुद्धांनी मांडलेला सिद्धांत हा वैदिक (ब्राह्मणी) सिद्धांतापेक्षा अधिक बुद्धीप्रामाण्यवादी वाटतो. बुद्धांचा सिद्धांत राजकीयदृष्ट्या शूद्र आणि आदिवासी जनतेच्या लोकशाहीवादी महत्त्वाकांक्षेचे प्रतिनिधीत्व करणारा आहे. ब्राम्हणवादाने दंडनितीवर भर दिलेला होता आणि बुद्धांचा दृष्टिकोन सत्ताधीशांना धम्माने बांधलेला होता. त्यांची सत्ता ही विशिष्ट अटी किंवा धम्म नियमांनी चालते. धम्म नियमांच्या अधीन राहून राजाने प्रजेचे समाधान करावे. बुद्धीच्या करारामध्ये राजाने प्रजेला दंड करावा का, याबाबत कुठेही उल्लेख नसला तरी असे म्हटले आहे, की समूहजीवनात प्रवेश करताना लोकांनी स्वतः असे म्हणावे, की आमच्यापैकी जे दंडनीय असतील त्यांना शिक्षा व्हावी. पण त्याचवेळी जे समाजोपयोगी कार्य करतात, त्यांना सत्ताधीशांनी बक्षिसे द्यावीत. शिक्षेप्रमाणेच करारामध्ये असा कुठेही उल्लेख नाही, की जर एखादा राजा (सत्ताधीश) नियमित करारानुसार राज्य करत नसेल, तर त्याला बदलण्याचा जनतेला काही अधिकार आहे की नाही?

आधुनिक पाश्चात्य करारांशी तुलना करता, बुद्धांचा करार हा पाश्चात्यांपेक्षा दोन हजार वर्षे जुना आहे. राज्य आणि राज्याच्या सत्ताबाबतचे सिद्धांत हॉब्ज, लॉक आणि रूसो यांना पाश्चात्य राष्ट्रांत औद्योगिक क्रांतीच्या संदर्भात आवश्यक वाटले. शिवाय उगवत्या संसदीय संदर्भातही ते आवश्यक ठरले. कारण या संस्था व सामाजिक, राजकीय संस्था सरंजामशाहीकडून भांडवलशाहीकडे वाटचाल करीत होत्या. त्यामुळे पाश्चात्य तज्ज्ञांना तत्कालिन विकसित होणाऱ्या राजकीय सिद्धांताचा फायदा झाला. मात्र बुद्धांनी अशी कोणतीही अपेक्षा न बाळगता त्यांनी २,६०० वर्षांपूर्वी तत्कालीन गुलामी आणि राज्यसत्तेच्या संदर्भात मार्गदर्शन केले.

**बुद्धकालीन सामाजिक आणि राजकीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास :**

बुद्धकालीन सामाजिक, राजकीय अभ्यास करता, बुद्धांच्या राज्यसत्तेच्या उदयाचा सिद्धांत त्यांच्या मनाची प्रगल्भता सिद्ध करतो. बुद्धांचा सैद्धांतिक विचार आणि हिंदू विचारवंतांचा दैवी हक्क याची तुलना केल्यास आपण सहजपणे प्राचीन राजकीय विचारांचे वर्णनात्मक पृथ:करण करू शकतो.

देशातील विविध भागात जेव्हा विविध प्रकारच्या राजकीय पद्धती विकसित झाल्या, त्या काळात बुद्धांचे जीवन गेले. बिबीसार राजाने देशात प्रथम राजेशाहीचा पुरस्कार केला. राज्याची संपूर्ण सत्ता एकाधिकारशाही पद्धतीची होती. त्यावेळच्या राजकीय तत्त्ववेत्यांना लोकांच्या रोजच्या जीवनाला अर्थपूर्ण ठरणारी नेमकी भूमिका घेणे आवश्यक होते. येथेच वैदिक आणि बुद्धीस्ट राजकीय विचारप्रणालीतला मुख्य फरक दिसून येतो. चटोपाध्याय यांच्या मतानुसार, त्या काळातील सर्व प्रेषितांमध्ये केवळ बुद्ध असे होते, की ज्यांनी लोकांच्या स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाच्या स्वप्नांना योग्य अशी राजप्रणाली देऊ केली.

**बुद्धांची न्यायाची संकल्पना :**

बुद्धांची न्यायाची संकल्पना ही अहिंसा आणि समतेवर आधारलेली असल्यामुळे ती पूर्णतः हिंदुत्ववादी दंडनितीच्या विरोधात असल्याचे स्पष्ट होते. दंडनिती ही मूलतः जुलमी हत्यार असल्यामुळे ती बुद्धांच्या न्याय संकल्पनेत बसत नाही. बुद्धांनी धम्म म्हणजे न्याय असे म्हटले आहे. याचा अर्थ धम्मामध्ये माणसा-माणसामध्ये जीवनाच्या सर्व क्षेत्रांत न्यायाला धरून संबंध असतो.

बुद्धांच्या धम्म संकल्पनेतील राजकीय संदर्भाचा ध्वनीत येणारा उल्लेख विविधांगी आहे. आर.एस. शर्मा यांच्या मते, राज्याच्या सत्तेबाबत धम्मामध्ये केवळ एकच मर्यादा सांगितली असून ती म्हणजे राजाने धम्माच्या तत्त्वाप्रमाणे राज्यकारभार करावा. बुद्धाच्या धम्म संकल्पना या अनेक अर्थाने प्लेटोच्या न्याय संकल्पनांशी साधर्म्य सांगणाऱ्या आहेत. तरी त्यामध्ये बुद्धांच्या धम्म संकल्पनेप्रमाणे मानवी असणाऱ्या समस्येबाबत मानवतावादी दृष्टिकोन दिसून येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या अनुषंगाने स्पष्ट करतात, की हिंदुत्ववादाचे अधिकृत वेदवाक्य म्हणजे विषमता होय. या विषमतेचे सुस्पष्ट उदाहरण म्हणजे चार्तुवर्ण्यपद्धती याच्या पूर्णतः विरोधात बुद्धांनी समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

सद्यकालीन जागतिक आर्थिक, राजकीय आणि समाजिक व्यवस्थांनी भांडवलशाही, लोकशाही, समाजवाद अशांचे संस्थांनीकरण करणे सुरू ठेवले आहे. या व्यवस्था संकटांचा सामना करताना अनेकदा परिवर्तनाच्या चर्चा घडत असतात. लोकांनी प्राचीन विचारवंतांकडून धडे घ्यायला हवेत. प्राचीन विचारवंतांचा विचार करताना केवळ ग्रीक विचारवंत सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल यांचा विचार होताना दिसतो. या विचारवंतांना अस्सल तार्किक विचारवंत समजले जाते, ज्यांनी वैचारिक भूतकाळ आणि उत्साहपूर्ण वर्तमानकाळाला एकत्र साधण्याचा प्रयत्न केल्याचे समजते. मात्र, गौतम बुद्ध हे वैचारिक क्षेत्राचा विचार करता, राजकीय तत्त्वज्ञानाचा उद्गाता म्हणून संपूर्ण जगातील तत्त्वज्ञांनी आणि विचारवंतांनी अभ्यास करणे गरजेचे आहे आणि बुद्धाचे वैचारिक सिद्धांत हे आजही उत्साहपूर्ण व प्रबळ असून ते पाश्चात्य प्राचीन राजकीय विचारवंतांच्या सिद्धांताबाबत कुठेही कमी पडत नाहीत.

**बुद्धांचे लोकशाही तत्त्वज्ञान :**

तत्कालिन ब्राह्मणवादी तत्त्ववेत्यांना साम्राज्य किंवा संघटित राज्यांची स्थापना करण्याची अभिलाषा होती. तर बुद्धांना प्रजासत्ताक आणि लोकशाही राज्यव्यवस्थांचे आकर्षण होते. लोकशाही राज्याबाबत बुद्धांचा सहानुभूतीपूर्वक दृष्टिकोन होता. या विचारांचे मूल्यमापन करताना आ.सी. मुजुमदार असे म्हणतात, की ''बौद्ध तत्त्वज्ञान हे खऱ्या अर्थाने राजकीय संस्थांचा सहानुभूतीपूर्वक विचार करणारे होते.'' बुद्धांचे लोकशाही तत्त्वज्ञान त्यांच्या वास्तववादी न्याय संकल्पनेवर आधारित होते. साम्राज्यवादी राज्यव्यवस्थेला पर्यायी शासन व्यवस्था म्हणून संघरचना केली. संघात व्यक्तींचा प्रवेश लोकशाही तत्त्वावर, चारित्र्य आणि शिस्तीवर आधारित होता. संघाचा विचार समतेचा होता. ''एक सभासद एक मूल्य'' हा संघाचा लोकशाहीवादी आणि राजकीय तत्त्वज्ञानाचा भाग होता. संघ लोकशाहीवादी कार्यपद्धतीत कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळाची व्यवस्था होती. संघ लोकशाहीवादी व्यवस्थेत सर्वांमध्ये समता होती. संघाकडून महासभांचे आयोजन आणि कायद्याचे पालन केले जाई. संघाची कार्यपद्धती लवचिक होती. संघाचा उद्देश लोकशाहीवादी संस्कृती निर्माण करणे आणि व्यक्ती-व्यक्तीमधील लोकशाहीवरील निष्ठा दृढ करण्याचा होता. बुद्धांना संघ पद्धतीत प्रशासकीय जाळे असावे, असे वाटत होते.

**लोकशाही कारभारासाठी बुद्धांच्या सात अटी :**

बुद्धांनी भविष्यातील कोणत्याही लोकशाहीप्रधान राज्याचा कारभार करण्यासाठी सात अटी किंवा तत्त्वे सांगितली ती पुढीलप्रमाणे –

१. भिक्खूंनी संपूर्ण संख्येने एकत्र येणे आणि वारवार सभांचे आयोजन करणे.
२. भिक्खूंनी एकोप्याने एकत्र जमावे आणि एकोप्याने उभे ठाकावे आणि संघाची कर्तव्ये एकोप्याने पार पाडावीत.
३. अगोदर योजलेल्या गोष्टींच्या पलिकडे दुसरी तत्त्वे प्रस्थापित करू नयेत आणि अगोदर प्रस्थापित केलेल्या तत्त्वांना टाकून देऊ नये आणि सर्वांनी संघाने घालून दिलेल्या सर्व तत्त्व आणि नियमांना बांधील राहून वर्तन करावे.
४. संघातील सर्व बंधूंनी एकमेकांचा आदर, सन्मान, प्रशंसा आणि सहकार्य करावे. थोरांचा, वडिलांचा आणि नेत्यांचा आदर-सन्मान करून सहकार्य करावे आणि त्यांचे बोलणे ऐकून घेणे हे आपले कर्तव्य समजून वर्तन करावे.
५. सर्व भिक्खू बंधूंनी अभिलाषेच्या प्रभावाला बळी पडू नये.
६. एकांतवासाचा सर्व भिक्खूंनी आनंद लुटावा.
७. सर्व भिक्खू बंधूंनी आपली मनं अशा प्रकारे तयार करावीत, जेणेकरून ते नेहमी अधोगतीला नव्हे, तर प्रगतीपथावर असतील.

यासंबंधी जयस्वाल के.पी. असे प्रतिपादन करतात, की बुद्धांचा बंधुभाव भारतीय प्रजासत्ताक राज्यकारभाराच्या अंतरात्म्यातून उगम पावला असून तो केवळ भारताला नव्हे, तर संपूर्ण जगाच्या कल्याणासाठी उपयुक्त आहे. जयस्वालांच्या मते, भारतीय प्रजासत्ताक राज्ये हिंदू होती. त्यांचे हे प्रतिपादन युरोपियन वसाहतवादी राज्यसत्तापेक्षा वेगळे असून त्यामध्ये राष्ट्रवादी ध्येये समाविष्ट आहेत असे वाटत असले, तरी ते निश्चितपणे इतिहासाचे विद्रुपीकरण आहे, असे म्हणावे लागेल. बुद्ध तत्त्वज्ञान हे केवळ धार्मिक आहे, असे समजणे निर्विवाद चुकीचे असून मूलभूतरित्या ते राजकीय आहे.

राज्याचे सार्वभौमत्व निरंकुश व सर्वश्रेष्ठ असते. थोडक्यात, सत्ता अंमल किंवा विशेष दर्जाबाबत श्रेष्ठत्व दर्शविणारी एक राजनैतिक संस्था सार्वभौम असते. फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ झां बोंदे याने सार्वभौमत्त्वाचा सिद्धांत 'सिक्स बुक ऑफ रिपब्लिक' या ग्रंथात मांडला. हॉब्ज, जॉन ऑस्टिन, हेरॉल्ड लास्कीनेही सार्वभौमत्वाचा पुरस्कार केला. हे येथे स्पष्ट करण्याचे कारण म्हणजे, बुद्ध इतरांपैकी एक आहोत, असेच स्वतःला समजत होते. कर्तव्ये आणि अधिकाराबाबत इतर भिक्खूंप्रमाणे ते स्वतः बांधील असत. राज्याकडे सत्ता असते, तो निरंकुश सत्तेचा वापरही करू शकतो. यासंबंधी बुद्धांचे तत्त्वज्ञान वैश्विक पातळीवरील राज्यकर्त्यांना मार्गदर्शकच ठरेल. यासंबंधी बुद्ध असे म्हणतात, की इतरांपेक्षा अधिक किंवा सर्वश्रेष्ठत्त्वाची भावना

जेव्हा नेते किंवा शासकांमध्ये निर्माण होते, तेव्हा कोणत्याही राजकीय प्रणालीच्या अंताची सुरुवात होते. उदा. रशियामध्येही ग्लासनोस्त आणि पेरोस्त्रोयकामुळे साम्यवादी राजवटीचा अंत झाला. आज जगात वर्णद्वेष, इस्लामिक बॉब, ख्रिश्चन मूलतत्त्ववादाचे वर्चस्व, दहशतवादी कारवाया, शिख मूलतत्त्ववादी, हिंदू मूलतत्त्ववादी या सर्वांना बुद्धांचा उपदेश निश्चित मार्गदर्शक ठरू शकेल आणि जगा व जगू द्या हे तत्त्व सार्थक केले जाईल.

**बुद्धांच्या लोकशाहीत स्त्रियांचे स्थान :**

बुद्धांना बुद्धप्राप्ती होण्याच्या अगोदर स्त्रियांच्या बाबतीत हिंदू विचाराप्रमाणे विचार होता; परंतु बुद्ध हे लोकशाही तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते होते. मात्र बुद्धप्राप्तीनंतर त्यांनी स्त्रियांच्या हक्कांबाबत स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. स्त्रीलासुद्धा एक माणूस म्हणून वागविले पाहिजे. तिलाही पुरुषाइतकेच महत्त्व आहे. आपल्या कृतीतून ब्राह्मणी पुरुषप्रधान प्रथेला मोठा

धक्का दिला. गौतम बुद्धांच्या चरित्रातील कथेत यशाचा पिता त्याचा शोध करीत होते. त्यावेळी त्याने आपल्या मुलास ओळखले नाही. मग बुद्धांनी धर्मबोध केला. त्यानंतर त्याने मुलास ओळखले. त्यानंतर दोष पितापुत्रांना बोध करून चित्त प्रसन्न केले. बोध आटोपल्यावर वैश्य म्हणाला, माझ्या गृही सर्व शिष्य जणासह भोजनास यावे. त्यावेळी बुद्ध आपला झगा घालून त्या वैश्याच्या घरी गेले. त्यावेळी यशाची आई बोलल्या, हे भगवान, आपण ज्या सत्याचा बोध केला ते परमसौख्य देणारे आहे. यास्तव आम्ही तुम्हाला शरण आलोत. आम्हाला तुमचे धर्ममत कबुल आहे. आपल्या शिष्यवर्गात सामील होण्यास आम्ही तयार आहेत. या बुद्धांच्या पहिल्या स्त्री शिष्या होत्या.

मनुस्मृती, वात्सायन यांच्या लिखाणामध्ये स्त्रीला केवळ उपभोग्य वस्तू समजून पुरुषांच्या हातातील खेळणे, असे वर्णन केले आहे. स्त्री सुखोपभोगाची आणि मुले उत्पन्न करणारी वंशवृद्धीसाठी आवश्यक वस्तू असल्याचे त्यांचे प्रतिपादन होते. हिंदूंच्या या अमानुष दृष्टिकोनाच्या विरोधात बुद्धांनी स्त्रीला समता प्रदान करताना तीसुद्धा निर्वाणप्राप्ती करू शकते, असे जाहीर केले. बुद्धांच्या संघाने मात्र स्त्रिला लिहिण्या-वाचनाचे स्वातंत्र्य बहाल केले. त्यामुळेच भारतात बुद्धसंघामधून प्रथम स्त्री बुद्धिमतांची पिढी बाहेर पडली.

बुद्धांनी सांगितलेली सप्तसंगिकी आजच्या आधुनिक राज्यासाठी किती उपयुक्त आहे, याचा बोध वैश्विक स्तरावरील लोकशाही व्यवस्थेला आणि राज्यकर्त्यांना मार्गदर्शक आहे. तथागत बुद्धांच्या ४५ वर्षांच्या धम्मप्रचार प्रकाराच्या काळात बुद्ध सप्तसंगिकीबाबत दोन ऐतिहासिक प्रसंग घडलेले आहेत. पहिल्यांदा लिच्छवींनी राज्याच्या संरक्षणासाठी उपाययोजना विचारली म्हणून बुद्धांनी सप्तसंगिकी सांगितली.

दुसऱ्यांदा वज्जी गणराज्याला हरविण्यासाठी उपाययोजना अजातशत्रूच्या सेनापतीने विचारली तेव्हा पुन्हा ही सप्तसंगिकी सांगितली.

**गौतम बुद्धांची सप्तसंगिकी संदेश :**

१) एकता, २) एकमत, ३) न्याय व कायदा, ४) थोरामोठ्यांचा सन्मान, ५) महिलांचे संरक्षण, ६) चैत्य व देवस्थानांचा सन्मान व आर्थिक अनुदान, ७) संत अर्हतांचे संरक्षण. यामध्ये लिच्छवी ''जोपर्यंत वज्जी एकता ठेऊन वारंवार एकत्र बसत राहतील, तोपर्यंत ते अजिंक्य राहतील'' असे बुद्ध म्हणाले. गौतम बुद्ध आपल्या सप्तसंगिकी संदेशात व राष्ट्राचे एकमत असावे या घटकामध्ये म्हणतात, ''संसद भवनात सर्वजण एकत्र बसून आपसात चिंतन, मनन आणि विचारविनिमय करून निर्णय घेतला जाईल. तो सर्वसंमत व्हावा. सर्वांनी एकमत होऊन उठावे. त्यानंतर जे प्रात्यक्षिक करायचे ठरलेले असते, तेसुद्धा एकजूट होऊनच करावे. मतभेद झाले, आपसात फूट पडली, तर दुश्मनांशी सामना करणे अवघड होऊन जाईल. राष्ट्राच्या संरक्षणासाठी संपूर्ण राष्ट्रात उत्साह निर्माण करावा, जागवावा. राष्ट्रीयत्वाच्या भावनेने प्रेरित व्हावे. राष्ट्रप्रेमाची प्रेरणा द्यावी. संकट आल्यावर सर्व देशवासी देशाच्या संरक्षणात सहकार्य देणे हे आपले कर्तव्य समजणारा हेच वज्जीचे मुख्य कर्तव्य आहे.'' सम्राट अशोकाने बुद्धांची सप्तसंगिकी स्वीकारली होती.

बुद्धांनी सांगितलेला सप्तसंगिकी संदेश हा केवळ त्या काळापुरताच अथवा त्या प्रसंगापुरताच उपयुक्त नव्हता, तर आजही गणराज्य भारतासाठी आणि जगातील इतर कोणत्याही लोकशाही प्रजासत्ताक गणराज्यासाठी सदैव मार्गदर्शक ठरणारा आहे. चंद्रगुप्त मौर्य यांनी ग्रीक सत्तेचे उच्चाटन केले आणि सम्राट अशोकाने बौद्ध धम्माला राष्ट्रधर्म म्हणून घोषित केले.

चंद्रगुप्तने भारतातील ग्रीक सत्तेचे उच्चाटन करून स्वसत्ता प्रस्थापित केली. तसेच त्याने अनेक लहान लहान राज्ये नष्ट करून विशाल मौर्य साम्राज्य स्थापन केले. यामुळे भारत पूर्वीसारखा दुर्बल नसून सामर्थ्यशाली बनला होता. चंद्रगुप्तासारखी इराणपर्यंत पोचलेली भारताची विस्तृत प्रसिद्धी सरहद मोगल किंवा इंग्रज सत्ताधीश आटोकाट प्रयत्न करूनसुद्धा प्राप्त करू शकले नाहीत. अशा प्रकारे चंद्रगुप्ताचे साम्राज्य उत्तर प्रदेशातून दक्षिणेकडे म्हैसूरपर्यंत आणि कलिंग सोडून बाकीच्या बंगाल वगैरे प्रदेशातून पश्चिमेकडे सौराष्ट्र व इराणपर्यंतच्या विस्तृत प्रदेशावर पसरले होते. चंद्रगुप्ताला भारताच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. सम्राट अशोक चंद्रगुप्त मौर्याच्या तिसऱ्या पिढीत जन्माला आला. सम्राट अशोकाने बौद्ध धम्माला राष्ट्रधर्म म्हणून घोषित केला. त्याने धम्मप्रचारासाठी धर्मखाते स्थापन केले. त्यासाठी त्याने धर्म महापात्र नावाचे धर्माधिकारी नियुक्त केले. या अधिकाऱ्याकडे बौद्ध धर्मतत्त्वाची जोपासना व प्रसार करण्याचे कार्य सोपविले. स्त्रियांच्या हितासंदर्भात स्त्री महापात्र नियुक्त केले. अशोकाने बौद्ध तीर्थक्षेत्रांना स्वतः भेटी दिल्या. बौद्ध धम्माच्या तत्त्वानुसार, अशोकाने प्रजेसाठी लोककल्याणकारी कार्ये केली. प्रजेच्या सुखसोयी वाढविल्या. दवाखाने, धर्मशाळा, जलसिंचन योजना यामाध्यमातून जनतेला सोयी उपलब्ध करून दिल्या. बौद्ध धर्माच्या प्रचारास उत्तेजन दिले. अनेक देशांत बौद्ध धर्माचा प्रचार करून अशोकाने बौद्ध धम्मास विश्वव्यापी किंवा वैश्विक बनविले. गौतम बुद्धांच्या प्रभावामुळेच सम्राट अशोकासारखा सर्वधर्मसमभावाचा पुरस्कार करणारा जगाच्या इतिहासातील पहिला सम्राट भारतामध्ये उदयास आला. ●●●

**(लेखक शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील राज्यशास्त्र विभागाचे माजी प्रोफेसर आहेत.)**

# प्राथमिक शिक्षणाचा कोसोळतोय पाया



प्रा. डॉ. दिलीप चव्हाण

**एका अभ्यासात असे दिसून आले आहे, की 'मान्यताप्राप्त' म्हणजे सरकारी परवानाधारक; परंतु सरकारी अनुदानाशिवाय (विद्यार्थ्यांच्या शुल्कातून) चालविल्या जाणाऱ्या (खासगी) शाळांमधील विद्यार्थ्यांचे प्रमाण १९९३ मध्ये ९.२ टक्के होते. ते २०१७ मध्ये ३४.८ टक्क्यांपर्यंत वाढले आणि अशा शाळांची संख्या देशभरात ३,५०,००० पर्यंत वाढली. जर खाजगी विनाअनुदानित शाळांमधील ८.७ कोटी मुलांच्या संख्येत, खाजगी अनुदानित शाळांमधील २.८ कोटींची भर पडली, तर .... भारतातील शाळकरी मुलांच्या २५ कोटीपैकी (२०१७-१८) ४६ टक्के इतकी ही (खाजगी शाळांमधील विद्यार्थ्यांची) संख्या प्रचंड आहे.**

महाराष्ट्रात वेगवान राजकीय घडामोडी घडत असताना नवनिर्वाचित मुख्यमंत्र्यांविषयी एक बातमी बाहेर आली होती. बातमी अतिशय धक्कादायक होती; पण त्या बातमीकडे कुणी लक्ष दिले नाही. बातमीचा मथळा असा होता : एकनाथ शिंदे यांच्या मूळ गावात शाळा, हॉस्पिटल नाही. पण २ हेलिपॅड आहेत.

यासंबंधी बीबीसीने दिलेले वृत्त असे, "मुख्यमंत्र्यांच्या दरे गावामध्ये ना शाळा आहे ना कुठले हॉस्पिटल. शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधांसाठी गावकऱ्यांना तापोळ्याला जाण्यासाठी ५० कि.मी. रस्ता आणि बोटीने १० कि.मी. प्रवास करावा लागतो. मात्र गावात दोन हेलिपॅड आहेत. शिंदे जेव्हाही गावात येतात, तेव्हा ते हेलिकॉप्टरनेच येतात. एका स्थानिक नागरिकाच्या म्हणण्यानुसार, इंडियन एक्सप्रेसमध्ये लिहिले आहे, की त्यांनी कोयना नदीच्या काठावर एक हेलिपॅड बांधले होते. यानंतर गावात त्यांच्या घरापासून काही अंतरावर हेलिपॅड बांधण्यात आले असून लवकरच ते वापरासाठी सज्ज होणार. शिंदे जेव्हाही गावात येतात, तेव्हा ते हेलिकॉप्टरनेच येतात." (https://www.bbc.com/marathi/india-61934173) या वृत्तावरून भारतीय प्राथमिक शिक्षणाची स्थिती लक्षात येते.

**खासगी शाळांचे प्रमाण वाढले**

शिक्षणाच्या खाजगीकरणाची चर्चा जेव्हा केली जाते, तेव्हा ती प्रामुख्याने उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणाची असते. प्राथमिक शिक्षणाच्या खाजगीकरणाचा प्रश्न हा चर्चेच्या पातळीवर दुर्लक्षित राहतो. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश सत्ताधीश आणि एतद्देशीय अभिजन यांच्या संयुक्त हितसंबंधांतून सरकारी आणि खाजगी अशी शाळारचना आकारास आली. स्वातंत्र्योत्तर काळातील सुरुवातीच्या टप्प्यात अगदी निवडकांसाठी खाजगी शाळा होत्या. त्यांची संख्या तुलनेत कमी होती. त्यानंतर जसजसा शिक्षणाचा विस्तार व्हायला




लागला, तसतसा अभिजनवर्ग या नवशिक्षित वर्गापासून स्वत:ला वेगळे ठेऊ बघत होता. नव्या अभिजनवर्गाचा जसजसा विस्तार झाला तसतसा खासगी शाळांचे प्रमाण वाढले.

सुरुवातीला जवाहरलाल नेहरूंनादेखील डेहराडूनमधील खासगी शाळांचे आकर्षण होतेच. त्यांच्या समाजवादी धोरणाचा भाग म्हणून नेहरूंनी खाजगी शाळा बरखास्त केल्या नाहीत. भारतातील अभिजनवर्गाने नेहमीच लोकेच्छेच्या नावाखाली खाजगी शाळांचे समर्थन केले. शिक्षण हक्क कायदा निर्माण होत असताना खाजगी शाळांच्या अस्तित्वासह हा कायदा निर्माण होईल, असा आग्रह या अभिजनवर्गाचा होता.

वरच्या व मध्यम वर्गाला लाभदायक असलेल्या खाजगी शाळांवर आणि त्याअन्वये शाळांच्या खाजगीकरणावर टाच आणणे हे अभिजनांना त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आणण्यासारखे वाटले. भारताचे केंद्रीय सचिव राहिलेले माधव गोडबोले यांचे खाजगी शाळांविषयीचे मत बघा : "राज्याने सरकारने देखभाल न केलेल्या किंवा राज्याच्या सरकारच्या निधीतून मदत न मिळणाऱ्या खाजगी शिक्षण संस्थांनाही प्रस्तावित दुरुस्तीच्या कक्षेत आणायचे आहे का, याबाबत विचारपूर्वक निर्णय घेण्याची गरज आहे. या विषयावर

कोणतीही वैचारिक किंवा ताठर भूमिका घेणे योग्य ठरणार नाही.''

शाळेच्या खाजगीकरणाला विरोध म्हणजे कुठल्यातरी भूमिकेतून केला गेलेला असेल, असे गाडगीळांनी गृहीत धरले. खाजगी शाळा असणे ही बाब मात्र नैसर्गिक आहे, असेही त्यांनी गृहीत धरले.

माधव गाडगीळ पुढे असे लिहितात : ''जेथे जेथे पालक आर्थिकदृष्ट्या आपले पाल्य खाजगी शाळेत पाठवण्याच्या स्थितीत असतात आणि ती जबाबदारी उचलण्याच्या स्थितीत असतात, तेव्हा राज्याने स्वत:च्या तुटपुंज्या आणि आधीच जास्त ताणलेल्या संसाधनांमधून अशा खर्चास अनुदान देण्याचे कोणतेही कारण नाही.''

गाडगीळांनी केलेला हा युक्तिवाद एक प्रकारचा लोकप्रिय आणि सवंग युक्तिवाद आहे. असा युक्तिवाद करून श्रीमंतांच्या स्वतंत्र शाळांचे विवेकीकरण करता येते, तसेच 'श्रीमंतांच्या शाळांवर सरकारने का खर्च करावा?' असा भ्रामक अर्थाने गरिबांना अनुकूल विचार मांडून गरिबांची सहानुभूतीदेखील मिळविता येते. वस्तुत: श्रीमंत वर्गाने स्वत:च्या पाल्यांसाठी स्वतंत्र शाळांची रचना आखून बदललेल्या परिस्थितीतही स्वत:च्या वर्चस्वाच्या संधी अबाधित ठेवल्या. यातून गरीब वर्गातील पाल्यांसोबत आपले पाल्य मिसळण्याचा 'धोका' टाळला गेला आणि त्याद्वारे घडू शकणारे अभिसरणही टाळले गेले. शाळेतून होणाऱ्या सामाजिक अभिसरणाला भारतीय अभिजन वर्ग एवढा का घाबरत होता?

गाडगीळांचा हा लेख भारतात शिक्षण हक्क कायदा करण्यासाठी देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय दबाव तयार होत असताना प्रसिद्ध झाला. नवा कायदा अभिजनांच्या हितसंबंधांना बाधा पोहचविणार नाही, याची काळजी घेतली गेली.

भारतात प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत एक अंतर्विरोधमय स्थिती आहे. एका बाजूला भारतीय संविधानाने सर्व विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारवर टाकलेली आहे आणि शिक्षण हक्क कायद्याने सर्व बालकांना मोफत शिक्षण पुरविण्याची हमी दिलेली आहे (खरं म्हणजे, तसा भास निर्माण केला आहे); तर दुसऱ्या बाजूला प्राथमिक शिक्षणाचे मोठ्या प्रमाणावर खाजगीकरण सुरू आहे.

**भारतात दोन प्रकारच्या खाजगी शाळा**

भारतात दोन प्रकारच्या खाजगी शाळा आहेत. पहिल्या प्रकारात खाजगी संस्थांकडून चालविल्या जाणाऱ्या अनुदानित शाळांचा समावेश होतो; तर दुसऱ्या प्रकारात खासगी संस्थांकडून चालविल्या जाणाऱ्या विना-अनुदानित शाळांचा समावेश होतो. पहिल्या प्रकारच्या शाळांमधून शिक्षण मोफत उपलब्ध असले, तरी शिक्षणाच्या प्रक्रियेचे (शिक्षकभरती, शाळेचे संचालन, इत्यादी) अशा शाळांमधून खाजगीकरण होते. दुसऱ्या प्रकारच्या शाळांमधून शिक्षण हे क्रयवस्तू म्हणून विकले जाते. अशा दोन्ही शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे एकूण विद्यार्थ्यांमधील प्रमाण हे ४६ % एवढे आहे. हे प्रमाण उत्तरोत्तर वाढत आहे.

एका अभ्यासात असे दिसून आले आहे, की 'मान्यताप्राप्त' म्हणजे सरकारी परवानाधारक; परंतु सरकारी अनुदानाशिवाय (विद्यार्थ्यांच्या शुल्कातून) चालविल्या जाणाऱ्या (खासगी) शाळांमधील विद्यार्थ्यांचे प्रमाण १९९३ मध्ये ९.२ टक्के होते. ते २०१७ मध्ये ३४.८ टक्क्यांपर्यंत वाढले आणि अशा शाळांची संख्या देशभरात ३,५०,००० पर्यंत वाढली. जर खाजगी विनाअनुदानित शाळांमधील ८.७ कोटी मुलांच्या संख्येत, खाजगी अनुदानित शाळांमधील २.८ कोटींची भर पडली, तर .... भारतातील शाळकरी मुलांच्या २५ कोटीपैकी (२०१७-१८) ४६ टक्के इतकी ही (खाजगी शाळांमधील विद्यार्थ्यांची) संख्या प्रचंड आहे.

**ग्रामीण भागात अंतर्विरोधमय परिस्थिती**

१९९० नंतर सर्वत्र खाजगी शाळांना उधाण आले. सरकारने शिक्षणसारख्या धोरणापासून माघार घेण्याविषयी आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांचा दबाव वाढला. यातून ग्रामीण भागात अंतर्विरोधमय परिस्थिती तयार झाली. एका बाजूला ग्रामीण समाजाचे दारिद्रीकरण झाले. मुख्यमंत्र्यांच्या गावाचे वर्णन हे एका अर्थाने प्रातिनिधिक आहे; तर दुसऱ्या बाजूला ग्रामीण भागात किमान क्रयशक्ती असलेला एक उपभोक्ता वर्ग तयार झाला.

PROBE (Public Report on Basic Education in India) अहवालात ग्रामीण भागातील खाजगी शाळांच्या वाढत्या प्रमाणाची नोंद घेतली गेली : ''खाजगी शालेय शिक्षण हे केवळ शहरी भागापुरतेच मर्यादित असल्याचे मानले जाते; परंतु ते सत्य नाही. अनेक PROBE पाहणी केलेल्या गावांमध्ये खासगी शाळा हा संधी आणि धोके असलेला भरभराटीचा व्यवसाय आहे.''

PROBE हा अहवाल १९९८ मध्ये प्रसिद्ध झाला. या पाहणीत असे आढळले, की नव्याने सुरू करण्यात आलेल्या खाजगी शाळांमध्ये दलित व आदिवासी विद्यार्थ्यांचे आणि मुलींचे प्रमाण कमी होते. शाळेची नवी रचना नवी विषमता निर्माण करत होती. जवाहर नवोदय विद्यालयांनी ग्रामीण अभिजनांच्या ऊर्ध्वगामी गतिशीलतेच्या आकांक्षांना चुचकारले होते. या शाळांमधील प्रवेशावर मर्यादा होती. जिल्ह्यात एकच नवोदय विद्यालय होते. उरलेल्या आकांक्षींनी ग्रामीण खाजगी शाळांची वाट चोखाळली.

**सरकारी शाळा कोसळणे हे खाजगीकरणाला पूरक**

नव्या आर्थिक धोरणाच्या प्रभावात सरकारी शाळा कोसळायला सुरुवात होत होती. सरकारी शाळा कोसळणे हे खाजगीकरणाला पूरक असणार होते. PROBE पाहणीत असे आढळले, की सरकारी आणि खासगी शाळांमध्ये मुलांना शिकविणे यामध्ये खर्चाच्या पातळीवर फार फरक नव्हता आणि अगदी गरिबातील गरीब पालकही सरकारी शाळांबाबत असमाधानी होते : Having said this, it would be a mistake to think that private schooling is restricted to privileged families. Even among poor families and disadvantaged communities, one finds parents who make great sacrifices to send some or all of their children to private schools, so disillusioned are they with government schools.

**खासगी शाळा वाढविण्यामागील**

**PROBE अहवालात दोन कारणमीमांसा देण्यात आली :**

१) सरकारी शाळांची दुरवस्था आणि

२) पालकांच्या क्रयशक्तीतील वाढ

अलीकडे गावोगावी खासगी शाळांचे पीक निघालेले आहे. कच्च्या इमारतींमध्ये आणि काही ठिकाणी अगदी पत्र्याच्या शेडमध्ये अशा शाळा चालविल्या जातात. ग्लोबल/इंटरनॅशनल/युनिव्हर्सल/ऑक्सफर्ड/केंब्रिज अशी नावं धारण करून विद्यार्थ्यांना आकर्षित केले जाते. शहरांमध्ये अधिक आकर्षक इमारतींमध्ये अशा शाळा भरतात. अलीकडे काही कॉर्पोरेट कंपन्या शाळांची मालिका चालवितात. उदाहरणार्थ, पोदार या नावाने पोदार एज्युकेशन नेटवर्क या संस्थेकडून (कंपनीकडून) भारतात १३६ इंटरनॅशनल स्कूल्स, ८५ पार्टनर स्कूल्स आणि ३६० जंबो किड्स सेंटर्स चालविले जातात. शिक्षण हक्क कायद्याने अशा भारतातील ४,००,००० हून अधिक खाजगी शाळांवर टाच आणली नाही. उलट, या कायद्याने अशा खाजगी अनुदानित आणि खाजगी विनाअनुदानित शाळांना अभय आणि उत्तेजन दिले.

सरकारी/अनुदानित शाळांचा संकोच घडवून आणण्यासाठी सरकारने किमान तीन स्तरांवर अडचणी तयार केल्या.

**एक :** स्वातंत्र्यानंतर भारतातील राज्य सरकारांनी ब्रिटिशांनी सुरू केलेले अनुदानाचे धोरण सुरू ठेवले. यातून भारतात खाजगी संस्थांनी चालविलेल्या अनुदानित शाळांची रचना उभी राहिली. काही शाळा सरकारने थेटपणे चालविल्या. उदाहरणार्थ, जिल्हा परिषद आणि महानगरपालिकेच्या शाळा. या सर्व शाळांसाठी सरकार अनुदान देत असे.

तथापि, गेल्या काही वर्षांपासून सरकारने नव्याने अनुदानाच्या धोरणापासून माघार घेतली आहे. अनुदानित शाळांच्या अनुदानासह मान्यतेला सरकारने नकार दिलेला आहे. नव्याने शाळा सुरू करायची असेल, तर 'कधीही अनुदान मागणार' नाही अशा प्रतिज्ञापत्रावर शाळेची मान्यता दिली जाते.

**दोन :** खाजगी अनुदानित शाळांना दिल्या जाणाऱ्या वेतनेतर देखभाल आणि दुरुस्ती अनुदानापासून सरकारने पाठ फिरविली आहे. हा प्रश्न आपण तपशिलात समजून घेऊ : देशभरातील अनुदानित शाळांना शिक्षकांच्या पगारासाठी सरकारचे अनुदान मिळते. स्थानिक भाषेतील माध्यमाच्या शाळांना पायाभूत सुविधांचा विकास आणि देखभालीसाठी होणारा खर्च भरून काढण्यासाठी अतिरिक्त वेतनेतर किंवा वेतनोत्तर अनुदान दिले जाते. महाराष्ट्र कर्मचारी खाजगी शाळा अधिनियम (एमईपीएस, १९७७ व १९८१) अन्वये राज्यातील सर्व स्थानिक शाळांना मोफत शिक्षण देणे बंधनकारक असून त्यांना त्यांच्या विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची कॅपिटेशन फी किंवा देणगी घेण्यास बंदी घालण्यात आली आहे.

खाजगी अनुदानित शाळांचे शिक्षकांचे वेतन देण्याची राज्य सरकारची परंपरा चांगलीच रुजली असली, तरी महाराष्ट्र सरकारने वेतनेतर अनुदाने बंद करण्याचा प्रयत्न वारंवार केला आहे. १९९७ आणि २००३ मध्ये दोन अयशस्वी प्रयत्नांनंतर जानेवारी २०१३ मध्ये राज्याने एक सरकारी ठराव (जीआर) मंजूर करून अनुदानित शाळांच्या वेतन अनुदानाच्या ५ टक्के वेतनेतर अनुदानाचा घटक कमी केला.

यावर्षी (२०२२) २७ फेब्रुवारी रोजी कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्राने मराठी भाषा दिनी ६४,००० मराठी माध्यमाच्या खाजगी अनुदानित शाळांनी राज्य सरकारच्या आगामी



दहावी आणि बारावीच्या बोर्डाच्या परीक्षा त्यांच्या आवारात आयोजित न करण्याची धमकी दिली. २०१८-१९ आणि २०१९-२० या शैक्षणिक वर्षांसाठीच्या 'वेतनेतर अनुदाना'चे ५२० कोटी रुपये प्रतिपूर्ती करण्यात राज्य सरकार अपयशी ठरल्याच्या विरोधात या शाळांचे व्यवस्थापन उभे ठाकले.

(https://www.educationworld.in/maharashtra-poor-payment.../)

**...हा एक स्वतंत्रच प्रश्न आहे ?**

सरकारच्या अशा बेजबाबदार धोरणामुळे खाजगी अनुदानित शाळांची दुर्दशा झालेली आहे. विद्युत बिल, इमारत देखभाल, खडू फळा इत्यादी खर्च करणे या शाळांना कठीण होत असल्यामुळे ह्या शाळा विपन्नावस्थेत ढकलल्या जात आहेत. खासगी अनुदानित शाळांना नव्या इमारती बांधण्यासाठी सरकार अनुदान देत नाही, हा एक स्वतंत्रच प्रश्न आहे.

एका पाहणीत असे आढळले, की २०१७-१८ ते २०१९-२० या कालावधीत यूडीआयएसई (UDISE) अंतर्गत समाविष्ट असलेल्या एकूण शाळांच्या संख्येत घट झाली. २०१७-१८ मध्ये १५,५८,९०३ शाळा होत्या; तर २०१९-२० मध्ये ही संख्या १५,०७,७०८ इतकी कमी झाली. तुलनेत ५१ हजारांपेक्षा शाळा कमी झाल्या. ही प्रक्रिया अशीच सुरू राहू शकते. शाळांची संख्या का कमी झाली, हे समजू शकत नाही, असे U-DISE चे प्रमुख अरुण मेहता यांनी सांगितले आहे. या कालावधीत मध्य प्रदेशांत २०,६०० तर उत्तर प्रदेशात १९,००० शाळा कमी झाल्या. मेहता यांच्या मते, शाळा विलिनीकरणातून असे घडले असावे.

(https://educationforallinindia.com/udise-plus-2019-20.../) एखाद्या देशातून ५१,००० हून अधिक शाळा नष्ट होतात आणि त्या देशातील संबंधित विभागाच्या प्रमुखाला त्या नष्ट होण्याचे नेमके कारण सांगता येत नाही!!

राष्ट्रीय शिक्षण धोरणात या ऱ्हासाविषयी चकार शब्दही नाही!

●●●

**(लेखक स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात इंग्रजी विषयाचे प्रोफेसर आहेत.)**

# मोदींच्या कर्तबगारीवर मलिकांचा प्रहार

**मोदींचा चेहरा, त्यांची स्वच्छ प्रतिमा, राष्ट्रहित, लोकांसाठी योजना आणि जातींची समीकरणे या आधारांवर भाजपने निवडणुकांमध्ये प्रचंड यश मिळवले. मात्र, त्यामागील सत्याचा उलगडा जम्मू-काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी 'द वायर'ला दिलेल्या मुलाखतीतून केल्याचे जाणवते.**

**विचक्षण बोधे**



अविभाजित जम्मू-काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी 'द वायर' या ऑनलाइन वृत्तमाध्यमाला दिलेल्या मुलाखतीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींवर थेट आरोप केले. हे आरोप खळबळजनक होते, तरीही भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सरकारला फारसा फरक पडला नाही. 'जोर का झटका धीरे से लगे' असे कदाचित झाले असावे. मलिकांच्या आरोपांचा लगेच परिणाम झालेला दिसणार नाही. लोकसभा निवडणूक नजिक येईल, तशी हळूहळू त्याची धग जाणवू लागेल. मोदींचा चेहरा असेल तर निवडणुका जिंकता येतील, असे भाजपच्या नेत्यांचे म्हणणे असते. या चेहऱ्याला धक्का लागला तर आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपला अपेक्षित जागा मिळतील का, हा प्रश्न कोणालाही पडू शकतो.

**शेतकरी नमत नाहीत हे मोदींना उशिरा कळले**

दिल्लीमध्ये झालेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलनाच्या काळात सत्यपाल मलिकांनी मोदींची भेट घेऊन कृषी कायदे मागे घेण्यासंदर्भात चर्चा केली होती. त्यानंतर मलिकांनी जाहीर विधाने केली होती. त्यांच्या बोलण्याचा अर्थ, मोदींनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले असा होता. कदाचित शेतकऱ्यांना खलिस्तानी वगैरे दूषणे दिल्यानंतर ते आपणहून आंदोलन मागे घेतील असे मोदींना वाटले असावे. दिल्लीतील आंदोलन मोठ्या-श्रीमंत शेतकऱ्यांचे होते, त्यामध्ये छोट्या शेतकऱ्यांचा समावेश नव्हता. देशात बहुसंख्य असलेले छोटे शेतकरी आपल्या मागे उभे राहतील असा विश्वास मोदींना होता. मोदींच्या म्हणण्यामध्ये तथ्य होते. छोटे शेतकरी या आंदोलनात नव्हते. पण दिल्लीतील शेतकऱ्यांच्या आंदोलनामुळे भाजपविरोधी वातावरण निर्माण होण्यास मदत झाली. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे दिल्लीच्या वेशीवरून शेतकरी हटायला तयार नव्हते. शेतकरी नमत नाहीत हे मोदींना उशिरा कळले. मग, त्यांनी माघार घेतली, कृषी कायदे मागे घेतले. मलिकांनी मोदींची भेट घेतली तेव्हा ते पाऊल मागे टाकण्याच्या मनस्थितीत नव्हते. मलिकांचे बोलणे त्यांनी मनावर घेतले नव्हते, असा मलिकांचा सूर होता. मोदी बहुधा कोणाचाही सल्ला ऐकत नसावेत असा अर्थ मलिकांच्या विधानांमधून ध्वनित होत होता. 'द वायर'ला मलिकांनी दिलेल्या मुलाखतीमध्येही मलिकांची मोदींबद्दल हीच तक्रार असल्याचे दिसते.

**आरोपांचा रोख थेट पंतप्रधानांकडे गेला**

केंद्र सरकारने ऑगस्ट २०१९ मध्ये जम्मू-काश्मीरचे विभाजन केले, राज्याचा दर्जा काढून घेऊन अवमूल्यन केले. अनुच्छेद ३७० रद्द करण्याचा केंद्राचा निर्णय एका अर्थाने ऐतिहासिक होता. या निर्णयप्रक्रियेमध्ये मलिक नव्हते असे दिसते. त्यांना एखाद-दोन दिवस आधी कळवले गेले होते. त्यांनी घटनात्मक पदाचा मान राखत गुप्तता पाळली होती. जम्मू-काश्मीर केंद्रशासित प्रदेश झाल्यावर तिथे नायब राज्यपाल नियुक्त करायचे असल्यामुळे मलिकांना गोव्याच्या राज्यपालपदाचा कार्यभार देण्यात आला. जम्मू-काश्मीरचे राज्यपाल म्हणून दीड वर्षांच्या काळात मलिकांचे अनुभव त्यांनी 'द वायर'च्या मुलाखतीत बोलून दाखवले. हे अनुभव मोदींशी संबंधित असल्यामुळे आरोपांचा रोख थेट पंतप्रधानांकडे गेला. मोदी संशयाच्या भोवऱ्यात अडकले, तर सत्ता गमावण्याची वेळ येईल या भीतीने मुलाखत प्रसिद्ध झाल्या-झाल्या वेगाने हालचाली झाल्या, मग एकाही वृत्तवाहिनीने या मुलाखतीची दखल घेतली नाही. भाजपकडून प्रसारमाध्यमांचे व्यवस्थापन होत असल्याचा आरोप गेली आठ वर्षे होत होता. या आरोपामध्ये कदाचित तथ्य असू शकेल, असा संशय मलिकांच्या मुलाखतीच्या निमित्ताने बळावला हे खरे.

**गृहमंत्रालयाच्या चुकीमुळे ४० जवानांना प्राण गमवावे लागले**

या मुलाखतीतून मलिकांनी भाजपच्या बेगडी राष्ट्रवादाची

चिरफाड केली आहे. ते म्हणतात, की पुलवामामध्ये दहशतवादी हल्ल्यानंतर त्यांचे मोदींशी बोलणे झाले. ते जिम कॉर्बेटच्या जंगलात होते, तिथून मोदींनी बाहेर पडून एका बुथवरून फोन केला. गृहमंत्रालयाच्या चुकीमुळे ४० जवानांना प्राण गमवावे लागले असल्याचे सांगितल्यावर मोदींनी मलिक यांना गप्प बसण्यास सांगितले. पुलवामाच्या हल्ल्यानंतर केंद्र सरकारने पाकव्याप्त काश्मीरमध्ये सर्जिकल स्ट्राइक करून दहशतवाद्यांचे अड्डे नेस्तनाबूत केले. या शौर्याचे सगळे श्रेय मोदींना मिळाले होते. त्यानंतर लगेचच एप्रिल-मेमध्ये लोकसभेची निवडणूक झाली. त्यात भाजपने ३०३ जागा जिंकल्या. या अभूतपूर्व यशानंतर मोदी जणू देशाचे एकप्रकारे अनभिषिक्त सम्राट झाल्याचे भाजपचे नेते मानू लागले. मलिकांनी मुलाखतीतून कथित सम्राटाने सत्य लोकांपासून लपवून ठेवले, बनावट गोष्टींच्या आधारे राष्ट्रवादाला खतपाणी घातले, त्याचा निवडणूक जिंकण्यासाठी वापर केला असे विविध गंभीर आरोप केल्याचे दिसते.



केंद्रीय गृहमंत्रालयाने केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या जवानांसाठी विमाने दिली असती, तर ४० जवान शहीद झाले नसते. तत्कालीन गृहमंत्री राजनाथ सिंह यांच्या मंत्रालयाने ही विमाने का दिली नाहीत, याचे उत्तर केंद्राने लोकांना दिले नाही. वास्तविक, ही बाबही लोकांसमोर येऊ दिली नाही. पुलवामामध्ये जवानांच्या ताफ्यात ३०० किलो 'आरडीएक्स' स्फोटकांनी भरलेली कार घुसली, तिचा स्फोट झाला. हे 'आरडीएक्स' पाकिस्तानातून आले होते. त्यामुळे पाकिस्तानचा या हल्ल्यामध्ये हात होता, हे स्पष्ट झाले होते. ही स्फोटकांनी भरलेली कार दहा-बारा दिवस काश्मीरच्या रस्त्यांवर फिरत असतानादेखील सुरक्षा यंत्रणांना कसे कळले नाही? हे गुप्तचर यंत्रणांचे अपयश होतेच. पण त्यात देशद्रोह्यांचाही सहभाग होता हे समजण्यासाठी फार शक्कल लढवण्याची गरज नाही. पुलवामाचा हल्ला हे कारस्थान होते. मग त्यामध्ये कोण-कोण सामील होते? लाचखोरींची पाळेमुळे कुठवर गेली होती? गुप्तचर यंत्रणा नाकाम का ठरली? सुरक्षा यंत्रणा बेफिकीर का होती? असे अनेक प्रश्न उभे राहतात, त्याची आजपर्यंत केंद्र सरकारने उत्तरे दिलेली नाहीत.

**पुलवामाच्या हल्ल्याला जबाबदार कोण?**

पुलवामाच्या हल्ल्याला जबाबदार कोण, याची चौकशी होऊन संशयितांना कठोर शिक्षा झाल्याचे ऐकिवात नाही. असे असेल, तर भाजपने पुलवामातील हल्ला निवडणूक जिंकण्यासाठी 'वरदान' मानला का? जवानांच्या मृत्यूपेक्षा निवडणूक अधिक महत्त्वाची होती का? स्फोटकांनी भरलेली कार सुरक्षा यंत्रणांनी वेळीच ताब्यात घेतली असती तर हल्ला झाला नसता. मग केंद्र सरकार व भाजपला मतदारांना राष्ट्रवादाचे भावनिक आवाहन करता आले नसते. सर्जिकल स्ट्राइक झाला नसता, पाकिस्तानला धडा शिकवल्याचे सांगून स्वतःची पाठ थोपटून घेता आली नसती. पुलवामा हल्ल्याचा लोकसभा निवडणुकीत राजकीय वापर करता आला नसता. तसे झाले असते, तर भाजपला तीनशेहून अधिक जागा जिंकण्याची संधी मिळाली असती का, असे सगळे प्रश्न मलिकांनी मुलाखतीतून अप्रत्यक्षपणे विचारले आहेत.

**...तर मोदींकडून लोकांची दिशाभूल होत आहे का?**

मोदींचा चेहरा, राष्ट्रवाद म्हणजे देशाला सर्वोत्तम प्राधान्य, मोदींची स्वच्छ प्रतिमा म्हणजे 'ना खाऊंगा ना खाने दुंगा' हा लोकांना भिडणारा नारा, केंद्राच्या सामाजिक योजना आणि जातींची समीकरणे या पाच मुद्यांच्या आधारे २०१४ नंतर भाजपला निवडणुकांमध्ये यश मिळाले आहे. योजना आणि जात या दोन्ही मुद्यांशी मलिकांचा संबंध नाही. उर्वरित तीनही मुद्यांचा बुरखा मलिकांनी फाडल्याचे दिसते. लोकांशी, लष्कराशी इमानदार राहण्याचा देखावा उभा करून भाजपने २०१९ मध्ये लोकसभेची निवडणूक जिंकल्याचे मलिक सूचित करत असावेत. मलिकांनी भाजपच्या बनावटी राष्ट्रवादावरच नव्हे, तर भाजप नेत्यांच्या भ्रष्टाचारावरही बोट ठेवले आहे. मोदी भ्रष्टाचारी असल्याचे मलिकांनी मुलाखतीत कुठेही म्हटलेले नाही. पण त्यांच्या डोळ्यादेखत त्यांच्याच नजिकचे लोक भ्रष्टाचार करत असूनही ते दुर्लक्ष करतात, असा आरोप मलिकांनी केलेला आहे. हे खरे असेल, तर मोदींकडून लोकांची दिशाभूल होत आहे का, असा प्रश्न निर्माण होतो. मोदींसारख्या शक्तिमान नेत्याला भाजपच्या नेत्यांचा भ्रष्टाचार थांबवला येत नाही यावर लोकांनी विश्वास कसा ठेवायचा? मलिकांनी एकप्रकारे मोदींच्या नेतृत्वगुणांवर शंका घेतली असावी, असे मुलाखत ऐकताना वाटू शकते.

**मोदी स्वतःमध्ये मश्गुल असतात**

भाजपच्या नेत्यांचे म्हणणे असते, की राजकीय पक्षांमध्ये घराणेशाही असून पक्षप्रमुखांचा मुलगा-मुलगी, अन्य नातेवाईक आपापले आर्थिक हितसंबंध जपत असतात. मोदींना असे हितसंबंध

जपण्याची गरज नाही. मोदी फकीर आहेत, ते भ्रष्टाचार करणार नाहीत. भाजपच्या म्हणण्यामध्ये तथ्य असू शकेल. मलिकांचे म्हणणे असे, की मोदींच्या अवतीभोवती भ्रष्टाचार होत असेल, तर त्याविरोधात मोदी पावले का उचलत नाहीत? तुम्ही लाचखोरी करत नसाल. पण तुमच्या नावाने कोणी पैसे खिशात टाकत असेल, तर हा गैरप्रकार थांबवण्याची जबाबदारी तुम्ही घेतली पाहिजे. मोदी ही जबाबदारी घेत नाहीत. ते स्वतःमध्ये मश्गुल असतात. मलिकांनी आपले म्हणणे सिद्ध करण्यासाठी उदाहरणही दिले होते. त्यावेळी भाजपने राम माधव यांना जम्मू-काश्मीरचे प्रभारी केले होते. इथे एका कंपनीची विमा योजना लागू करण्यासाठी मलिकांना कोणी तरी ३०० कोटी रुपयांची ऑफर दिली होती, असा दावा मलिकांनी केला आहे. राम माधव यांनी पैशांची ऑफर दिल्याचे मलिकांनी कुठेही म्हटलेले नाही. पण राम माधव सकाळी सात वाजता त्यांना भेटायला गेले होते व त्यांनी विमा योजनेची तरफदारी केल्याचे मलिकांचे म्हणणे होते. आता हे प्रकरण गंभीर बनले असून सीबीआयने मलिकांच्या विधानाची दखल घेतली आहे. मलिकांना 'सीबीआय'ने चौकशीसाठी बोलावले आहे. मलिकांनी मुलाखतीमध्ये त्यांची चौकशी होऊ शकते, त्यांना तुरुंगात टाकले जाऊ शकते अशी शक्यता व्यक्त केली होती.



**पण भाजपचे नेते भ्रष्टाचार करत असतील तर...**

मलिकांनी मुलाखत दिल्यानंतर कथित भ्रष्टाचाराच्या प्रकरणाची 'सीबीआय'ने दखल कशी घेतली? मलिकाच्या दाव्यानुसार, कथित लाचखोरीचा प्रकार ऑगस्ट २०१९ पूर्वी घडलेला आहे. मग तीन वर्षांनंतर केंद्रीय तपास यंत्रणांना जाग कशी आली? किंवा केंद्र सरकारला आत्ता चौकशी करावीशी का वाटली? मग मलिक म्हणतात त्याप्रमाणे मोदींनी त्यावेळी या प्रकरणाकडे दुर्लक्ष केले का? गोव्याचे राज्यपाल असताना मलिक यांनी राज्य सरकारमधील कथित भ्रष्टाचाराची माहितीही मोदींना दिली होती, असा दावा त्यांनी केला आहे. त्याबाबत केंद्र सरकारने काहीही केले नाही असे मलिकांना म्हणायचे आहे. मलिकांच्या मुलाखतीमध्ये मोदी भ्रष्टाचाराच्या मुद्याकडे फारसे गांभीर्याने पाहात नाहीत, असा दावा करण्यात आला आहे. मोदी जाहीरसभांमध्ये स्वच्छ कारभाराबद्दल नेहमी बोलतात. काँग्रेसच्या घराणेशाहीबद्दलही बोलतात. गांधी कुटुंबाच्या कथित भ्रष्टाचारावर बोट ठेवतात. मलिकांनी मात्र मोदींकडे अंगुलीनिर्देश केला आहे. सर्वोच्च न्यायालयामध्ये १४ विरोधी पक्षांनी 'सीबीआय' आणि 'ईडी'च्या गैरवापराविरोधात याचिका केली होती. अधिक पुरावे जमा करून मग पुन्हा याचिका करा, अशी सूचना न्यायालयाने केल्यामुळे मूळ याचिका मागे घेण्यात आली. दोन्ही केंद्रीय तपास यंत्रणांनी दाखल केलेल्या गुन्ह्यांमध्ये ९५ टक्के गुन्हे विरोधी पक्ष नेत्यांविरोधातील आहेत, अशी आकडेवारी याचिकेमध्ये देण्यात आली होती. विरोधी पक्षांचे नेते भ्रष्ट असू शकतील म्हणून सीबीआय व ईडीकडून कारवाई होत असेल. पण भाजपचे नेते भ्रष्टाचार करत असतील, तर त्यांच्याविरोधात या यंत्रणा तत्परतेने कारवाई का करत नाहीत, हा प्रश्न उपस्थित करता येऊ शकतो. मलिकांना भाजपच्या नेत्याने पैसे देऊ केले होते व त्याची माहिती मलिकांनी मोदींना दिली असेल, तर या प्रकरणाची केंद्र सरकारने तातडीने दखल का घेतली नाही, असाही प्रश्न निर्माण होऊ शकतो.

**राहुल गांधींची अप्रत्यक्षपणे मोदींच्या स्वच्छ कारभारावर शंका**

मलिकांनी अदानी समूहावरून होत असलेल्या आरोप-प्रत्यारोपांवरही टिप्पणी केली आहे. त्यांचे म्हणणे आहे, की अदानी प्रकरणामध्ये काहीतरी काळेबेरे असल्याचे लोकांपर्यंत पोहोचू लागले आहे. अदानी प्रकरणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याची शंका लोकांना येऊ लागली असून ही बाब गावागावांपर्यंत गेली आहे. आगामी लोकसभा निवडणुकीत या प्रकरणाचा भाजपला मोठा फटका बसू शकतो. अदानी प्रकरणावर काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी लोकसभेत सविस्तर बोलले. त्यावर भाजपमधून तीव्र प्रतिक्रिया उमटली. राहुल गांधींनी अप्रत्यक्षपणे मोदींच्या स्वच्छ कारभारावर शंका घेतली. राहुल गांधींनी मोदींविरोधात आरोप केल्यामुळे भाजपनेही आक्रमक भूमिका घेतल्याचे पाहायला मिळाले. आता राहुल गांधींना मानहानीच्या प्रकरणात दोन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. मलिक म्हणतात, विरोधी पक्षांनी लोकसभेची निवडणूक एकत्र लढवली, तर भाजपला निवडणूक जिंकणे कठीण होईल. हा मुद्दा विरोधी पक्षनेत्यांमध्ये चर्चिला जात आहे. जनता दल (संयुक्त)चे प्रमुख नितीशकुमार यांनी दिल्लीमध्ये नुकतीच काँग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे व राहुल गांधींची भेट घेऊन विरोधकांच्या एकजुटीवर चर्चा केली होती. ही प्रक्रिया पुढे सुरू राहू शकेल. लोकसभा निवडणुकीत एकास एक उमेदवार दिला, तर भाजपचा पराभव करता येऊ शकेल असा विचार नितीशकुमार यांनी बोलून दाखवला आहे. आता कर्नाटकमध्ये विधानसभा निवडणुका होत असून तिथे कोणाला यश येते यावर नजिकच्या भविष्यातील राष्ट्रीय स्तरावरील राजकारणाची दिशा ठरू शकेल. सत्यपाल मलिक यांच्या मुलाखतीने पंतप्रधान मोदी, केंद्र सरकार व भाजपविरोधातील दबलेल्या आवाजाला वाट करून दिली, असे म्हणता येऊ शकेल.

**(लेखक राजकीय अभ्यासक आहेत.)**

# ‘मूलभूत रचनेत’ आर्थिक समानतेला स्थान का नाही?



प्रा.एच.एम. देसरडा

**संसद, सरकार व न्यायसंस्था कोणासाठी? या तिन्ही संस्थाचे प्रयोजन राष्ट्रातील जनतेचे व्यापक व दीर्घकालिक हित रक्षण, संवर्धन करणे; त्यासाठी नैसर्गिक व मानवी संसाधनांची गुणवत्ता जोपासणे, सुधारणे यास अव्वल प्राधान्य असावे. समन्यायी शाश्वत विकास हे त्यांचे संविधानात्मक दायित्त्व आहे. एकीकडे या तिन्ही संस्थात काम करण्यासाठी निवड, नियुक्त, नेमणूक झालेले लोकप्रतिनिधी, न्यायाधीश, नोकरशहा, तंत्रज्ञ, व्यावसायिक देशातील पहिल्या पाच टक्के सधन, श्रीमंत वर्गात आहेत. दुसरीकडे देशातील ९० टक्के जनतेचे दरमहा कौटुंबिक उत्पन्न दहा हजार रुपयांपेक्षा कमी आहे. वरच्या दहा टक्क्याकडे ८० टक्के संपत्ती, ७० टक्के उत्पन्न एकवटले आहे. आजही ६० टक्के शेतजमिनीची मालकी त्यांच्याकडे आहे, जे शेतात प्रत्यक्ष राबत, घाम गाळत नाही. परिणामी, प्रचलित लोकशाही ही धनदांडगेशाही आहे.**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी सत्तांतर होऊन, फाळणीच्या आघातासह भारत ब्रिटिशांच्या गुलामीतून मुक्त झाला. खरं तर भारतीय स्वातंत्र्यचळवळीत विषमता, दारिद्र्य, निरक्षरता, अनारोग्य, हिंसा व शोषणमुक्त नवराष्ट्र निर्मितीचा संकल्प आपल्या स्वातंत्र्यसेनांनी केला होता. शासनप्रशासन, न्यायसंस्था, कायदेमंडळ याची वासाहतिक राजवटीत कार्यरत संरचना स्वतंत्र भारताच्या लोकशाही व्यवस्थेत कशी असावी, याची प्रदीर्घ चर्चा सभेत संविधान संकेत होऊन १९४९ साली संविधान अंगीकृत करण्यात आले.



**गांधी, नेहरू, आंबेडकर**

जेमतेम १२ टक्के साक्षरता असणाऱ्या बहुभाषिक, बहुधर्मीय देशाने प्रौढ मतदानावर आधारलेली संसदीय लोकशाहीप्रणाली स्वीकारली. गेली ७२ वर्ष ही राजकीय लोकशाही व्यवस्था अमलात आहे. पायाभूत संरचना, सेवासुविधांचा प्रचंड वाढविस्तार झाला आहे. मात्र, स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर ना आम्ही महात्मा गांधीच्या कल्पनेचे स्वयंपूर्ण सुखीसमाधानी खेडे, शाश्वत शेती, ग्रामोद्योग उभा केला; ना बाबासाहेबांना अभिप्रेत जात अंधश्रद्धा-अभाव-अन्यायमुक्त शहर! नेहरूनां हवा असलेला आधुनिक, औद्योगिक भारत. ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञानात प्रगत वैज्ञानिक मनोवृत्तीचा भारतीय समाज निर्माण करण्यासाठी अब्जावधी कोटींची गुंतवणूक केली असली तरी दारिद्र्य, कुपोषण वंचना, अभावग्रस्ता यावर आम्हाला मात करता आली नाही. भारत आज जगातील कमालीचा प्रदूषित, बकाल व बेबंद देश आहे. शेतजमिनीची प्रंचड धूप, वनसंहार, वन्यजीव व जैवविविधतेचा मोठा ऱ्हास, नद्यांमधील वाळूसह खनिजसंपदेची लूट, हिमालय, अरावली ते पश्चिम घाटांसह सर्व पर्वत रांगावर आक्रमण इत्यादींमुळे भारतावर एक अभूतपूर्व परिस्थितिकी व पर्यावरणीय संकट ओढवले आहे.

**शंभर कोटी भारतीय दैन्यावस्थेत**

भारताचे संविधान 'आम्ही भारताचे लोक सर्व नागरिकांस सामाजिक, आर्थिक व राजनितीक न्याय, विचार अभिव्यक्ती स्वातंत्र्य; दर्जा व संधीची समानता प्रवर्धित करण्याचा निर्धार करतो', अशा प्रास्ताविकेने प्रारंभ होते. आज १४२ कोटी भारतीयांची स्थिती नेमकी काय आहे? तर त्यातील तब्बल १०० कोटी (होय, एक अब्ज) दारिद्र्य, भूक, कुपोषण, अनारोग्य, अन्याय, हिंसा, शोषणारी समस्याग्रस्त व त्रस्त आहेत. सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वर्गीकरण केल्यास सहज कळेल की ते आहेत. शेतकरी, शेतमजूर, कोळी, वनकाम, घरकाम, बांधकाम लहानमोठे व्यवसाय करणारे, हातावरपोट असणारे दलित, आदिवासी, स्त्रिया, मागास जातीजमाती हा बहुजन कष्टकरी समुदाय. संविधान सभेतील बहुसंख्य सदस्य या उपेक्षित जातीवर्गांविषयी सहानुभूती बाळगणारे असले तरी ते उच्चभ्रू जातीवर्गाचे, जमीनजुमला संपत्तीधारक महाजनअभिजन वर्गातून आलेले होते. डॉ. आंबेडकरांसारखे दलित वर्गातील आणि जयपालसिंगसारखे आदिवासींचे नेते सोडले, तर आर्थिक व सामाजिक शोषणाविरुद्ध ठोस तरतुदी संविधानात प्रस्तावित करण्यात अग्रेसर नव्हते. हे ढळढळीत वास्तव नाकारण्यात काय हशील?

१३ डिसेंबर १९४६ ला जवाहरलाल नेहरू यांनी 'ध्येय आणि उद्दिष्टासंबंधी' जो ठराव मांडला त्यात सर्वांना संसाधनाच्या समानहक्काचा मुद्दा नव्हता. म्हणजे जमीन व अन्य साधनसंपत्तीच्या मालकीवर निर्बंध अथवा सामूहिक, राष्ट्रीय मालकीचा मुद्दा नव्हता. अध्यक्ष राजेंद्रप्रसाद यांनी डॉ. आंबेडकरांना त्यांची भूमिका मांडण्यास पाचारण केले व दहा मिनिटांचा अवधी दिला. तेव्हा त्यांनी 'या देशात सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी शेती व उद्योगांचे राष्ट्रीयकरण केले जावे' असे ठामपणे सुचविले. पुढे २४ जानेवारी १९४७ ला मूलभूत अधिकार उपसमितीत हा विषय परत चर्चेला आला. दरम्यानच्या काळात बाबासाहेबांनी एक सविस्तर निवेदन तयार केले. 'स्टेटस ॲण्ड मायनॉरिटीज, व्हॉट ऑर देअर राइटस ॲण्ड हाऊ टू सेक्युअर देम इन द कॉन्स्टीट्युशन ऑफ इंडिया' या शीर्षकाच्या निवेदनात ते मांडले. तथापि, तत्कालीन राजकीय धबडग्यात त्याचा आवश्यक तो पाठपुरावा झाला नाही. मात्र, बाबासाहेबांना याची कायम जाण व भान होते, की समता व सामाजिक न्याय याविषयी कितीही उदात्त तात्त्विक बाबी संविधान सभेने स्वीकारल्या, तरी सामाजिक-आर्थिक लोकशाही प्रस्थापित झाल्याखेरीज राजकीय लोकशाहीचा डोलारा टिकणार नाही!

**गांधीची दिशादृष्टी**

यासंदर्भात एक बाब आवर्जून लक्षात घेतली पाहिजे, की संविधान निर्मिती प्रक्रियेत महात्मा गांधींचा सहभाग प्रभाव फार कमी आहे. एकदा संविधान सभेच्या काही सदस्यांनी त्यांच्याशी चर्चा केली तेव्हा गांधी म्हणाले, 'तुमच्या दस्तऐवजात खेडं, शेती व शेतकऱ्यांविषयी काय प्रावधान आहे.' तेव्हा ते कानकोंडे झाले. घाईघाईने भाग चार जो 'राज्य धोरणाची निदेशक तत्त्वे' असा उल्लेख आहे. खरं तर हा सर्वच भाग वांछीत श्रेणीत मोडतो. मूलभूत अधिकाराप्रमाणे ते कायदेशिररित्या बंधनकारक नाहीत. होय, न्यायालयाने याबाबत सकारात्मक भूमिका घेत अंमलबजावणीचे निर्देश दिले आहेत. मात्र, संपत्ती व उत्पन्नाच्या वाढत्या केंद्रीकरणाची स्थिती लक्षात घेता, न्यायालये मुक्त बाजारपेठेचे, भांडवली व्यवस्थेच्या विस्तारिकरणाचे समर्थक असल्याचे जाणवते. मुख्य म्हणजे संपत्ती व उत्पन्नाच्या केंद्रीकरणाबाबत ठोस भूमिका घेत नाही

भूमाफिया, बिल्डर, विकासक, सिनेकलावंत, कंत्राटदार, उद्योजक, व्यावसायिक, नोकरशहा व राजकीय नेते यांच्या संपत्तीत रातोरात, हातोहात जी अब्जावधीची वाढ होत आहे त्याची न्याय संस्थेने स्वतःहून (सुओमोटो) दखल घेतली पाहिजे. न्यायसंस्थेच्या स्वतंत्रता स्वायत्ततेचे हे द्योतक मानता येईल. खरं तर सर्वत्र बोकाळलेल्या भ्रष्टाचाराची दखल घेत शहानिशा करणारा उच्चपदस्थ आयोग सर्वोच्च न्यायालयाने नेमावा.

**संसद-न्यायालय संघर्ष**

विधायिका (संसद व विधीमंडळे) कार्यपालिका व न्यायापालिका ही राज्याची संविधान सम्मत व्यवस्था आहे. यात अधिकारांचे विभाजन व कार्यकक्षा मुक्रर केली गेली. सर्वांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय देण्यासाठी संसद व विधीमंडळांनी भूसुधार (लँडरिफार्म) कायदे केले, त्यात कुळांना जमीन; जमीनधारणक्षेत्रावर मर्यादा, फेरवाटप याला सुरुवात करताच जमिनदारांनी न्यायालयात आव्हान दिले. मात्र, जनहितार्थ असे कायदे करण्याचा संसदेचा अधिकार मान्य करून न्यायालयांनी त्यास अशा सूचित (उदाहरणार्थ ९ वी) समाविष्ट करण्यास मान्यता दिली, की जेथे न्यायालये हस्तक्षेप करणार नाही. पहिली दोन दशके सर्वोच्च न्यायालयाने विधायिकेस आडकाठी केली नाही. मात्र, १९६७ साली गोलकनाथ निकालात पूर्वीचे निकाल फिरवत 'मूलभूत अधिकार' संसोधन करता येणार नाही, अशी भूमिका घेतली. त्यानुसार पुढे बँकांचे राष्ट्रीयकरण व संस्थानिकांचे तनखे रद्द करण्याच्या सरकारच्या निर्णयास घटनाबाह्य ठरवण्यात आले. ते निकाल निष्प्रभ व्हावे यासाठी इंदिरा गांधी यांनी २४ वी, २५ वी व २६ वी घटनादुरुस्ती विधेयके मंजूर करून घेतली. याचकाळात कासरगोड मठाची जमीन काढून घेण्याचा कायदा केरळ राज्याने केला. २९ व्या घटनादुरुस्तीद्वारे त्या कायद्याला ९ व्या सूचित समाविष्ट केले गेले.

**'केशवानंद' निकालाचा कलगीतुरा**

गोलकनाथ खटल्याचे घटनापीठ ११ न्यायाधीशांचे होते. त्यात 'मूलभूत हक्क' हा मुख्य मुद्दा होता, तर केशवानंदमध्ये 'मूलभूत रचना' (बेसिक स्ट्रक्चर) प्रश्न नव्याने उपस्थित केला. साहजिकच त्यापेक्षा अधिकसंख्येचे घटनापीठ नेमणे अपरिहार्य झाले आणि १३ न्यायाधीशांचे घटनापीठ गठण होऊन अनेक महिने सुनावणी झाली. अर्थात, 'मूलभूत रचनेची' विवक्षित, नेमकी शब्दबद्ध व्याख्या संविधानात अगर निकालपत्रात नाही. त्यासंदर्भात वेळोवेळी जे मुद्दे प्रकर्षाने मांडले गेले त्याचा गोषवारा असा सांगितला जातो: १) संघराज्याचे तत्त्व, २) धर्मनिरपेक्षता, ३) वैधानिक/प्रशासकीय अधिकारांची विभागणी, ४) न्यायपालिकेचे स्वातंत्र्य आणि ५) मुक्त, निष्पक्ष, कालबद्ध निवडणुका. यात 'कायद्याचे राज्य' याचादेखील समावेश केला जातो. या सातशे पानी निकालपत्राचा एका वाक्यात सार आहे: राज्यघटनेची मूलभूत चौकट संसद बदलू शकत नाही आणि चौकट/रचना/मूलतत्त्व (उर्वरित पान २१ वर...)

# मलिक, मालिक आणि हतबल राजा



संजय पवार

**अंकित माध्यमे, आयटी सेल व शाहंचे बुथस्तरीय संघटन यातून मलिकांच्या आरोपांच्या चिंधड्या उडवून त्यांना देशद्रोही ठरवले जाईल. त्यांना कायद्याच्या, तुरुंगाच्या कचाट्यात अडकवून हिरो न बनवता छोट्या छोट्या गटांद्वारे त्यांचे प्रतिमाभंजन केले जाईल. पण मोदींचे हे चुकलेच, मोदींना उत्तर द्यावेच लागेल असे सडेतोड न म्हणता, लिहिता आडवळणाने 'लेकी बोले सुने लागे छाप' असे लिहिणारे गरिबांचे तळवलकर वगैरे कार्यरत आहेत, तोवर मोदी व मोदीभक्त हे मलिकांना समाजवादी काँग्रेसी सेक्युलर बगलबच्चा म्हणून हलक्यात काढणार आणि बघता बघता मलिक हे क:पदार्थ ठरवले जातील. मलिक सबका मालिकांसमोर हत:प्रभ होतील.**

गेला जवळपास महिनाभर जम्मू कश्मिरचे माजी राज्यपाल सतपाल मलिक यांनी करण थापर या अभिजन मुलाखतकारास (करण थापर यांना राजकीय सिमी गरेवाल म्हणता येईल?) एक मुलाखत दिली.

या मुलाखतीने राजकीय, सामाजिक व समाजमाध्यमात हलचल झाली. खळबळ माजली असं म्हणता येणार नाही. कारण मुलाखत सरकार विरोधी, थेट पंतप्रधान व राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार यांच्यावर आरोप करणारी असल्याने अंकित माध्यमांनी त्याकडे सोयिस्कर दुर्लक्ष केलं. पण अलीकडे छापील व इलेक्ट्रॉनिक माध्यमांपेक्षा समाजमाध्यमे व अनेक युट्यूबर हे लोकप्रिय आहेत. त्यांची व्हायरल होण्याची शक्ती अधिकच दिसते त्याहून अधिक ती पायरेटेड पुस्तके, सिनेमे यांच्यागतीने व्हायरल होत असते. मलिकांची मुलाखत अशी अंडरग्राऊंड ॲक्टिव्हीटीसारखी देशभर पसरली. सरकारने काहीच झालं नाही असं दाखवत काही दिवस काढले. मग, लगेच मलिकांच्या विश्वासार्हतेवर एक प्रतिक्रिया येऊन गेली. नंतर परत शांतता. पण दरम्यान अभिजन थापर पासून, इक्के दुक्के युट्यूबर, ब्लॉगर, स्तंभलेखक असे पार छोटे पाझर तलाव या मुलाखतीला प्रचारित करू लागले. तसं मग गेल्या आठवड्यात अचानक गृहमंत्री अमित शहा यांनी सवाल केला, की पदावर असताना का नाही बोलले? हे म्हणजे संपूर्ण रामकथा ऐकून शेवटी विचारायचं, की पण रामाची सीता कोण? तसं झालं!



**मला गप्प बसण्याचा सल्ला कम आदेश दिला**

सन्मानीय गृहमंत्र्यांनी मुलाखत पाहिली नसावी. कारण मुलाखतीत मलिकांचा आरोप असा होता, की पुलवामा घडल्याक्षणीच मी पंतप्रधानांना ही आपली चूक, हलगर्जीपणा आहे. विमानाने न पाठवता जवान रस्तामार्गे पाठवल्यामुळे व रस्ता सुरक्षेच्या खबरदारीतही हेळसांड झाल्याने हे घडलंय. यावर मलिकांचे म्हणणे, की पंतप्रधान व त्यानंतर अजित दोभाल यांनी मला गप्प बसण्याचा सल्ला कम आदेश दिला. त्यांच्या या आदेशातून मला त्यांना या घटनेचे राजकारण करून येऊ घातलेल्या निवडणुकीत त्याचा फायदा घ्यायचा असावा, असा संशय आला. मी पदावर असल्याने मला गप्प बसणे भाग होते. आता जर पंतप्रधान व राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांनीच गप्प

बसा सांगितल्यावर आज अमित शहाजी पदावर असताना का नाही बोलले? असा प्रश्न कसा विचारतात? या प्रश्नाचे उत्तर मलिकांनी दिलेच आहे. गप्प बसलेत ते पंतप्रधान व राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार!

जम्मू-काश्मिरमधून गोवा व गोव्यातून ईशान्य भारतात राज्यपाल म्हणून नियुक्ती करून गप्प बसण्याचे बक्षिसच मोदींनी मलिकांना दिले होते का? विविध राज्यात पदावर असतानाही त्यांनी काही विधाने केलीच होती. यावेळी थापरांशी बोलताना तत्कालीन भाजप प्रभारी राम माधव यांच्यावरही जम्मू-कश्मिरमध्ये एका प्रकल्प मंजुरीसाठी डिल करण्यासंदर्भातील दबावाचे आरोप केलेत. राम माधव संघातून भाजपत व भाजपतून पुन्हा संघात कार्यरत झालेत. ते मलिकांवर मानहानीचा दावा करणार आहेत.

आता मलिक हे कधीकाळचे जेपी आंदोलनातले लोहियावादी. मग काँग्रेस, सपा, भाजपा असा प्रवास. जम्मू-काश्मिरात भाजपा मेहबूबा युतीचे सरकार बनविण्यात त्यांनी कोश्यारीगिरी केलेली! त्यामुळे मलिक हे काही जेपी नव्हेत, अण्णा हजारे सोडा, खैरनारही म्हणता येणार नाहीत. मात्र, त्यांनी भारतीय जनता पार्टीतले दोन मालिक मोदी व शहा यांना कामाला लावलेय एवढे नक्की! त्यात ते आता भाजपाविरोधकांसाठी प्रचार करणार. शिवाय जाटांच्या संघटनांना साथीला घेऊन जातीय राजकारणाची फोडणी देत शाह-मोदी या मालिक लोकांच्या धर्मवादी राजकारणाला शह द्यायचा प्रयत्न सुरू केलाय.

**मलिक सबका मालिकांसमोर हत:प्रभ होतील!**

मलिक हे मोदी-शाह यांच्यासाठी काही आव्हान वगैरे नाही. अंकित माध्यमे, आयटी सेल व शाहंचे बुथस्तरीय संघटन यातून मलिकांच्या आरोपांच्या चिंधड्या उडवून त्यांना देशद्रोही ठरवले जाईल. पण हे ठरवताना त्यांना कायद्याच्या, तुरुंगाच्या कचाट्यात अडकवून हिरो न बनवता छोट्या छोट्या गटांद्वारे त्यांचे प्रतिमाभंजन केले जाईल आणि जोपर्यंत आपल्याकडे ट्रम्पुल्या म्हणून ट्रम्पचे वस्त्रहरण करणारे; पण मोदींचे हे चुकलेच, मोदींना उत्तर द्यावेच लागेल असे सडेतोड न म्हणता, लिहिता आडवळणाने जगभर असे ट्रम्प, पुतिन आहेत, असे 'लेकी बोले सुने लागे छाप' लिहिणारे गरिबांचे तळवलकर वगैरे कार्यरत आहेत, तोवर मोदी व मोदीभक्त मुस्लिमद्वेष्टा नवश्रीमंत उच्चवर्णीय हे मलिकांना समाजवादी काँग्रेसी सेक्युलर बगलबच्चा म्हणून हलक्यात काढणार आणि बघता बघता मलिक हे क:पदार्थ ठरवले जातील. मलिक सबका मालिकांसमोर हत:प्रभ होतील.

**धाकट्या पवारांनी एव्हीएम मशिनवरपण विश्वास दाखविला**

राष्ट्रीय स्तरावर मलिक व मालिक हे चर्चाविश्वात असतानाच महाराष्ट्राचे जाणते राजे आदरणीय शरद पवार यांनी अदानी संदर्भात काही विधाने करत विरोधी पक्ष, विशेषत: राहुल गांधी यांना अडचणीत आणलं. त्या विधानाने अदानी-मोदी संबंधाबाबत विरोधकातच मतभेद असे चित्र उभे तर राहिलेच, शिवाय मलिक प्रकरणावरून चर्चेत आलेले मोदी-शाह हे मालिक, अदानी व मलिक या दोन्ही विषयातून अलगद बाजूला झाले व पवारच चर्चेत आले! आता पवार चर्चेत आले म्हटल्यावर राष्ट्रवादी काँग्रेस, महाविकास आघाडी व महाराष्ट्राचे राजकारण चर्चेत आले. कारण थोरल्या पवारांनी अदानींचा बचाव केला, त्याच्या आगेमागेच धाकट्या पवारांनी मोदींच्या डिग्रीचा विषय बिनमहत्त्वाचा ठरवत एव्हीएम मशिनवरपण विश्वास दाखविला.

पवार काका पुतण्यांच्या या वक्तव्याने घड्याळाचे काटे कमळाचा आकार घेणार अशा चर्चांचे पेव फुटले. त्याला वेळोवेळी अजित पवार यांनी बोलाफुलाला गाठ पडावी, असे प्रसंग घडवले. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे भविष्य वर्तवत जर तरच्या भाषेत विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अपात्र ठरले, तर अजित पवार चाळीस घड्याळधारींसह नवे मुख्यमंत्री होतील व फडणवीस उपमुख्यमंत्रीपदी कायम राहतील, असा धुरळा उडवला गेला.

या धुरळ्यात उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे, अजित पवार, बावनकुळे, चंद्रकांत पाटील, विखे पाटील यांसह संजय राऊत, संजय शिरसाट, गोगावले, म्हस्के, जयंत पाटील ते थेट शरद पवार अमित शाह, मोदी यांचीही नावे येत जात राहिली.

**'भाकरी फिरवा, कारभारी बदला'**

महाविकास आघाडी व शिंदे भाजप युती अशी एकाचवेळी दोन्ही ठिकाणी संशय व गोंधळाची परिस्थिती काका पुतण्यांनी केल्याने राष्ट्रवादी वगळता सर्वच पक्ष वावटळीत सापडल्यासारखे झाले. माध्यमं व विश्लेषकही मग आपआपल्या मगदूराप्रमाणे या गोंधळात नवीन गोंधळ घालू लागले. ते सर्व आज घडिलाही तसेच चालू आहे. मतदार तर विटलेत. पण विटून करणार काय? ते बघणार तरी कुठे नि कुणाकडे?

अशातच आता आदरणीय शरद पवारांनी भाकरी फिरवण्याची भाषा केलीय! तीही तरुण कार्यकर्त्यांसमोर. 'भाकरी फिरवा, कारभारी बदला' हे पवारांच्या राजकारणातले परवलीचे शब्द आहेत. अजित पवारांचा राजकीय क्षितिजावर उदय झाल्यावर पवारांचे तोवरचे गल्ली ते दिल्ली डावे उजवे हात असलेले सुरेश कलमाडी अस्वस्थ झाले. कालांतराने ती वाढत गेली. पुणे मनपा व कलमाडी हे समीकरण मोडीत काढून अजितची प्रतिष्ठापना करायची असल्याने पवारांनी कारभारी बदला, अशी हाळी दिली आणि कलमाडी पुणे मनपा, पिंपरी चिंचवड क्षेत्र एवढेच नव्हे, तर जिल्ह्यातूनच वजा होत गेले. याचा कळस कॉमनवेल्थ गेम यशस्वी केल्यानंतरही कलमाडींना तिहारची हवा खावी लागली. कारभारी नुस्ताच बदलला नाही, तर तो राजकारणातूनच उखडून टाकला.

सध्याच्या भाकरी फिरवा या आदेशामागे जाणता राजाची हतबलता दिसतेय. कारण अजित पवार व राष्ट्रवादीतून कमलदलाकडे जाऊ पाहणाऱ्यांच्या हालचाली पाहून साहेबांनी कुठलाही सूचक इशारा, संकेत न देता ज्यांना जायचंय त्यांना रोखणार नाही. पण पक्ष म्हणून भाजपशी संग करणार नाही. आता हे म्हणजे घराचे वाटे होणार नाहीत, ज्याला घरात राहयचं नाही त्याने दुसरे घर बघावे, असं म्हणण्यासारखं झालं. दुसऱ्या भाषेत सांगायचं, तर विचारविरोधी घरात सोयरिक जमायची नाही हे काकांचे ठाम मत. परवा तरुण कार्यकर्त्यांना त्यांनी फुले-शाहू-आंबेडकर म्हणजे नेमके काय ते समजून घ्या, त्या विचारावर पक्ष उभा आहे. तो विचार मान्य नाही तिथे कसं जाणार वगैरे बोलले साहेब.

याला संदर्भ होता आदल्याच आठवड्यात एका जाहीर

मुलाखतीत अजितदादा म्हणाले, की २०१४ ला बाहेरून पाठिंबा देताना, १९ ला पहिलं ८० तासांचं सरकार, नंतर सेनेसोबतच अडीच वर्षाचं सरकार हे हिंदुत्ववादी पक्षांसोबतच स्थापलं होतं. तेव्हाच सेक्युलर वा फुशाआं विचारांना बायपास केलंय. त्यामुळे यापुढे ती अडचण येऊ नये. २४ ला मुख्यमंत्री व्हायला आवडेल का? या प्रश्नावर क्षणार्धात दादा वदले, २४ कशाला? मी उद्याच्याला तयार आहे!

काँग्रेसचे पटोले सोडले तर कुणीही व्यक्त होत नाहीए व माध्यमांनाही काँग्रेस पक्ष महत्त्वाचा वाटतच नाही. त्यांचे बूमधारी उबाठा व राष्ट्रवादी यांच्याच मागावर!

**पवारांनी शिल्लकीतून विजयी पताका फडकवल्याचा इतिहास आहे**

सद्याच्या परिस्थितीत शरद पवार हे कधी नव्हे ते एकटे पडलेले दिसतात. बाळासाहेब ठाकरे गेल्यापासून समकालीन राजकीय शत्रू, मित्र नाही. सोनिया गांधींचे आजारपण व विकल काँग्रेस यात राहुल गांधीचे अधिकृत अनधिकृत नेतृत्व. भाजपातही समकालीन कुणी नाही. मोदी-शाहंची कार्यपद्धती पाहून त्यांना इंदिरा गांधीकालीन हायकमांडचा काळ आठवत असेल. थोडक्यात, जुने सोबत नाहीत, मधले ऐकत नाहीत अशा वेळी थेट पुढच्या पिढीला भाकर फिरवायचा सल्ला म्हणजे पवारांना स्वत:चाच इतिहास आठवत असावा. पवारांना सोडून जाणे हे प्रकार याआधीही घडलेत. पण पवारांनी शेलारमामांसारखी शिल्लकीतून विजयी पताका फडकवल्याचा इतिहास आहे. पण त्याचबरोबरीने एकदाच ७२ आमदार त्यांना निवडून आणता आले. त्यानंतर ५५/६५ इतपतच मजल गेली.

सध्याच्या अस्थिर परिस्थितीत आणि वर्षभरावर लोकसभा निवडणुका आल्या असताना पवार राष्ट्रीय राजकारणात भाकरी फिरवणार का सध्या राष्ट्रीय दर्जा गमावलेल्या पक्षाची महाराष्ट्रातील संभ्रमावस्था संपविण्यासाठी महाराष्ट्रातल्या भाकरीवर लक्ष केंद्रीत करणार?

कारण सर्वोच्च न्यायालयाच्या जो काही निकाल येईल त्यानंतरच पुढील लोकसभा व विधानसभेचे बिगुल वाजेल. पवारांच्या दीर्घायुची कामना करतानाच वयोमानानुसार ते हे अखेरचे युद्ध लढून सक्रिय राजकारणातून बाहेर पडतील? की ते शेवटच्या श्वासापर्यंत भाकरी फिरवत व कारभारी बदलत राहतील?

**(लेखक ज्येष्ठ नाटककार व विचारवंत आहेत.)**

# ‘मूलभूत रचनेत’ आर्थिक समानतेला स्थान का नाही?

**(पान १८ वरून)** काय हे आम्ही (न्यायसंस्था) ठरवू!

गोलकनाथ निकालानंतर सरकारने ज्या ज्या वेळी सर्वोच्च न्यायालयाने कायदा अवैध ठरविला. त्या त्या वेळी त्याला नवव्या परिशिष्टात समावेश करून कायदेशीर मार्ग काढला. आजमितीला जवळपास ३०० कायद्यांचा यात समावेश केला गेला आहे. बहुतेक वेळेस सर्वोच्च न्यायालयाचा आक्षेप काय होता? विवक्षित कायदा मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करणारा आणि/अथवा मूलभूत चौकट ओलांडणारा असल्यामुळे तो घटनाबाह्य ठरविला जात आहे. येथे हे नमूद करणे आवश्यक आहे, की आजवर संसदेने शंभराहून अधिक संविधानसंसोधन केली आहेत, त्यातील काहीनाच सर्वोच्च न्यायालयाने ‘घटनाबाह्य’ ठरविले. त्यातील एक ठळक म्हणजे ९९ व्या संसोधनाद्वारे केलेला ‘नॅशनल ज्युडीशियल अपांइटमेंट कमिशन’ (राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग) या कायद्यान्वये उच्च व सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नियुक्ती व बदल्या ज्या सध्या न्यायिक वृदांकडून (कॉलेजियम) केली जाते ती सर्वस्वी त्यानीच न करता एक नियुक्ती आयोग (ज्यात कायदामंत्री, सार्वजनिक क्षेत्रातील विख्यात व्यक्ती यांचा समावेश असेल) नेमला जावा, अशी तरतूद आहे. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने तो कायदा न्यायसंस्थेच्या स्वातंत्र्यास बाधक आहे आणि न्यायसंस्थेचे स्वातंत्र्य हा मूलभूत रचनेचा भाग असल्यामुळे त्याचे उल्लंघन करणारा, सबब, घटनाबाह्य आहे. सरकार व न्यायसंस्थेचा वरचष्मा नसलेला स्वायत्त आयोग हा पर्याय का मान्य नाही?

संसद, सरकार व न्यायसंस्था कोणासाठी? या तिन्ही संस्थाचे प्रयोजन राष्ट्रातील जनतेचे व्यापक व दीर्घकालिक हित रक्षण, संवर्धन करणे; त्यासाठी नैसर्गिक व मानवी संसाधनांची गुणवत्ता जोपासणे, सुधारणे यास अव्वल प्राधान्य असावे. समन्यायी शाश्वत विकास हे त्यांचे संविधानात्मक दायित्त्व आहे. एकीकडे या तिन्ही संस्थात काम करण्यासाठी निवड, नियुक्त, नेमणूक झालेले लोकप्रतिनिधी, न्यायाधीश, नोकरशहा, तंत्रज्ञ, व्यावसायिक देशातील पहिल्या पाच टक्के सधन, श्रीमंत वर्गात (आरक्षणांमुळे जवळपास सर्व जाती जमातीतून) आहेत. दुसरीकडे देशातील ९० टक्के जनतेचे दरमहा कौटुंबिक उत्पन्न दहा हजार रुपयांपेक्षा कमी आहे. वरच्या दहा टक्क्याकडे ८० टक्के संपत्ती, ७० टक्के उत्पन्न एकवटले आहे. आजही ६० टक्के शेतजमिनीची मालकी त्यांच्याकडे आहे, जे शेतात प्रत्यक्ष राबत, घाम गाळत नाही. परिणामी, प्रचलित लोकशाही ही धनदांडगेशाही आहे. सोबतच विकासाचे जे निरर्थक वाढवृद्धीप्रवण प्रारूप (ग्रोथ मॉडेल) अट्टाहासाने रेटले जाते ते नैसर्गिक संसाधनांची (जमीन, पाणी, वने, कुरणे, जैवविविधता) यांची बरबादी करणारे असून हवामान बदलाचा परिणाम गोरगरीब जनतेवर सर्वाधिक होत आहे. थोडक्यात, हा विकास नसून विनाश आहे. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करून आपल्या संकुचित स्वार्थासाठी न भांडता (त्यासाठी संविधानाची ढाल न करता) संसद, विधीमंडळे व न्यायपालिकेने ‘आर्थिक समानता’, संपत्ती व उत्पन्नाच्या विकेंद्रीकरणाला ‘मूलभूत रचनेचा’ भाग मानावा. संपत्तीचा अधिकार मर्यादित करून कलम ३६ ते ५१ नुसार कृती पावले उचलावीत; जेणे करून महात्मा गांधी व बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत समतामूलक शाश्वत विकास साध्य होईल. ●●●

**(लेखक विख्यात अर्थतज्ज्ञ असून महाराष्ट्र नियोजन मंडळाचे माजी सदस्य आहेत.)**

# विचार अभिव्यक्ती, विवादाचे स्वातंत्र्य



बी.जी. वाघ

**आपल्या विचारांप्रमाणे वर्तन करणे हा प्रत्येकाचा हक्क आहे. आपण तसे केले नाही, तर दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांना दुष्ट प्रचार करण्याची संधी मिळते. आपले विरोधी मत व्यक्त करण्याचे, नोंदवण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आपल्याला घटनेने दिलेले आहे. आपली उक्ती आणि कृती अर्थातच विवेकपूर्ण असायला हवी. व्यवस्थेला प्रश्न विचारण्याचा हक्क आपल्याला राज्यघटनेने दिला आहे.**

भारतीय राज्यघटना जगातील सर्वोत्तम विचारांचे सार आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय, धर्मातीतता ही तत्त्वे एका रात्रीत निर्माण झालेली नाहीत. त्यासाठी जगभराच्या प्रतिभावंतांनी, शोषित-वंचित घटकांनी शेकडो वर्षे संघर्ष केला आहे. भारतात बुद्धाने सामान्य माणसालाच धर्म, तत्त्वज्ञान आणि विश्वाच्या केंद्रभागी आणले. माणूस धर्मासाठी नाही, धर्म माणसासाठी आहे. इमॅन्युअल कांट या जर्मन तत्त्ववेत्याने म्हटले आहे, की 'माणूस साध्य आहे, साधन नाही.' त्याच्यावर बुद्धाचा प्रभाव होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तत्त्वे फ्रेंच राज्यक्रांतीतून घेतलेली नसून ती बौद्ध तत्त्वज्ञानातून घेतली आहेत, असे म्हटले आहे. त्याचाही अर्थ स्पष्ट आहे. माणसाला पायदळी तुडवून तुम्ही एखाद्या धर्माला, राष्ट्राला महान बनवू शकत नाही. 'स्वातंत्र्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे' या लोकमान्यांच्या दर्पोक्तीला डॉ. आंबेडकरांनी दिलेले उत्तर स्वयंस्पष्ट आहे. कुठल्याही राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक समता व स्वातंत्र्य श्रेष्ठ आहे. स्वातंत्र्य नेमके कुणाचे आणि कोणापासून, हे समजल्याशिवाय राजकीय सत्ता बदलायला काही अर्थ नसतो. समतेशिवाय स्वातंत्र्याला अर्थ नसतो. भेदभावापासून मुक्त असा समाज घडवणे ही स्वातंत्र्याची प्राथमिक गरज आहे. शोषणमुक्त समाज म्हणजेच स्वातंत्र्य असा गहिरा संबंध आहे. गरिबीत मरण्याचे स्वातंत्र्य किंवा भुकेने मरण्याचे स्वातंत्र्य म्हणजे 'भाकरी मिळत नसेल तर केक खा' म्हणण्यासारखे आहे. फ्रान्सच्या महाराणीच्या या अशा विधानामुळेच राज्यक्रांतीला सुरुवात झाली. ती जगातील सर्वांत मूल्याधिष्ठित क्रांती होती. सर्व माणसे जन्माने समान आहेत, असा उद्घोष या क्रांतीने केला. या क्रांतीने जग ढवळून निघाले; परंतु भारतीय समाजव्यवस्था हलली नाही. याचे कारण येथील नागरिकांची गुलामीची मानसिकता. ती धर्मातून आणि परंपरेतून आली आहे. स्वतंत्र विचार करण्याची क्षमता असल्याशिवाय क्रांती होत नाही. त्यासाठी प्रखर इहवादी दृष्टी व तर्कशुद्ध विचार करणे आवश्यक असते. आपल्या अस्तित्वाची तर्कशुद्ध जाणीव म्हणजेच विद्रोह असतो. स्वातंत्र्याचा, समतेचा आणि बंधुत्वाचा. असा सर्वांगीण विचार आपल्या घटनेत आहे. घटनेचे केंद्र आहे माणूस. व्यक्तीच्या स्वातंत्र्याला, समतेला, प्रतिष्ठेला घटनेत सर्वोच्च स्थान दिले आहे. घटनेने विचार व अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याला मूलभूत अधिकार म्हटले आहे. कारण माणसाच्या माणूसपणाचे रहस्यच त्याच्यात आहे. 'ऑन लिबर्टी' या ग्रंथात जॉन स्टुअर्ट मिलने लिहिले आहे, 'If all mankind minus one, were of one opinion, and only one person were of the contrary opinion, mankind would be no more justified in silencing that one person.'

**व्यवस्थेला प्रश्न विचारण्याचा हक्क आपल्याला राज्यघटनेने दिला आहे**

सबंध मानवजात एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला विरोधी मत वा विचार असलेला एक माणूस. तरीदेखील त्याचा आवाज दडपण्याचा अधिकार कोणालाही नाही. विरोधी आवाजापासून तुम्ही मानवजातीला आणि भावी पिढ्यांनाही वंचित करताफ कारण तो आवाज सत्याचा  असू शकतो. आपल्या विचारांप्रमाणे वर्तन करणे हा प्रत्येकाचा हक्क आहे. आपण तसे केले नाही, तर दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांना दुष्ट प्रचार करण्याची संधी मिळते. आपले विरोधी मत व्यक्त करण्याचे, नोंदवण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आपल्याला घटनेने दिलेले आहे. आपली उक्ती आणि कृती अर्थातच विवेकपूर्ण (Rational) असायला हवी. व्यवस्थेला प्रश्न विचारण्याचा हक्क आपल्याला राज्यघटनेने दिला आहे. सॉक्रेटिसने या अपराधासाठी प्रथम बलिदान केले. वर्षानुवर्षे आपण व्यवस्थेला प्रश्न विचारत नाही. त्यामुळे कुठलाही बदल होत नाही. बदल होण्यासाठी मुक्त संवादाची आवश्यकता असते. एकेकाळी धर्माने हा संवादाचा श्वास कोंडून धरला होता. हळूहळू तो मुक्त झाला तो अनेकांनी या व्यवस्थेशी संघर्ष केल्यामुळेच. बुद्धांनी तत्कालीन धर्मवाद्यांना जे प्रश्न विचारले, त्यातून भारताचा बौद्धिक आणि नैतिक विकास वेगाने झाला. बौद्धिक विकासावरच भौतिक विकास अवलंबून असतो. ही परंपरा खंडित झाल्यानंतर पुनश्च ब्राह्मणवाद व ब्राह्मणी सत्तेचा अंमल सुरू झाला. त्यामुळे भारत बौद्धिक व नैतिकदृष्ट्या अध:पतीत झाला. त्यातून अनेक वर्षे ज्ञानविज्ञानाअभावी तो परकीय सत्तांना शरण गेला, पराभूत झाला. आधीच्या धार्मिक गुलामगिरीमुळे राजकीय, सामाजिकदृष्ट्याही तो गुलाम झाला. धर्मांधता हे या देशाचे नेहमीच एक वैशिष्ट्य राहिले आहे. आज तर 'या धर्मापासून वाचवा' असे म्हणण्याची वेळ आली आहे. धार्मिक मूढतेबरोबर धार्मिक अहंकार वाढत चालला आहे. प्रश्न विचारणारे देशद्रोही

ठरत आहेत. माणसे आपला आदर्श भूतकाळात शोधत आहेत. राम आणि परशुराम यांच्या मिथकीय (Mythicle) कथा-पुराणांवर ती समाजाची पूर्ण बांधणी करण्याचे स्वप्न पाहत आहेत. त्यांना अडथळा आहे तो घटनात्मक व्यवस्थांचा. घटनेने दिलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि धर्मनिरपेक्षता या मूल्यांचा. आजही ते म्हणतात, ही घटना आम्हाला परकी आहे. तिचे आदर्श पाश्चात्य आहे. रामायण-महाभारतातील वर्णाश्रम धर्मप्रणित नीतिमत्ता आणि जीवनव्यवस्था हाच त्यांचा आदर्श आहे. ही जीवनव्यवस्था व्यक्तीला कुठलाही अधिकार देत नाही, तर फक्त कर्तव्ये सांगते. 'कर्मण्येवाधिकारते मा फलेषु कदाचन' म्हणजे कर्मफळावर अधिकार नाहीच, फक्त कर्तव्यांवर आहे. या नीतिमत्तेची विविध रूपे इतर धर्मांतही आहेत. ख्रिश्चन धर्मनीतीविषयी जॉन स्टुअर्ट मिल म्हणतो, 'It is basically a doctrine of passive obedience. It inculcates submission to all authorities found established.'; परंतु संविधान ही हक्कांची संहिता आहे. त्यामुळे सामान्य माणसाला या व्यवस्थेला प्रश्न विचारण्याचे नीतिधैर्य प्राप्त होते. त्यातून व्यवस्था परिवर्तन होऊ शकते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना रक्तशून्य समाजक्रांती अपेक्षित होती. ती घटनात्मक मार्गाने साध्य करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. घटनेच्या प्रामाणिक अंमलबजावणीतून ते शक्य होते. या बदलाला विरोध करणे व त्यातून धार्मिक राष्ट्रवादाच्या नावाने एकचालकानुवर्ती शासनव्यवस्था निर्माण करणे हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा अजेंडा आहे. मुख्य प्रश्न हा आहे, की घटना कशी बदलावी? कारण घटनात्मक व्यवस्थेचे संरक्षण करण्यासाठी बलाढ्य अशा सुप्रिम व हायकोर्टाची तटबंदीच उभी करण्यात आली आहे. भारताच्या इतिहासात प्रथमच राज्यकर्ते सुप्रिम कोर्टावर टीका करत आहेत. त्यावर ज्येष्ठ विचारवंत प्रताप भानू मेहता लिहितात :

(Fighting the dark, Indian Express, 26 Jan 2023)

The political cleverness and the danger of the current moment comes from four sources. First, the encroachments on the constitution are now represented as directly emerging from the will of people, the process of electoral legitimation is used to bludgeon all other considerations of indivisual freedoms or checks and balances. Second, the erosion appears to be in terms of its statistical effects less significant. This is not quite the age of mass arrests, only a few well chosen targets. The degradation of some of the fundamental principles of the constitution is quite comptible with the working of ordinary law in many areas and even or odd progressive victory in others. This duality allows for the charade the nothing of significance is happening.'

**लोकांची इच्छा ही घटना आणि कायद्यापेक्षा श्रेष्ठ**

'लोकांची इच्छा' हे राज्यकर्त्यांच्या हातातील एक प्रभावी शस्त्र असते. आम्ही जे बदल घडवू इच्छितो, ते लोकांच्या इच्छा आणि मान्यतेनुसार घडवत असल्यामुळे लोकांची इच्छा ही घटना आणि कायद्यापेक्षा श्रेष्ठ आहे. तिचा आम्ही आदर करतो. सत्ताधाऱ्यांकडे जर पाशवी बहुमत असेल तर ते सुप्रीम कोर्टालाही जनता सार्वभौम आहे आणि तिचे प्रतिनिधित्व करणारे पार्लमेंट अंतिम आहे असे म्हणून धमकावू शकतात, हे आपण पाहत आहोत. येथे प्रश्न येतो तो घटनात्मक नीतिमत्तेचा. चेक आणि बॅलन्सचा.

पार्लमेंट, सुप्रिम कोर्ट, कार्यपालिका यांच्या वैधानिक सीमारेषा घटनेने काळजीपूर्वक निश्चित केल्या आहेत. राज्य आणि केंद्र यांच्याही कार्यकक्षा सुनिश्चित आहेत. घटनेने घालून दिलेल्या सीमारेषांचे जर ते उल्लंघन करू लागले, तर राजकीय, प्रशासकीय, वैधानिक अराजक माजेल. ते समजण्याइतके सुज्ञ राज्यकर्ते असतील तर असे प्रश्न उद्‌भवणार नाहीत. डॉ. आंबेडकर म्हणाले होते, 'घटना राबवणारेच नालायक असतील, तर घटना कितीही चांगली असली तरी तिचा उपयोग होणार नाही.' ग्रेट ब्रिटनला लिखित राज्यघटना नाही. तरी लोकांची नीतिमत्ता, लोकशाही मूल्यांवरील अढळ श्रद्धा यामुळे कुठलाही राजकीय पक्ष सत्तेवर असला, तरी लोकांचे हक्क आणि अधिकारांवर गदा येत नाही. प्रताप भानू मेहता यांनी पुढे लिहिले आहे, 'The core signs of costitutional begeneration, the erosion of checks and balances, the degradation of individed liberty rule by pure executive power and control over civil society are already here; In light of all this it is not difficult to pretend to have an air of constitutional normalcy. It is still too easy for us to overlook every act of constitutional transgration wheather it is banning of a documentry on the prime minister an open challenge to the judiciary or use of state power against the opposition.'

यावर वेगळे भाष्य करण्याची आवश्यकता नाही. घटनेचे संरक्षण करण्याची ज्यांची जबाबदारी तेच घटनाविरोधी कृती करत आहेत, यामागची मानसिकता समजून घेतली पाहिजे. भारत हा कधीही एक राष्ट्र नव्हता. त्याला राष्ट्रीयतेच्या सूत्रात बांधण्याचे अतिशय कठीण काम घटनाकारांनी केले आहे. १३ डिसेंबर १९४६ च्या उद्दिष्टांच्या ठरावात जवाहरलाल नेहरूंनी ते स्पष्ट केले आहे. ते असे : भारतातील सर्व लोकांना संविधान आणि सार्वजनिक नैतिकतेच्या अधीन राहून निश्चित कायद्यानुसार भाषिक, आर्थिक

आणि राजनैतिक न्याय, दर्जा आणि संधीची समानता, तसेच कायद्याच्या दृष्टीने समानता, विचार अभिव्यक्ती, विश्‍वास अथवा उपासना, व्यवसाय, संघटन बनवण्याचे आणि कृतीचे स्वातंत्र्य राहील. याच ठरावात पुढे म्हटले आहे, की यात सर्व अल्पसंख्यांक समुदाय, मागास आणि आदिवासी क्षेत्रे, पददलित आणि अन्य मागासवर्ग यांना पर्याप्त संरक्षण प्राप्त असेल.

या ठरावासोबत त्यांनी भाषणही केले आहे. सबंध देशाचे भवितव्य घडवणाऱ्या या घटनेवर बोलताना त्यांच्या मनात काही संदिग्धता आहे. मुस्लिम लीगने बहिष्कार टाकलेला आहे. संस्थानिकांचा प्रश्‍न भेडसावत आहे. त्यांना फ्रान्स राज्यक्रांतीनंतरची संसदेची बैठक आठवली आहे. अत्यंत कठीणतम परिस्थितीत फ्रान्सच्या जनतेने स्वातंत्र्यासाठी संग्राम केला आहे. फ्रेंच राज्यक्रांतीबरोबरच त्यांना अमेरिकन आणि रशियाच्या राज्यक्रांतीचीही प्रकर्षाने आठवण झाली आहे. शक्तिशाली अतीत आणि शक्तिशाली भवितव्य यांच्या मध्यभागी आपण तलवारीच्या धारेवर उभे आहोत आणि स्वीकारलेल्या महान कार्यामुळे आपण अभिभूत आणि भयभीत चालू आहोत, असेही त्यांनी म्हटले आहे. भारताचा इतिहास त्या क्षणी अंधःकारपूर्ण होता. अज्ञान, अंधश्रद्धा, दारिद्र्य, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव, जातिबद्ध अमानुष समाजव्यवस्था आणि राष्ट्रीयत्वाचा, एकत्वाचा न झालेला साक्षात्कार. प्रादेशिक अस्मिता, भाषिक अस्मिता आणखी वेगळ्याच. भारतातील क्रांती जगातील सर्वश्रेष्ठ क्रांती म्हणता येईल. कारण भारतीय मानसिकतेत क्रांती घडणे जवळजवळ अशक्यच. आजही राजस्थान हायकोर्टासमोर मनूचा पुतळा दिमाखात उभा आहे आणि मनूनेच स्त्रियांना स्वातंत्र्य दिले आहे, असे म्हणणाऱ्या हायकोर्टाच्या माननीय महिला न्यायाधीश आहेत. घटना समितीत मात्र असे अनेक विद्वान होते, ज्यांना देशाच्या परिस्थितीची यथार्थ जाणीव होती. जर मुस्लिम लीग आणि संस्थानिक घटना समितीत सहभागी झाले नसते, तर देशाचे तुकडे होण्याची शक्यता होती. उद्दिष्टांच्या ठरावावर घटना समितीची चर्चा झाली ती मुळातच वाचण्यासारखी आहे. समाजवाद, लोकशाही, व्यक्तीचे स्वातंत्र्य, अल्पसंख्याकांचे प्रश्‍न आदी अनेक प्रश्‍नांवर चर्चा झाली. त्यानंतर डॉ. आंबेडकर यांना अनपेक्षितपणे भाषणासाठी पाचारण करण्यात आले. वेळ फक्त दहा मिनिटांचा दिला. त्यांच्याआधी पुरुषोत्तमदास टंडन, डॉ. एम. आर. जयकर आदी बऱ्याचशा सदस्यांनी आपापली मते व्यक्त केली होती. डॉ. आंबेडकरांनी सुरुवातीलाच असे स्पष्ट केले, की नेहरू हे प्रख्यात समाजवादी आहेत, तरी त्यांनी ज्या स्वातंत्र्याची वा मानवाधिकाराची घोषणा केली, त्यांचा भंग झाल्यास सुरक्षितता आणि उपाययोजनांची जी तरतूद करावी लागते ती या प्रस्तावात नाही. मानवाचे जीवित, वित्त अपहरण कायद्याच्या प्रक्रियेशिवाय करता येणार नाही. ज्याला पुढे घटनेत 'Due process of law' असे म्हटले आहे. नेहरूंच्या प्रस्तावात आर्थिक, सामाजिक, राजकीय न्यायाची तत्त्वे नाहीत. शेती आणि उद्योगांचे राष्ट्रीयीकरण व्हावे, अशी अपेक्षा होती. ती पूर्ण झालेली नाही. सार्वभौमत्व लोकांकडून लोकांसाठी प्राप्त झाले पाहिजे हा महत्त्वाचा मुद्दा असला, तरी पुढे ते म्हणतात, 'जरी आपण राजकीय, आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या विभाजित असलो, तरी समय आणि परिस्थिती अनुकूल झाली तर या जगातील कोणतीही शक्ती या देशाला एकात्म होण्यापासून प्रतिबंधित करू शकणार नाही अशी माझी पक्की धारणा आहे.' डॉ. आंबेडकर यांच्या या चिंतनशील भाषणावर सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. ते एका प्रखर राष्ट्रपुरुषाचे भाषण होते. ते पुढे म्हणाले, 'विविधतेने युक्त असलेल्या या समाजाला सर्वांना समान निर्णयाप्रती ध्येयाप्रती कसे नेता येईल, ही आपली खरी समस्या आहे. विविधतेने युक्त समाज एकात्मतेकडे वाटचाल कशी करू शकेल, ही आमची समस्या आहे. आमची समस्या अंतिम ध्येयांविषयी नाही.' हे भाषण एका घटनातज्ज्ञाचे, महान राजकीय नीतिशास्त्रज्ञाचे, प्रकांड पंडिताचे आणि देशभक्ताचे होते, ते मुळातून वाचले पाहिजे. एडमंड वर्कचा संदर्भ देऊन ते म्हणाले, की 'सत्ता देणे सोपे आहे; पण सुज्ञपणा देणे मोठे कठीण कर्म आहे.

**...त्याशिवाय स्वातंत्र्याला अर्थ नाही**

भारतीय समाजाची पुनर्रचना आणि सार्वभौमता, एकत्व आणि अखंडत्व ही घटना समितीसमोरील आव्हाने होती. व्यक्तीचे मूलभूत हक्क, संघीय ढाचा व राज्य संबंध, न्यायव्यवस्था आणि विधानमंडळे यांच्या कार्यकक्षा, अल्पसंख्याकांचे हक्क संरक्षण असे अनेक विषय घटना समितीपुढे होते. त्यावर अतिशय सखोल चर्चा होत राहिली; परंतु डॉ. आंबेडकरांपुढे सर्वांत ज्वलंत प्रश्‍न होता तो येथील विषम समाजरचनेचा आणि त्यात हजारो वर्षांपासून गाडल्या गेलेल्या दलितांचा, अस्पृश्यांचा. त्यांना सन्मानाने जगता येईल अशा हक्कांचा. त्यामुळे व्यक्ती हे मूल्य व त्याचा सर्वांगीण विकास हे त्यांचे मुख्य सूत्र राहिले.

What then is the rightful limit to the sovereignty of the indivisual over himself? where does the authority of society begin? How much of human life should be assigned to indivisuality and how much to society? (On liberty) – हा जॉन स्टुअर्ट मिलने उपस्थित केलेला प्रश्‍न डॉ. आंबेडकरांपुढे होताच. प्रत्येक व्यक्तीला समान हक्क मिळालेच पाहिजेत, त्याशिवाय स्वातंत्र्याला अर्थ नाही. जेव्हा एखादा बहुसंख्याक समाज देशातील ठराविक जाती, वर्ग, वर्ण वा धर्माविरोधी सातत्याने आक्रमण करत असेल, आपल्या राजकीय व आर्थिक ताकदीने त्यांचे शोषण करत असेल किंवा करण्याची शक्यता असेल, तेव्हा स्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता आदी मूल्यांना कायद्याने राबवता येईल अशी व्यवस्था उभी करणे हे त्यांचे घटनात्मक उद्दिष्ट होते. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, राज्याला इतके अमर्याद अधिकार असू नयेत, की ते व्यक्तीचे स्वातंत्र्य, मूलभूत हक्क हिरावून घेतील. त्यासाठीच त्यांनी प्रबळ सुप्रिम कोर्टाची उभारणी केली, जे घटनेचे संरक्षण करेल. कुठलीही सत्ता मूलतः दमनकारी आणि हिंसक असते, असे गांधीजी मानत. तिला प्रतिकार करण्याचे सामर्थ्य व्यक्ती वा समाजात असले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. डॉ. आंबेडकरांनी त्यासाठी सामाजिक न्याय कायद्याद्वारे स्थापित करण्याची घटनात्मक हमी दिली आहे. ●●●

**(लेखक निवृत्त सनदी अधिकारी आहेत.)**

# भटक्या विमुक्त जमाती : लोकशाही आणि भारतीय संविधान

**यापुढील काळात महाराष्ट्रातील सर्व परिवर्तनवादी चळवळींनी अधिक दक्ष राहणे गरजेचे आहे. भटक्या-विमुक्तांची चळवळ मजबूत बनली पाहिजे. ती फुले-आंबेडकरी विचाराने चालणारी बनली पाहिजे. यासाठी खूप काम करावे लागेल. कारण प्रश्न अनंत आहेत. भटक्या-विमुक्तांच्या विकासासाठी फुले, शाहू, आंबेडकर हेच मुक्तीचे तत्त्वज्ञान आहे, तेच लढ्याचे शस्त्र आहे आणि तेच चळवळीचे शास्त्रही आहे. त्यासाठी संविधान व लोकशाही वाचविली पाहिजे, तरच भटक्या-विमुक्तांच्या प्रगतीचा मार्ग मोकळा होईल.**

**प्रा. सुनील अनवले**

आपल्या देशाच्या जाणिवेत आणि नेणिवेत जात आणि धर्म आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने देश धर्मनिरपेक्ष होऊ शकला नाही. धर्माचा प्रभाव कायम वाढतोच आहे. या सर्व प्रक्रियेत धर्माची चिकित्सा करणाऱ्या, धर्माला नकार देणाऱ्या मानवतावादी चळवळींचा उदय झाला. अशा मानवतावादी चळवळींना परिवर्तनवादी चळवळ म्हणून मानले गेले. या पार्श्वभूमीवर दलित, आंबेडकरी चळवळीने आपला ठसा उमटविला आणि भटक्या विमुक्तांची चळवळ अजूनही संक्रमण अवस्थेतच आहे. व्यक्तीने किंवा समाजाने धार्मिक असण्यात हरकत नाही. पण व्यक्ती किंवा समाज धर्मांध बनला, की अनेक प्रश्न निर्माण होतात. धर्मांध व्यक्ती आणि समाज अविवेकी व माथेफिरू बनतात. त्यातून संपूर्ण मानवी जीवन ते वेठीस धरतात आणि मग मानवतावाद, बुद्धिवाद निकालात काढले जातात. मग होते असे, की जो समाज चतुर आहे तो बलिष्ठ बनतो, प्रस्थापित बनतो आणि काहीजण वंचित, उपेक्षित राहतात. त्यातूनच भटक्या विमुक्त जमातींचा प्रश्न टोकदार पद्धतीने उभा राहतो.

**प्रस्थापितांची सर्व ब्राह्मणी प्रतीके भटक्या विमुक्तांनी नाकारली**

मानवी समाजाच्या उत्क्रांतीचे टप्पे विचारात घेतल्यास सर्व समाज विकासाच्या एका टप्प्यावर भटका होता, हे सत्य लक्षात येते. आज ज्या भटक्या जमाती आहेत, त्या आपोआप किंवा स्वेच्छेने भटक्या वृत्तीचे बनलेले नाहीत. इथल्या व्यवस्थेने त्यांना भटके बनवलेले आहे. भूतकाळात त्यांना जमीन होती, त्यांच्या हातात सत्ता होती. पण जी राजकीय आणि सामाजिक स्थित्यंतरे आली, त्यातून ज्या लढाया झाल्या, त्यात जे हरले तो समाज व्यवस्थेच्या बाहेर फेकला गेला. परिणामी समाजव्यवस्थेतली जागा त्यांनी गमावली. त्यातून ते भटके, फिरस्ते बनले, काही गुन्हेगार बनले, काही शिकारी बनले, काही भिक्षेकरी बनले. जगाच्या कानाकोपऱ्यातून हा समाज जिथे पोट भरता येईल तिथे, जिथे थारा लागेल तिथे, त्या ठिकाणी तात्पुरते वास्तव्य करून राहू लागला. यातून या भटक्यांची स्वतंत्र भिन्न संस्कृती, विचित्र रुढी परंपरा, रितीरिवाज, वेगळी बोलीभाषा अस्तित्वात आली. या सर्व बाबतीत त्यांनी प्रस्थापितांच्या कोणत्याच बाबींचा स्वीकार केला नाही. प्रस्थापितांची सर्व ब्राह्मणी प्रतीके भटक्या विमुक्तांनी नाकारली. पण जगण्यासाठी काही तडजोडी या जमातींना करणे आवश्यक होत्या. या तडजोडीतून काही विसंगती निर्माण झाल्या. भटक्यांनी ब्राह्मणी धर्म नाकारला. पण त्यांची जातीव्यवस्था स्वीकारली. व्यवसायाप्रमाणे भटक्या विमुक्तांची एक मुख्य जात त्या त्यांच्या अनेक पोटजाती, असे अनेक विचित्र त्रांगडे अस्तित्वात आले.

ब्रिटिशांच्या विरोधात लढणाऱ्या अनेक बहुजन योद्ध्यांचा इतिहास नाकारला गेला, त्यांची दखलच घेतली नाही. तेच भटक्या विमुक्तांच्या बाबतीत घडले. पेंढाऱ्यांनी, रामोश्यांनी, पारध्यांनी, कोळ्यांनी ब्रिटिश राज्यसत्तेविरोधात बंड केले. या जमाती ब्रिटिश सत्ता मानत नाहीत, असे दिसल्याबरोबर त्यांना गुन्हेगार ठरविले गेले. त्यांना सेटलमेंटमध्ये बंदिस्त केले. अशा जमातींना जन्मजात गुन्हेगार ठरवून त्यांना कायम धाकात ठेवण्याची ही व्यवस्था मनुस्मृतीच्या तत्त्वाप्रमाणे होती, जी ब्राह्मणी व्यवस्थेच्या सोयीची होती. संपूर्ण जात आणि जमात जन्मजात गुन्हेगार ठरविली गेली. संपूर्ण जमात जन्मजात गुन्हेगार ठरविणे ही संकल्पना फक्त भारतात आहे. कुठेही गुन्हा घडला, की भटक्या-विमुक्तांना जबाबदार धरण्यात येत होतं. आजही तसेच घडते. त्यात तिळमात्र फरक पडलेला नाही. ब्रिटिश भटक्यांच्या मागे, पोलिस भटक्यांच्या मागे या प्रक्रियेत या जमातींची असलेली प्रतिष्ठा आणि पत संपली. माणूस म्हणून असलेली मान्यता संपुष्टात आली. अगोदरच समाजव्यवस्थेमध्ये जागा नव्हती. इंग्रजांच्या कायद्यामुळे समाजाबाहेर, गावाबाहेर खाजगी तारेच्या कुंपणात (सेटलमेंटमध्ये) त्यांची रवानगी करण्यात आली. त्यामुळे ते विकास प्रक्रियेपासून उपेक्षित राहिले. तसे स्वातंत्र्यानंतर या जमातींना जन्मजात गुन्हेगार ठरविणारा कायदा नेहरूंनी १९५२ ला रद्द केला आणि या जमातींना मोकळा श्वास घेण्यासाठी अवकाश उपलब्ध करून दिले.

१९५२ या वर्षापासून भटक्या-विमुक्तांचा संघर्ष सुरू होतो.

गुन्हेगारी कायदा रद्द झाला, तरी समाज आणि पोलीस या जमातींकडे गुन्हेगार म्हणूनच पाहतात. मानसिकता आजही बदललेली नाही. स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली तरीही कुठेही गुन्हा घडला, की पोलिसांची गाडी रात्री-बेरात्री त्यांच्या वस्तीवर जाते आणि संशयित गुन्हेगार म्हणून अटक करून त्याला तुरुंगात टाकतात. सेटलमेंटमधून मुक्त झाल्यानंतर भटक्या जमाती सतत फिरत होत्या. पण समाजात राहत नव्हत्या, स्थिर राहत नव्हत्या. सततच्या फिरस्तीमुळे त्यांचा विकास होत नव्हता. विकास व्हायचा असेल, तर कुठेतरी स्थिर व्हावे लागते आणि स्थिर होण्यासाठी आवश्यक परिस्थिती या भटक्यांकडे नव्हती. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरसुद्धा हा समाज भटकतोच आहे. एवढ्या वर्षांत या जमातींनी स्वतःचे स्वतंत्र जग निर्माण केले, संस्कृती निर्माण केली. भीक मागण्यासाठी, सेवा देण्यासाठी या जमाती गावातल्या स्थिर समाजाकडे जात. तेवढे काम संपले, की तो पुन्हा भटकायला दुसऱ्या गावात जायचा. म्हणजे या जमाती गरजेपुरत्या गावातल्या स्थिर समाजाशी देवाण-घेवाण करतात. देवाण-घेवाणीच्या या प्रक्रियेत स्थिर समाजाच्या धर्म संस्कृतीचे अनुकरण त्यांनी सुरू केले. किंबहुना, स्थिर समाजापेक्षा या फिरत्या भटक्या जमाती आक्रमकपणे धर्माचे अनुसरण करू लागल्या आहेत. ब्राह्मणी देवदेवतांचे भक्त म्हणून भिक्षा मागणाऱ्या जमातींना हे जगणे सोयीचे वाटू लागले.

**भटक्या-विमुक्तांची शिक्षण प्रक्रियेत येण्याची गती खूप मंद**

भटक्या-विमुक्तांकडे शिक्षण नाही. आजही शंभरात नाही, तर हजारांमध्ये एक असे चित्र दिसून येते. शिक्षण का नाही तर शिक्षण घ्यायचे असेल, तर स्थिर असावे लागते. स्थिर व्हायचे असेल, तर घर आवश्यक असते. घर पाहिजे असेल, तर जागा लागते. जागा पाहिजे असेल, तर आर्थिक परिस्थिती बरी असावी लागते तर जागा खरेदी करता येते. आर्थिक परिस्थिती बरी नसेल, तर जागा खरेदी करता येत नाही. मग घरासाठी जागा गावाने, ग्रामपंचायतीने किंवा सरकारने दिली पाहिजे. जागा नाही, घर नाही त्यामुळे स्थैर्य नाही. स्थैर्य नाही त्यामुळे शिक्षण नाही. शिक्षण नाही त्यामुळे ज्ञान नाही. ज्ञान नाही, त्यामुळे परिसराचे ज्ञान माहीत नाही म्हणून विकास नाही. महात्मा फुले म्हणाले होते त्याप्रमाणे, भटक्यांचे एवढे सगळे अनर्थ एका अविद्येने केले. आता शासनाने बऱ्याच सोयी केलेल्या आहेत. पण भटक्या-विमुक्तांची शिक्षण प्रक्रियेत येण्याची गती खूप मंद आहे.

अलीकडच्या काळात जागतिकीकरणामुळे, आधुनिक यांत्रिकीकरणामुळे भटक्या-विमुक्तांसमोर नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यांच्या पारंपारिक व्यवसायासमोर या नव्या प्रक्रियेचे नवे आव्हान उभे करून त्यांचे जगणे कठीण केले आहे. १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले. पण स्वातंत्र्याने भटक्या-विमुक्तांना काय दिले, हा संशोधनाचा प्रश्न आहे. १९७२ ला पहिला मोर्चा भटक्या-विमुक्तांचा निघाला. १९८६ च्या शोधयात्रेमुळे भटक्या-विमुक्तांच्या आंदोलनाला आकार यायला लागला. या जमाती व्यवस्थेला प्रश्न विचारू लागल्या. आम्ही नागरिक आहोत या देशाचे, तर आम्हाला कोणते हक्क आहेत? मतदारयादीत आमचे नाव का नाही, राहायला जागा का नाही? आमच्याकडे जगण्याची साधने का नाहीत? गावच्या वेशीतल्या स्थिर समाजाला जे हक्क आहेत, ते आम्हाला का नाहीत? तर मग आम्ही या देशावर का प्रेम करायचे?

**फुले, आंबेडकरांमुळे मी जागा झालोय**

भटक्या-विमुक्तांचा संघर्ष हा तिहेरी आहे. पहिला स्वतःशी, जातीच्या रिती आणि परंपरांशी. दुसरा समाजाशी आणि तिसरा शासनाशी. या जमाती स्थिर समाजाला, शासनाला, संविधानाला, न्यायव्यवस्थेला प्रश्न विचारत आहेत. तो प्रश्न म्हणजे आम्ही अस्तित्वात आहोत काय? स्वतःशीही प्रश्न विचारत आहेत तो म्हणजे आम्ही अंधश्रद्धेत का अडकून राहायचे, विचित्र प्रथा का टिकून ठेवायच्या. जात पंचायती का नष्ट करू नयेत, असे अनेक प्रश्न जसजसे पडतील, तशीतशी उत्तरेसुद्धा गवसतील आणि चळवळ पुढे जाईल. फक्त अट एकच, कालपर्यंत मी माणूस नव्हतो. आज मला समजले आहे, की मी माणूस आहे. पण मी नाकारलेला होतो. फुले, आंबेडकरांमुळे मी जागा झालोय, हे त्याला उमगले पाहिजे.

तसे पाहता भटक्या-विमुक्तांना घटनात्मक संधी मिळावी, त्यांचे कल्याण व्हावे, ते देशाच्या मुख्य प्रवाहात यावेत, यासाठी केंद्र सरकारने रेणके आयोग, इदाते आयोग नेमला. या दोन्ही आयोगांनी महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदविली. पण या दोन्ही आयोगांच्या शिफारशी सरकारने स्वीकारल्या नाहीत. त्यामुळे भटक्या-विमुक्तांचे प्रश्न जैसे थेच राहिले. भटके-विमुक्त या देशाचे मूळ मालक आहेत. नेटिव्ह सन्स आहेत. आम्ही देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढलो. स्वातंत्र्यानंतर स्वकियांकडून खूप छळ सहन केला. पण आज दिल्लीच्या केंद्र सरकारकडून आमच्या नागरिकत्वाचे पुरावे मागितले जात आहेत. सीएए आणि एनआरसीसारखे कायदे आणून आमच्या नागरिकत्वाबाबत संशय घेतला जात आहे. या कायद्यांना भटके-विमुक्त प्राण पणाला लावून विरोध करीत आहेत.

भटके-विमुक्त दलितांपेक्षा दलित आहेत. त्यांचा संघर्ष हा मानवमुक्तीचा संघर्ष आहे. त्यांचे प्रश्न धर्माच्या चौकटीतून सुटणारे नाहीत. हिंदुत्ववादी विचारधारेने त्यांना गावच्या बाहेर ठेवले. आजही गावची हागणदारी ही आमची वतनदारी, हे वाक्य सुभाषिताप्रमाणे चळवळीत वापरले जाते. त्यामुळे असले जिणे जगण्यापेक्षा, भटक्या-विमुक्तांची चळवळ धर्म नाकारणारी, हिंदुत्व नाकारणारी चळवळ बनली पाहिजे. धर्माने खूप मोठे नुकसान भटक्या-विमुक्तांचे केले आहे. पण भटक्या-विमुक्तांमधील ज्या जमाती हिंदूंच्या देवदेवतांची नावे घेऊन भिक्षा मागतात, त्या जमातींमध्ये संघाचे आरएसएसचे कार्यकर्ते शिरत आहेत. या जमातींना संघाची धार्मिक विचारधारा जवळची वाटते आहे. त्यामुळे ते या जमातींकडे वोट बँक म्हणून पाहत आहेत. यापुढील काळात महाराष्ट्रातील सर्व परिवर्तनवादी चळवळींनी अधिक दक्ष राहणे गरजेचे आहे. भटक्या-विमुक्तांची चळवळ मजबूत बनली पाहिजे. ती फुले-आंबेडकरी विचाराने चालणारी बनली पाहिजे. यासाठी खूप काम करावे लागेल. कारण प्रश्न अनंत आहेत. भटक्या-विमुक्तांच्या विकासासाठी फुले, शाहू, आंबेडकर हेच मुक्तीचे तत्त्वज्ञान आहे, तेच लढ्याचे शस्त्र आहे आणि तेच चळवळीचे शास्त्रही आहे. त्यासाठी संविधान व लोकशाही वाचविली पाहिजे, तरच भटक्या-विमुक्तांच्या प्रगतीचा मार्ग मोकळा होईल. ●●●

**(लेखक भटक्या विमुक्तांच्या चळवळीतील कार्यकर्ते आहेत.)**

# शत्रू ओळखण्यातच ओबीसींचे हित


**''भारतातील ओबीसी दरिद्री असल्याने सामाजिक मागासलेले नाहीत, तर ते सामाजिकदृष्ट्या मागासलेले असल्याने दरिद्री आहेत.'' मंडल आयोग.**



धनाजी गुरव

**ओबीसींनी आपल्या विचाराचे पक्ष कोणते आणि आपले शत्रू पक्ष कोणते, हे ओळखून राजकारण केले पाहिजे. जर गोंधळ संपला नाही आणि भाजप परत सत्तेवर आला, तर ओबीसींच्या मुक्तीची सनद असलेले भारतीय संविधान नष्ट होईल आणि हिंदू राष्ट्राच्या नावाखाली पुन्हा मनुस्मृतीच लादली जाईल. मग राखीव जागा जातीलच; पण महाराष्ट्रातील कूळ कायदा रद्द होईल आणि सर्व जमिनी परत सरकार घराणी आणि ब्राह्मण यांनाच मिळतील. असे व्हायला नको असेल, तर ओबीसींनी वेळीच जागे झाले पाहिजे.**

इतर मागास, आलुतेदार-बलुतेदार, कारू-नारू हा इतिहासाच्या विशिष्ट टप्प्यावर निर्माण झालेला सामाजिक स्तर आहे. जंगलातील वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पती, लाकूड, पाणी, वेगवगळे प्राणी, अनेक प्रकारची माती, अनेक प्रकारचे दगड, हवा होय. याची उत्पादनाची साधने. त्यांच्या आधारावर उत्पादन करणारा त्या काळातील उद्योजक. वनौषधी, शेतीसाठी लागणारी साधने, व्यापार वाहतुकीसाठी, साठवणुकीसाठी लागणारी साधने यांची निर्मिती यात तो तज्ज्ञ होता. पाळीव प्राण्यांचे आजारपण, माणसाचे आजारपण या बाबतीत तो कुशल आणि तज्ज्ञ होता. एका अर्थाने तो समाजातील पुढारलेला घटक होता. याचे अनेक पुरावे बुद्धविहार आणि इतर ठिकाणी या समूहाने दिलेल्या देणग्यांचे शिलालेख अजूनही सांगतात.




इतिहासाच्या पुढच्या टप्प्यावर, सरंजामशाही आणि राजेशाहीच्या काळात कमी जास्त संघर्षाच्या पार्श्वभूमीवर सर्वच राज्यांनी भृगू दंडसंहिता म्हणजे मनुस्मृती ही कायदा म्हणून स्वीकारली. याचा परिणाम म्हणून सर्व जंगल, जमीन आणि पाणी ब्राह्मण आणि राज्यांच्या ताब्यात गेले. त्यांच्या उत्पन्नाची मूलभूत साधनेच काढून घेतल्याने हे सर्व उद्योजक ब्राह्मण, राजा आणि गावकरी यांच्या मर्जीनुसार उत्पादन करणारे सेवेकरी झाले. जगण्यासाठी बलुत्यावर किंवा राजा, ब्राह्मण आणि गावकरी देतील त्याच्यावर गुजराण करणे याशिवाय मार्ग उरला नाही. त्यामुळे एकेकाळी हे पुढारलेले तज्ज्ञ उद्योजक आलुतेदार-बलुतेदार म्हणून समाजात जगायला लागले.

**...तर तेही अतिशूद्रांच्या पातळीवर आले**

मनुस्मृतीच्या कायद्यानुसार हे सर्व जनसमूह श्रम करणारे असल्यामुळे शूद्र ठरले. त्यांना धन-संपत्ती, शिक्षणाचे हक्क नाकारले गेले. वर्णव्यवस्थेत ते सर्वात तळाला आले आणि जातिव्यवस्थेच्या उतरंडीत (अस्पृशांच्या वरचा स्तर) यांना गावात वेशीच्या आत राहण्याची परवानगी मिळाली. कारण गावाला सर्व प्रकारची सेवा मोफत देण्याची त्यांच्यावर जबाबदारी होती. अर्थात, ज्यांनी जातीव्यवस्था स्वीकारली त्यांच्याच आयुष्यात हे आले. ज्यांनी जातीव्यवस्था नाकारली ते आदिवासी म्हणून स्वतंत्रपणे जगत आले किंवा आता आपण भटके-विमुक्त म्हणून ओळखतो ते जीवन जगत राहिले. पण भारतीय उपखंडात ब्राह्मण श्रेष्ठत्वावर बेतलेली जातीव्यवस्था आणि सरंजामी राज्यव्यवस्था स्वीकारणारे जास्त झाले. मग ते मर्जीने असेल किंवा संघटित हिंसेमुळे असेल. पण त्यामुळे जातीव्यवस्था न स्वीकारणारे जनसमूह नगण्य झाल्यामुळे एकंदर व्यवस्थेत तेही अतिशूद्रांच्या पातळीवर आले. भारतीय संविधानाने

त्यांची ओळख एसटी, एनटी, बीसी अशी केली आणि सर्व शूद्र जनसमूहांना इतर मागास म्हणजे ओबीसी अशी नवी ओळख दिली.

संविधान सभेत या जनसमूहाबद्दल चर्चा होऊन 'मागास आयोगाची' स्थापना करण्याची शिफारस केली, ज्याच्या आधारावर त्यांना योग्य प्रतिनिधित्व देण्यासाठी राखीव जागांची तरतूद करता येईल. स्वातंत्र्यानंतर तत्कालीन राज्यकर्ते हा आयोग स्थापन करायला चालढकल करताहेत, हे पाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय स्त्रियांना हक्क देणारे 'हिंदू कोड बिल' आणि सर्व शूद्रांना हक्क देणारा 'मागास आयोग' स्थापन करीत नाहीत याचा निषेध म्हणून कायदेमंत्रीपदाचा राजीनामा दिला. यापूर्वीच 'शूद्र नेमके कोण आहेत?' याची वैचारिक मांडणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुस्तकरूपाने करून ठेवली होती.

**'मंडल विरुद्ध कमंडल'**

'इतर मागास'साठी नंतरच्या काळात अनेक आयोग स्थापन झाले. पण वेगवेगळी कारणे पुढे करीत तत्कालीन राज्यकर्त्यांनी त्या आयोगाच्या शिफारशी स्वीकारल्या नाहीत आणि त्यांचे हक्क दिले नाहीत. १९९० च्या दशकात व्ही.पी. सिंग यांच्या नेतृत्वाखाली सरकार आले आणि त्यांनी मंडल आयोगाच्या शिफारशी स्वीकारून इतर मागासांच्या विकासाचा मार्ग मोकळा केला. पण आताच्या भाजप आणि संघाने मंडल आयोग आणि ओबीसींच्या राखीव जागांना विरोध करून व्ही.पी. सिंग यांचे सरकार पाडले. 'मंडल विरुद्ध कमंडल' असा संघर्ष उभा करून भाजपने रामरथ यात्रा लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली चालू केली. स्वतःच्या विकासाचा मार्ग विसरलेले आणि धर्माचा प्रभाव असलेले ओबीसी मंडल आयोगाला विरोध करणाऱ्या संघाच्या रामरथ यात्रेत सामील झाले. ओबीसींच्या राजकीय आणि सामाजिक हक्कांना आणि राखीव जागांना संघाने नेहमीच विरोध केला आहे. हा इतिहास जोपर्यंत बहुजन व इतर मागास समजून घेणार नाहीत, तोपर्यंत त्यांचे खरे शत्रू कोण आणि मित्र कोण हे त्यांना समजणार नाही. त्यामुळे ते आपल्या हक्काची लढाई लढू शकणार नाहीत.

**ही त्यांची सांस्कृतिक विद्रोहाची लढाई**

आजही समाजावर मनुस्मृतीचा प्रभाव आहे. त्यामुळे छ. शिवाजी महाराज, छ. संभाजी महाराज आणि छ. शाहू महाराज यांना वगळता कोणत्याही राज्यकर्त्याने महाराष्ट्रात मनुस्मृतीला नाकारून राज्यकारभार केला नाही. अगदी कित्येक वर्षे सत्तेवर असलेले मोगल, डच, इंग्रज यांनीसुद्धा मनुस्मृतीला विरोध केला नाही. त्यामुळे मनुस्मृती घडत असताना बुद्ध, महावीर यांनी त्याला विरोध केला. नंतरच्या काळात नवनाथ, चक्रधर, बसवण्णा आणि लिंगायत शरण चळवळ, संत नामदेव आणि वारकरी चळवळ यांनी मनुस्मृतीला विरोध केला. या संघर्षात अनेक नेते हुतात्मे झाले. पण त्यांनी तडजोड केली नाही. त्यामुळेच बुद्ध धम्मानंतर या शुद्ध ओबीसींनी मोठ्या प्रमाणात धर्मांतर करून मुस्लिम धर्म स्वीकारला. ही त्यांची सांस्कृतिक विद्रोहाची लढाई आहे.

नंतरच्या काळात फुले, शाहू, आंबेडकर आणि म. गांधी यांनी जाहीरपणे मनुस्मृतीच्या विरोधात व्यवहार केले. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह सर्व स्त्रिया आणि शूद्रातिशूद्र सामील झाले. त्यामुळेच मनुस्मृती अधिकृतरित्या संपवण्याच्या कार्यात म्हणजे संविधान तयार करण्यात सहभागी आणि यशस्वी झाले.

**ओबीसी जनगणनेला भाजपचा विरोध**

आजही उत्पनाचे आणि पत दाखवण्याचे मुख्य साधन असलेली जमीन आणि गावातील घरचे ठिकाण हे जातीव्यवस्थेवरच आधारित आहेत. स्त्रिया, पूर्वाश्रमीचे अस्पृश्य, आदिवासी, भटके विमुक्त, ओबीसी यांना जमिनीची मालकी जास्त करून नाही. थोडा फरक पडला तरी त्याचे प्रमाण कमी. शिक्षणाची परंपरा नाही. सहकारात स्थान नाही. विकासाचे सर्व मार्ग कुंठित आहेत. मुक्त अर्थव्यवस्थेनंतर खाजगीकरण चालू झाले. भाजप जेथे सतेवर आले तेथे त्यांनी सार्वजनिक उद्योग संपवले. शिक्षण खाजगी केले. त्यामुळे राखीव जागा गेल्या. ओबीसीची स्कॉलरशिप बंद केली. २०१४ नंतर भाजपने सर्व संवैधानिक संस्थांना काबीज करून संघाच्या सेवेत जुंपले. त्यांचे सर्व निर्णय संघाच्या निर्णयाला मदतकारक झाले. न्यायव्यवस्थाही प्रभावाखाली आली. त्यांनी ओबीसींच्या राखीव जागा नाकारल्या. लोकसंख्येचे कारण पुढे केले. जेथे भाजप सत्तेवर आहे तेथे त्यांनी ओबीसी जनगणनेला विरोध केला. सत्तेच्या आधारावर जनगणना होऊ द्यायची नाही आणि राखीव जागा सोडायच्या नाहीत, हा संघाचा कावा भाजप अंमलात आणतोय. त्यामुळे ओबीसींनी आपल्या विकासाचा आणि मुक्तीचा मार्ग ओळखला पाहिजे. तो ओबीसींना गुलाम करणाऱ्या मनुस्मृतीसमर्थक भाजप आणि त्याचे मित्रपक्ष यांच्या समर्थनाचा असू शकत नाही. तर या विचारसरणीला वाहणाऱ्या बुद्ध, बसवण्णा, नामदेव, तुकोबा आणि फुले, शाहू, आंबेडकर यांनी दाखवलेला मार्गच असू शकतो.

म्हणून ओबीसींनी आपल्या विचाराचे पक्ष कोणते आणि आपले शत्रू पक्ष कोणते, हे ओळखून राजकारण केले पाहिजे. जर गोंधळ संपला नाही आणि भाजप परत सत्तेवर आला, तर ओबीसींच्या मुक्तीची सनद असलेले भारतीय संविधान नष्ट होईल आणि हिंदू राष्ट्राच्या नावाखाली पुन्हा मनुस्मृतीच लादली जाईल. मग राखीव जागा जातीलच; पण महाराष्ट्रातील कूळ कायदा रद्द होईल आणि सर्व जमिनी परत सरकार घराणी आणि ब्राह्मण यांनाच मिळतील. असे व्हायला नको असेल, तर ओबीसींनी वेळीच जागे झाले पाहिजे. आपल्या जनसमूहाचे प्रबोधन करून संघटित झाले पाहिजे. त्यासाठी वेगवेगळी आंदोलने उभी केली पाहिजेत. खालील मागण्यांसाठी ताकद लावली पाहिजे.

१) संपूर्ण मंडल आयोगाची अंमलबजावणी झाली पाहिजे.

२) खाजगी क्षेत्रातपण ओबीसींना राखीव जागा मिळाल्या पाहिजेत.

३) ओबीसींची जनगणना झाली पाहिजे.

४) सर्व लिंगायत शरण संत आणि सर्व वारकरी संतांचे विचार अभ्यासक्रमात घेतले पाहिजेत. ५) अशी अनेक प्रकारची आंदोलने करून राजकीय जागृती करावी लागेल. ●●●

**(लेखक ज्येष्ठ कामगार नेते आहेत.)**

# दलित-आंबेडकरी चळवळ आणि संघाचे आव्हान



सुरेश सावंत

**आज संविधान धोक्यात आहे. संविधान मानून ते संवर्धित व्हावे म्हणून लढणाऱ्या शक्तींनी संविधान परिवार म्हणून एकत्र यायला हवे आणि संविधान उद्ध्वस्त करणाऱ्या संघ परिवाराला नेस्तनाबूत करण्याला प्राधान्य दिले पाहिजे. तोवर आपसातल्या मतभेदांना 'टाईम प्लिज' दिली पाहिजे. पण हे होत नाही म्हणून संघ निवांत आहे. शांतपणे व चिवटपणे आपले जाळे विणतो आहे.**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्याच्या परिवाराच्या उधळलेल्या वारुला रोखण्यात एक विचार व एक समूह म्हणून ताकदीने उभी राहण्याची धमक दाखवू शकणारी आंबेडकरी चळवळ पूर्ण निस्तेज, गलितगात्र आहे. तिच्या ऐतिहासिक जबाबदारीचे भान हरवलेले आहे. त्यामुळे तिच्यावर चालून जाणे संघाला सोपे गेले आहे. या चळवळीचे मानबिंदू असलेल्या बाबासाहेब आंबेडकरांचे अपहरण ते त्यातील नेत्यांना-विद्वानांना सामिष चारा देऊन दावणीला बांधणे यासाठी संघाला फारच अल्प सायास करावे लागत आहेत.

ते सहजच बाबासाहेबांना जे म्हणायचे होते तेच आम्ही म्हणत आहोत. बाबासाहेबांना जे करायचे होते, तेच आम्ही करत आहोत असे बिनदिक्कत सांगत आहेत. काही भूमिकांच्या बाबतीत तर संघाचे प्रचारक म्हणूनच बाबासाहेबांना उभे केले जाते आहे.

बाबासाहेबांच्या १२५ व्या जन्मदिनानिमित्त केंद्र सरकारने संसदेच्या दोन दिवसीय विशेष अधिवेशनाबरोबरच अनेकविध कार्यक्रम सरकारी पातळीवर घेतले. शाळा-कॉलेजांना सक्तीने करायला लावले. आम्हालाच कसे बाबासाहेबांचे सर्वाधिक लागते आहे, हे त्यातून दर्शवायचे होते. संघाने 'ऑर्गनाझर' या आपल्या मुखपत्राचा विशेषांकच काढला. त्यात बाबासाहेबांविषयी गौरवपर लेख आहेत. मात्र संघाच्या भूमिकांना छेद जाणार नाही, उलट पूरक ठरेल अशीच त्यांची मांडणी आहे. १७ एप्रिल २०१६ च्या इंडियन एक्सप्रेसमध्ये 'Which Ambedkar?' या लेखात रामचंद्र गुहांनी या 'ऑर्गनायझर'च्याच जुन्या भूमिकांचा दाखला देऊन संघाची दांभिकता उघडी पाडली आहे.

**संघाला बाबासाहेब लिहीत असलेली घटना व त्यांचे हिंदू कोड बिलासाठीचे झटणे दोन्ही नामंजूर होते. गुहा घटनेविषयीची संघाची भूमिका नोंदवतात –**

''या संविधानाबाबतची सर्वात वाईट गोष्ट म्हणजे यात काहीही भारतीय नाही. ...यात प्राचीन भारतीय सांविधानिक नियम, संस्था, संज्ञा, परिभाषा यांचा मागमूसही नाही. ...प्राचीन भारतातील अतुल्य अशा सांविधानिक विकासक्रमांचा यात उल्लेख नाही. स्पार्टाचा लायकर्गस किंवा पर्शियाचा सोलोन यांच्या कितीतरी आधी मनूचे नियम लिहिले गेले आहेत. आजही मनुस्मृतीतले हे नियम जगात प्रशंसिले जातात आणि भारतीय हिंदूंना उत्स्फूर्तपणे त्यांच्या अनुपालनास व अनुसरणास उद्युक्त करतात. पण आपल्या घटनापंडितांच्या दृष्टीने त्यास काहीही मोल नाही.'' (ऑर्गनायझर, ३० नोव्हेंबर १९४९)

माणुसकीचे हक्क हिरावून घेणारी संहिता म्हणून बाबासाहेबांनी ज्या मनुस्मृतीचे महाड सत्याग्रहावेळी दहन केले, त्या मनुस्मृतीचे फक्त गोडवे नव्हेत, तर तिच्यावर आधारित स्वतंत्र व आधुनिक भारताचे संविधान रचले जावे, ही संघाची भूमिका होती. ती किती प्रतिगामी होती, हे आणखी स्पष्ट करण्याची गरज नाही. वरील अवतरणातील 'घटनापंडित' ही उपरोधिक संज्ञा बाबासाहेबांसारख्या घटना बनविण्यात कळीची भूमिका निभावणाऱ्यांना उद्देशून आहे, हे उघड आहे.

**संघही हिंदू कोड बिलाच्या विरोधात**

हिंदू स्त्रियांच्या अधिकारासाठी हिंदू कोड बिलाचा मुद्दा बाबासाहेबांनी लावून धरला व पुढे ते मंजूर होत नाही म्हणून मंत्रिपदाचा त्यांनी राजीनामाही दिला. आमच्या धर्मात ढवळाढवळ करू नका, अशा धमक्या हिंदू धर्मातल्या कट्टरपंथीयांकडून बाबासाहेबांना त्या काळात येत होत्या. मोर्चे निघत होते. संघही या बिलाच्या विरोधात पुढाकाराने होता. खुद्द सरसंघचालक गोळवलकर गुरुजी याबाबत काय म्हणतात, त्याचे ऑर्गनायझरमध्ये छापून आलेले अवतरण गुहा पुढीलप्रमाणे देतात –

''या सुधारणांत काहीही भारतीय नाही. विवाह व घटस्फोटाच्या प्रश्नांची सोडवणूक अमेरिका आणि ब्रिटिश नमुन्यांप्रमाणे आपल्या देशात होऊ शकत नाही. हिंदू संस्कृतीप्रमाणे विवाह हा संस्कार आहे. तो मृत्युनंतरही बदलता येत नाही. केव्हाही बदलावा असा

तो 'करार' नाही.'' गोळवलकर पुढे म्हणतात, ''अर्थात, देशातील काही भागात हिंदू समाजातल्या काही खालच्या जातीत घटस्फोटाला मान्यता आहे व रितीप्रमाणे त्यांच्यात घटस्फोट होतातही. पण त्यांची ही रीत आदर्श मानून सर्वांनी तिचे अनुकरण करावे, असे होऊ शकत नाही.'' (ऑर्गनायझर ६ सप्टेंबर १९४९)

पुढच्या एका संपादकीयात ऑर्गनायझरने या बिलाचा कठोर निषेध केला आहे. आंबेडकर व नेहरू हे या बिलाचे शिल्पकार आहेत म्हणून त्यांचा 'ऋषी आंबेडकर व महर्षी नेहरू' असा उपहासही केला आहे. बाबासाहेबांबाबत संघाची ही दुहेरी नीती उघड करताना बाबासाहेबांवरील अशाच आणखी काही टीकांची नोंद गुहांनी या लेखात केली आहे. जिज्ञासूंनी मूळ लेखात ती पहावी. गुहांचा संदर्भ इथे थांबवतो.

जुनी मते काळ, संदर्भ, आकलन बदलले की बदलतात; त्यात वावगं काही नाही. पण या बदलांचे कारण व विकासक्रम कळला तर. नाहीतर ते ढोंग वा चालबाजी असेल. संघाबद्दल तोच तर आक्षेप आहे. त्याच्या भूमिका बदलाचे कारण ते देत नाहीत. म्हणजेच ती ढोंगबाजी आहे.

संघाची मंडळी विविध मार्गांनी प्रचारत असतात, की बाबासाहेबांचे धर्मांतर ही व्यापक हिंदुत्वाच्या कक्षेच्या आतलीच उडी आहे. ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज या रांगेतलाच एक बौद्ध संप्रदाय. शिवाय हिंदू अवतार कल्पनेप्रमाणे तो विष्णूचा अवतार आहेच. हिंदू विवाह कायद्यात बौद्ध, जैन, शीख या धर्मांचा समावेश होतो. हे तिन्ही धर्म सावरकरांच्या पितृभू संकल्पनेप्रमाणे हिंदू ठरतात. बाबासाहेबांचा हिंदू धर्माच्या आचरणाला विरोध आहे– तत्त्वज्ञानाला नाही... हे सगळं गुंफायचा प्रयत्न संघप्रचारक करत असतात.

**बाबासाहेबांची टीका नवसमाजाच्या बांधणीसाठी**

समतेऐवजी समरसता बोलत राहणे हा असाच चकवा. समरसता या शब्दात सर्व भेद व विषमतांसह गुण्यागोविंदाने (आपापल्या पायरीप्रमाणे) राहा, हे अभिप्रेत आहे. दुसऱ्याच्या सुख–दुःखात समरस व्हा, सगळे भेद विसरून आपल्यातला बंधू–भगिनीभाव जागवा, अशा व्यापक अर्थानेही संघ समरसता शब्द योजत नाही. बाबासाहेबांनी या सर्व उतरंडी, भेदभाव संपवून माणुसकीने ओतप्रोत भरलेली समता प्रस्थापित करण्याचे लक्ष्य समाजाला दिले. समतेचा हा अर्थ विस्मरणात टाकण्यासाठी समरसता हा शब्द आहे. जर संघ बदलतो आहे, तर समरसता या शब्दाचा त्याग करून समता शब्दच त्याने त्याच्या मूळ अर्थासह रूढ केला पाहिजे. बाबासाहेब स्त्री–पुरुष समतेचे पुरस्कर्ते होते. संघात स्त्रियांना आजही प्रवेश नाही. त्यांच्यासाठी स्वतंत्र संघटन आहे. हेही संघाने बदलले पाहिजे. स्त्रियांना संघात प्रवेश मिळाला पाहिजे. बाबासाहेबांचे १२५ व्या वर्षाचे गुणगान गाणाऱ्यांनी त्यांच्या उपदेशातल्या या किमान बाबीही का आचरणात आणू नयेत?

बाबासाहेबांची मुसलमानांविषयीची मांडणी व काश्मीरच्या ३७० व्या कलमाबाबतचे म्हणणे संघाला हर्षवायू घडवणारे आहे. दोघांच्या मांडणीत साधर्म्य आहे. पण हेतूमध्ये साम्य नाही. बाबासाहेब स्वतःला प्रथम व अंतिमतः भारतीय मानतात. इतर कोणत्याही निष्ठांनी

### ...या सगळ्या प्रतिज्ञांचे काय करायचे?

'मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही' ही बाबासाहेबांची घोषणा, त्यांच्या 'जातिनिर्मूलन' या पुस्तकात त्यांनी हिंदू धर्मग्रंथांवर घातलेले घाव, 'रिडल्स इन हिंदुइजम'मध्ये राम–कृष्णावर केलेली टीका, भगवतगीतेवर अनेक ठिकाणी उपस्थित केलेले प्रश्न, त्यांच्या २२ प्रतिज्ञांमधील 'मी राम, कृष्ण.. यांना देव मानणार नाही किंवा त्यांची पूजा करणार नाही' ही किंवा 'मनुष्यमात्राला असमान व नीच मानणाऱ्या हिंदू धर्माचा मी त्याग करतो..' किंवा 'बुद्ध हा विष्णूचा अवतार हा खोटा व खोडसाळ प्रचार आहे, असे मी मानतो' .... या प्रतिज्ञा या सगळ्याचे मग काय करायचे?

या भारतीयत्वाला छेद जाणे त्यांना मंजूर नाही. तर संघ स्वतःचे राष्ट्रीयत्वच हिंदू मानतो. बाबासाहेब बंधुतेला अनन्यसाधारण महत्त्व देतात. बाबासाहेबांची टीका नवसमाजाच्या बांधणीसाठी आहे, तर संघाची टीका त्याच्या विघटनासाठी आहे.

**थोरल्या भावाची जबाबदारी बौद्ध समाजाने नीट पार पाडली नाही**

संघ हे असे भ्रमाचे जाळे तयार करतो आहे. या भ्रमापासून आंबेडकरी जनतेला सावध करणे गरजेचे आहे. दादासाहेब गायकवाडांचा भूमीहक्काचा लढा हा दमदार अपवाद वगळता बौद्धेतर दलितांना–सवर्ण कष्टकऱ्यांना एकवटण्याचे प्रयत्न सोडा ते आपले वाटेकरी होणार नाहीत, याची दक्षता अधिक घेतली गेली. मांग, चांभार, ढोर हे बौद्ध झाले नाहीत म्हणून त्यांना हिणवणे. आमच्या बापाने राखीव जागा मिळवल्या त्याचा तुम्ही लाभ घेत आहात, असे म्हणून त्यांचा पाणउतारा करणे याचा परिणाम ते दूर जाण्यात झाले. यात त्या समाजविभागांचा बाबासाहेबांच्या हयातीतच असलेला स्वभाव, त्यांच्या नेत्यांची वागणूक या बाबीही कारण आहेत. पण थोरल्या भावाची जबाबदारी बौद्ध समाजाने नीट पार पाडली नाही, हे निश्चित. परिणामी, मांग समाज औपचारिकरित्या जयभीम म्हणतो. पण अंतर्गत 'जय लहूजी'वर त्याचा जोर असतो. त्याने आता बौद्धच राखीव जागा हडप करतात, म्हणून आम्हाला आमच्या जातीसाठी स्वतंत्र वाटा द्या, अशी मागणी चालवली आहे. चांभार समाज तर औपचारिकरित्याही 'जयभीम'वाल्यांशी संगत करत नाही. महाराष्ट्रातल्या चांभारांना आपल्याला चुकून दलित वर्गवारीत घातले गेले, असे वाटत असते. अनुसूचित जातींसाठीच्या सवलतींचा लाभ घेतलेल्या प्रमुख दलित जातींचा ढोर, चांभार, बौद्ध व नंतर मातंग असा क्रम लागतो, असे काही अभ्यास अलीकडे आले आहेत. मात्र असा सर्वाधिक लाभ घेणाऱ्या ढोर व चांभार या दलित जाती महाराष्ट्रात दलित चळवळीपासून अलिप्त आहेत. केवळ अलिप्त नाहीत, तर विरोधी छावणीत सक्रिय आहेत. आपण बौद्धांसोबत दिसू नये. अन्य हिंदूतला घटक म्हणून आपल्याला ओळखावे, यासाठी हिंदू अस्मिता ते सध्या अधिकच कवटाळू लागले आहेत.

**...तर समाजाची मनःस्थिती बदलवण्याची तयारी ठेवा**

बौद्धांविषयीची या अन्य दलित समूहांची मनःस्थिती लक्षात

घेऊन भाजप, शिवसेना यांनी त्यांना गटवले. आम्ही जातपात न मानता कसे बरोबरीचे अधिकार देतो हे दाखवण्यासाठी त्यांची सरकारे आली तेव्हा या बौद्धेतर दलितांना आमदार व मंत्रिपदाच्या जागा लक्षणीयरित्या दिल्या. संघ एका बाजूला बौद्ध समाजाला चुचकारतो आहे, बाबासाहेबांना स्वयंसेवक बनवतो आहे, तर दुसरीकडे या बौद्धेतर दलितांशी हिंदू म्हणून सलगी वाढवत आहे. त्यांना बौद्धांपासून दूर राखण्याचा प्रयत्न करतो आहे. २३ जून २०१६ च्या 'सकाळ'मध्ये नागपुरातील अशाच एका मातंग समाजाच्या मेळाव्याचा वृतांत आहे. त्यात नोंदवलेले सरसंघचालक मोहन भागवतांच्या भाषणातील हे वक्तव्यः ''पाणी, देऊळ आणि स्मशान सर्व हिंदूना समान असावे, यासाठी संघ प्रयत्न करीत आहे. संघात जातीचे वर्गीकरण केले जात नाही. हिंदू समाजाचे अंग असलेला मातंग समाज उपेक्षित राहू नये, ही संघाची इच्छा आहे. शिक्षणापासून सुरुवात करा, अडचणीतून मार्ग काढा, समाज शिक्षित झाला तर प्रगती शक्य आहे. पराभवाला विजयात परिवर्तित करायचे असेल, तर समाजाची मनःस्थिती बदलवण्याची तयारी ठेवा. हिंदू समाज तुमच्या सोबत राहील.''

दर्शनी या विधानांत गैर काही नाही. पण हिंदुत्ववाद्यांच्या प्रत्यक्ष कृतीच्या पार्श्वभूमीवर याचा अर्थ लावायला हवा.

**आधी 'जय भीम-लाल सलाम म्हणणाऱ्यांचा बंदोबस्त करू'!**

मातंग समाजाने अण्णा भाऊ साठेंना बाबासाहेबांच्या जागी प्रतिष्ठित करायचा प्रयत्न चालवला आहे. अण्णा भाऊंचे स्वतःचे म्हणून एक मोठेपण आहे. ते कम्युनिस्ट कार्यकर्ते, साहित्यिक, आपल्या शाहिरीने संयुक्त महाराष्ट्राचा लढा दुमदुमवून टाकणारे, सगळ्या सर्वहारांना एकवटू इच्छिणारे, त्यासाठी बाबासाहेबांच्या एकजुटीच्या रथाचे गाणे गाणारे. अधिकृत आंबेडकरी समाज म्हणून जन्माधिष्ठित दावा असणाऱ्या बौद्धांपैकी काहींना अण्णा भाऊंचे हे कम्युनिस्टपण भलतेच सलत असते. म्हणून बाबासाहेबांबरोबर अण्णा भाऊंचा संग त्यांना नकोसा होतो. एकूणच कम्युनिस्ट, गांधीवादी यांच्याबरोबरचे बाबासाहेबांचे ऐतिहासिक छतीसआकडी वाद ही बौद्ध मंडळी आजही घालत असतात. या वादाचे तत्कालीन संदर्भ, सामायिक शत्रूविरोधी सहमतीच्या मुद्यांवर एकत्र येण्याची वर्तमानातील निकड हे काहीही लक्षात घेतले जात नाही. भागवतांचे नंतर बघू आधी 'जय भीम-लाल सलाम म्हणणाऱ्यांचा बंदोबस्त करू', असा पवित्रा या आंबेडकरवाद्यांचा असतो. गांधीजींबद्दल काही बरं यांच्यासमोर बोलणे म्हणजे जमदग्नीचा कोप ओढवून घेणे होय.

एक साधी लढ्याची रणनीतीही ते लक्षात घेत नाहीत. आज संविधान धोक्यात आहे. संविधान मानून ते संवर्धित व्हावे म्हणून लढणाऱ्या शक्तींनी संविधान परिवार म्हणून एकत्र यायला हवे आणि संविधान उद्ध्वस्त करणाऱ्या संघ परिवाराला नेस्तनाबूत करण्याला प्राधान्य दिले पाहिजे. तोवर आपसातल्या मतभेदांना 'टाईम प्लिज' दिली पाहिजे. पण हे होत नाही म्हणून संघ निवांत आहे. शांतपणे व चिवटपणे आपले जाळे विणतो आहे.

**'जयभीम'चा घोष हा प्राण**

देशात दलितांची संख्या १६.६ टक्के इतकी भरभक्कम आहे. या दलितांत शिक्षण वाढत आहे. जागृती वाढत आहे. या शिकलेल्या मुलांना बाबासाहेब आंबेडकर आपले आयकॉन वाटतात. ते त्यांचे आराध्य होतात. हे दलित वेगवेगळ्या जातीचे आहेत. पण त्या प्रत्येकाला बाबासाहेब अगदी खास आपले वाटतात. यात बाबासाहेबांची थोरवी आहेच. पण बाबासाहेबांची जात 'महार' महाराष्ट्राबाहेर नसण्याने या प्रक्रियेला मोठा हातभार लावलेला आहे. महाराष्ट्रात बौद्धांनी (पूर्वाश्रमीच्या महारांनी) जी बाबासाहेबांवर जातीची मालकी स्थापित केली आहे, तशी ती बाहेर कोणी एक दलित जात स्वाभाविकरित्याच करू शकत नाही. महाराष्ट्रात महारांच्या या मालकीमुळे अन्य दलित जाती फटकून राहतात, ती संभावना बाहेर गळून पडते. महाराष्ट्रात आधी वर्णन केल्याप्रमाणे जे चांभार इथे बाबासाहेबांपासून फटकून राहतात, जयभीम म्हणण्याने ज्यांना अधःपतीत झाल्यासारखे वाटते, त्या चांभार जातीच्या उत्तर प्रदेश, पंजाबमधील समूहांच्या अस्मितेचा 'जयभीम'चा घोष हा प्राण आहे.

यात आणखी एक वैशिष्ट्य आहे. पंजाबात समतावादी संत रविदासांची प्रेरणा मानणारा हा दलित चांभार समुदाय आहे. माही गिन्नी बाबासाहेबांबरोबरच रविदासांना भजताना दिसते. तिच्या एका मुलाखतीवेळी तिच्या घरातला फोटो दिसतो. त्यात बाबासाहेबांच्या मोठ्या उभ्या प्रतिमेसोबत वर दोन कोपऱ्यांत एका बाजूला संत रविदास, तर दुसऱ्या कोपऱ्यात तथागत बुद्ध दिसतात. मुद्दा हा, आपल्या सर्व पुरोगामी प्रेरणांना एकत्रित घेऊन पुढे जाताना ही मंडळी दिसतात. देशातल्या दक्षिणोत्तर, पूर्व-पश्चिम सर्व दिशांच्या दलितांत हेच वैशिष्ट्य दिसते. महाराष्ट्रातल्या आंबेडकरी बौद्धांचा एकारलेपणाचा रोग व एकाकीपणाची अवदसा त्यांची नाही, हे पाहून बरे वाटते. महाराष्ट्रातली आंबेडकरी चळवळ अस्मितेच्या अंगानेच प्रामुख्याने गेली, जाते आहे. महाराष्ट्राबाहेरच्या या चळवळींनी उपजीविकेच्या प्रश्नांशीही तिची सांगड घातली आहे. म्हणूनच तिच्या विकासाच्या व व्यापक होण्याच्या शक्यता वाढतात.

आज या सगळ्या प्रांतांतील दलित चळवळीला एकत्र गुंफणारा आयकॉन बाबासाहेब असला तरी संघटक, नेता म्हणून एक गट, संघटन लागते. त्याची अजून तरी अनुपस्थिती दिसते. कांशीराम-मायावतीही ते करू शकले नाहीत. महाराष्ट्रातील आंबेडकरी नेतृत्वाला अजूनही मोठा अवकाश, संधी आहे. या देशभरच्या आंबेडकरी चळवळींना महाराष्ट्रातील अशा नेतृत्वाने साद घातली, तर जोरात प्रतिसाद मिळू शकेल. पण तो अधिकार महाराष्ट्रातल्या आंबेडकरी चळवळीला तयार करावा लागेल. त्यासाठी स्वतःला दुरूस्त करावे लागेल.

या लढ्यातली जनसामान्यांच्या पातळीवरची प्रक्रिया काय असेल, याबद्दल अधिक विचार करायला हवा... हिंदू कट्टरपंथीयांकडे जे एक ध्येय आणि त्यासाठीची निष्ठा आहे, पुरोगामी परिवारात ही निष्ठा वाढवणे आवश्यक आहे. टिकून राहणे आणि जमेल तशी मशागत करत राहणे, हेच तूर्त हाती आहे. ●●●

**(लेखक पुरोगामी चळवळीतले कार्यकर्ते असून सध्या संविधानातील मूल्यांच्या प्रचार-प्रसारात अधिक सक्रीय आहेत.)**

# उत्क्रांतीवादात मानवतावादाची बिजे :


## अभ्यासक्रमातून वगळणे म्हणजे अंधार युगाला आमंत्रण!



प्रा. जयप्रकाश म्हात्रे

**शासनाच्या प्रतिगामी निर्णयामुळे नव सर्जनाची व नव संशोधनाची दारे बंद होऊन 'अंधार युग' आपल्या देशात येईल की काय, अशी दाट शंका येते. अभ्यासक्रमाच्या सहजी करण्याच्या नावाखाली (Rationalization) चे पोकळ कारण पुढे करून भावी पिढ्यांचे कधीही न भरून येणारे नुकसान हे मंडळ करीत आहे. सत्तेच्या मस्तीत काहीही करू पाहणाऱ्या शासनाला व पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाला आपण सर्वांनी संघटितरित्या विरोध केला पाहिजे व देशाला व समाजाला 'अंधार युगा'कडे नेणारे हे निर्णय बदलण्यास भाग पाडले पाहिजे.**

सत्तेच्या मस्तीत ही सत्ताधाऱ्यांना सत्याची नेहमीच भीती वाटते सत्य लपवून ठेवले म्हणजे आपले कार्य सिद्धीस नेता येईल, असा त्यांचा भ्रम असतो; परंतु सत्याची त्सुनामी आपले आसन कधी उद्ध्वस्त करेल याचे त्यांना भान नसते. जगाच्या इतिहासाकडे नजर टाकली, तर याची प्रखर अनुभूती येते. राष्ट्रीय शिक्षण संशोधन व अध्यापन मंडळाने (National Council of Educational Research and Training --NCERT) पाठ्यपुस्तकातून सत्य लपविण्याचा सपाटा लावलेला आहे. इतिहासाच्या पुस्तकातून मुघल साम्राज्य, महात्मा गांधींची हत्या, राष्ट्रीय स्वयंसेवक संघावरील बंदी इत्यादी प्रकरणे पाठ्यपुस्तकातून वगळली आहेत. नववी व दहावी या वर्गांच्या विज्ञानाच्या पाठ्यपुस्तकातून डार्विनच्या उत्क्रांती वादावरील प्रकरण अलीकडचे वगळले आहे. covid-19 पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या मेंदूवर व अभ्यासावर ताण पडू नये म्हणून हे निर्णय घेण्यात आल्याचे कारण पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाने पुढे केले आहे. ते किती हास्यास्पद आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेला, सर्जनशीलतेला, शोधक वृत्तीला चालना मिळेल असे धोरण असताना मंडळाने उलट घातक निर्णय घेतले आहेत.




**विचार विश्वाला कलाटणी देणारा युगप्रवर्तक सिद्धांत**

नैसर्गिक निवडीतून सजीवांची उत्पत्ती होत राहते, असा सिद्धांत चार्ल्स डार्विन यांनी १८५९ मध्ये मांडला. या सिद्धांताने एकच खळबळ उडवून दिली. कारण तोपर्यंत ही जीवसृष्टी ईश्वराने एकाच दमात सात दिवसांत निर्माण केली, असाच समज सर्वत्र होता. डार्विनच्या सिद्धांताने हा समज उद्ध्वस्त होणार होता. धर्म संस्थांनी एकच काहूर या सिद्धांताच्या विरोधात माजविले. तथापि, हा सिद्धांत विज्ञानाच्या सर्व कसोट्यांवर उतरणारा असल्याने व पुढे त्याला जनकशास्त्र व रेणवीय जीवशास्त्र यातून भक्कम पुरावे मिळत गेल्याने हा उत्क्रांतीचा सिद्धांत केवळ सिद्धांत न राहता ते एक वास्तव म्हणून पुढे उन्नत होत गेले आहे. तथापि, अचंबा वाटावा अशा वैविध्याने नटलेली ही जीवसृष्टी उत्क्रांतीच्या प्रक्रियेने निर्माण होणे केवळ अशक्य आहे, असे काही जण विशेषतः धर्माच्या प्रभावाखाली असणारे विद्युतजन म्हणत राहिले आहेत. त्यांनी उत्क्रांतीला पर्याय म्हणून निर्मितीवाद (Creationis m) व बुद्धिमान अभिकल्प (intelligent Design) या संकल्पना पुढे केल्या आहेत. कुणा निर्मिकाने ही सृष्टी निर्माण केली या भ्रमकतेवर या संकल्पना आधारित असून त्यांना कोणताही वैज्ञानिक पुरावा नाही.

याउलट उत्क्रांतीवादाला पुराव्यांची व वैज्ञानिक संशोधनाची भरभक्कम जोड आहे. उत्क्रांतीवादाच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व विचार प्रक्रियेला चालना मिळत राहते. सृष्टी निर्मिती विषयीची जिज्ञासा उत्क्रांतीवादाचा अभ्यास सतत जागृत ठेवते व विद्यार्थ्यांच्या शोधक बुद्धीला चालना देत राहत असते. म्हणूनच देशभरातील जवळजवळ १८०० शास्त्रज्ञ व विचारवंत आणि अध्यापक यांनी संयुक्तपणे 'ब्रेक थ्रू सायन्स' या संघटनेच्या माध्यमातून पाठ्यपस्तके निर्मिती करणाऱ्या राष्ट्रीय शिक्षण संशोधन

व अध्यापन मंडळाला पत्र लिहून आपली उघड नाराजी कळविली असून उत्क्रांतीवादाचा अभ्यासक्रमात पुन्हा समावेश करण्याचे आवाहन केलेले आहे. जगभरातील शाळातून उत्क्रांतीवाद आवर्जून शिकवला जात असून तो आपल्याही देशात शिकविला जात राहावा, अशी कळकळीची विनंती या विचारवंतांनी केलेली आहे.

**उत्क्रांती वादात नव्या मानवतावादाची बिजे**

जुन्या कर्मठ धार्मिक विचारांना व अधंश्रद्धांच्या ढिगाऱ्यांना कायमची मूठमाती देण्याची क्षमता उत्क्रांतीवादात आहे. ईश्वराच्या नावावर निर्माण झालेले देवळे व मंदिरे यांचे साम्राज्य खालसा करण्याचे सामर्थ्य उत्क्रांतीवादात आहे. अमानवी प्रथा कर्मकांडे धर्माच्या नावावर चाललेले अमानवी व्यवहार व व्यापार कायमचे बंद पाडण्याचे सामर्थ्य उत्क्रांतीवादात आहे आणि म्हणूनच कर्मठांचा उत्क्रांतीवादाला विरोध आहे. त्यांचाच प्रभाव पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळावर पडलेला दिसून येतो. सारासार विचार करणाऱ्या आपण सर्वांनी हा प्रभाव मोडून काढायला हवा व स्वच्छ निखळ निर्णय घेणारे पाठ्य पुस्तके निर्माण करणारे मंडळ अस्तित्वात येईल, अशी व्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असायला हवे.

चार्ल्स डार्विन यांचा उत्क्रांतीचा सिद्धांत प्रसिद्ध झाल्यानंतर वैचारिक विश्व अमूलाग्र बदलत गेले आहे. डार्विन यांनी केलेले भाकीत खरे ठरले. आफ्रिकेत जवळजवळ ३१ मानवी प्रजातींचे जीवाश्म शास्त्रज्ञांना सापडत गेले. रेण्वीय जीवशास्त्रातील संशोधनाने उत्क्रांती प्रक्रियेचा रहस्य भेद करत आधुनिक मानवाचा म्हणजे 'होमो सेपियन्स' या प्रजातीचा उदय दोन लाख वर्षांपूर्वी झाला, असे सप्रमाण सिद्ध केले आहे. आधुनिक मानव उदयास आल्यानंतर तो पहिली दीड लाख वर्षे रानटी अवस्थेत होता. ५० ते ६० हजार वर्षांपूर्वी त्याच्या संस्कृतीची पहाट झाली. आपण इतर प्राणीमात्रांच्या तुलनेत वेगळे आहोत, याचे त्याला भान येत गेले. प्रतिकूल हवामानात राहण्यासाठी त्याने आपल्या शेजारच्या बांधवांना मैत्रीची हाक दिली. ही मैत्रीची हाक म्हणजे मानवी संस्कृतीची पहाट होती. ७० लाख वर्षांपूर्वी चिपांझींच्या व मानवाच्या समान पूर्वज प्रजातीपासून अलग झालेल्या पहिल्या मानवी प्रजातीचा मेंदू चिपांजींच्या मेंदू इतकाच म्हणजे ३५० घनसेंटीमीटर इतक्या आकाराचा होता. तो वाढत जाऊन आधुनिक मानवाच्या प्रजातीत तो १३५० घन सेंटीमीटर इतका झाला.

मेंदूच्या आकारात झालेली ही वाढ मांसाहराने झाली हे शास्त्रज्ञांनी सिद्ध केले आहे. वाढलेल्या मेंदूमळे विचारांचे कल्लोळ या आधुनिक मानवाच्या मनात काहूर माजू लागले. अमूर्त विचार समूर्त करण्यासाठी तो राहात असलेल्या गुहांच्या भितींवर व छतावर उभ्या आडव्या रेघा मारू लागला त्यातून कलेचा जन्म होऊन तो भितींवर चित्रे काढू लागला. कालांतराने त्याचे स्वरयंत्र विकसित होऊन तो वाक्यरचनेची अर्थपूर्ण भाषा बोलू लागला. भाषेमुळे त्याचे संपर्क जाल वाढले व जगणे जास्त सुसह्य व सुखकर होऊ लागले. संस्कृतीचा हा आविष्कार विस्तारत जाऊन पुढे त्याने स्वर यंत्रे निर्माण केली व तो संगीताचे सूरही आळवू लागला पुढे दहा हजार

वर्षांपूर्वी तो शेती करू लागला. शेतीमुळे त्याची अन्नासाठी भटकंती थांबली व तो स्थिर जीवन जगू लागला या स्थिर जीवनातून सभ्यता उदयास आली. पाच हजार वर्षांपूर्वी जगाच्या पाठीवर



ठिकठिकाणी अनेक सभ्यता उदयास आल्या त्यानंतरच्या काळात अवतरलेल्या विज्ञान व तंत्रज्ञान याने त्याचे जगणे उच्च पातळीवर येत गेले.

संस्कृती (Culture) व सभ्यता (Civilization) या उत्क्रांतीच्या देणग्या होत. उत्क्रांतीच्या अभ्यासातून या दोन्ही देणग्यांचे मूल्य स्पष्ट होत जाते. त्यामुळे उत्क्रांतीचा अभ्यास किती महत्त्वाचा आहे, हे कळते. संस्कृती व सभ्यता या मानवी मूल्य यांना जन्म देणारी उत्क्रांती अभ्यासणे म्हणनूच अपरिहार्य आहे मानवतावादाची जन्मदात्री उत्क्रांती आहे. मानवतावाद उन्नत करण्याची प्रेरणा उत्क्रांतीच्या अभ्यासातूनच मिळत राहते. आपली सृष्टी कशी निर्माण झाली, आपण कसे घडलो, कसे उन्नत होत गेलो याबद्दलची जिज्ञासा उत्क्रांती शमविते. उत्क्रांती आपल्याला माणूसपण प्रदान करते, याची जाणीव करून देते म्हणूनच उत्क्रांतीचा अभ्यास पाठ्यपुस्तकात असणे नितांत गरजेचे आहे. उत्क्रांती अभ्यासक्रमातून वगळली जाणेही अंधार युगाची नांदी ठरेल. इथे इतिहासातील एक दाखला द्यावासा वाटतो. ख्रिस्त पूर्व पाचशे ते इसवी सन ५०० हा काळ 'अभिजात युग' म्हणून ओळखला जातो. याकाळात ग्रीसमध्ये प्रोटोगोरस, सॉक्रेटिस, ॲरिस्टॉटल हे तत्त्वज्ञ होऊन गेले.

भारतात गौतम बुद्ध व वर्धमान महावीर हे थोर महापुरुष होऊन गेले. त्यांनी मानवी संस्कृती व सभ्यता उन्नत होईल, असे विचार व कृती कार्यक्रम मानवतेला दिले. त्यानंतर इसवी सन ६०० ते इसवी सन १२०० या काळात असे काहीच घडले नाही. उलट, मानवी समाजाची अधोगतीच झाली. म्हणून या काळाला 'अंधार युग' म्हणून समजले जाते. शासनाच्या प्रतिगामी निर्णयामुळे नव सर्जनाची व नव संशोधनाची दारे बंद होऊन 'अंधार युग' आपल्या देशात येईल की काय, अशी दाट शंका येते. अभ्यासक्रमाच्या सहजी करण्याच्या नावाखाली (Rationalization) चे पोकळ कारण पुढे करून भावी पिढ्यांचे कधीही न भरून येणारे नुकसान हे मंडळ करीत आहे. सत्तेच्या मस्तीत काहीही करू पाहणाऱ्या शासनाला व पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाला आपण सर्वांनी संघटितरित्या विरोध केला पाहिजे व देशाला व समाजाला 'अंधार युगा'कडे नेणारे हे निर्णय बदलण्यास भाग पाडले पाहिजे. ●●●

**(लेखक प्राणीशास्त्राचे अभ्यासक व संशोधक आहेत.)**

### पंढरपूर संमेलनातील मांडणी


# 2024 : राज्य संविधानाचे, की मनुस्मृतीचे?




उल्का महाजन

**आज आपण ज्या आव्हानांना सामोरे जात आहोत, त्याबद्दल मनात अस्वस्थता असणारे आम्ही अनेकजण गेल्या दोन-तीन वर्षात एकत्र आलो. ही आव्हाने बदलत्या काळात नव्याने उभी राहत आहेत. या नवीन आव्हानांना भिडण्याचे मार्गदेखील नवीन असावे लागतील, हे जाणून आम्ही या गटाचेच नाव ठरवले, नवी आव्हाने नवे पर्याय.**

ही नवी आघाडी नाही; पण अस्वस्थ व चिंतनशील तसेच कृतिशील समविचारी मंडळींचा एक मंच आहे. संघ परिवार व भाजपच्या कारनाम्यांनी आम्ही अस्वस्थ आहोत. त्यांनी समाजात पसरवलेला विखार व भ्रम दूर करण्यासाठी राज्याच्या विविध भागांत गेल्या दीड वर्षात आम्ही दौरे काढले. अनेक कार्यकर्ते, अभ्यासकांशी चर्चा केल्या. संघ परिवाराने पेरलेले विष संपवण्याचे आव्हान लांब पल्ल्याचे आहे. पण तातडीचे संकट २०२४ चे आहे. त्यामुळे '२०२४ : राज्य संविधानाचे, की मनुस्मृतीचे?' हा सवाल आम्ही जागोजाग विचारला व तोच सवाल पुढे ठेवून या आव्हानाला भिडण्यासाठी आज आपण महाराष्ट्रातील शेकडो कार्यकर्ते पंढरपुरात जमलो आहोत.









या संमेलनाचे आयोजन पंढरपुरात करण्याचे विशेष औचित्य आहे. पंढरपूर ही विद्रोहाची भूमी आहे. वैदिक हिंदू धर्माशी, ब्राम्हण्यवादाशी उभा दावा मांडत मनुस्मृती व जातीय उतरंडीविरोधात विद्रोह इथेच उभा करण्यात आला. पुरोगामी चळवळीसाठी ही सांस्कृतिक रणभूमी आहे. तसेच तनपुरे महाराजांचा मठ हे ठिकाण, विठ्ठल मंदिर सर्व जातींसाठी खुले करण्यासाठी केलेल्या साने गुरूजींनी उपोषणामुळे इतिहासांत नोंदले गेलेले लढ्याचे मैदान आहे. या दोन्ही कारणांनी विशेष ठरलेल्या या भूमीत आपण आजच्या आव्हानांना सामोरे जाण्याची प्रेरणा घेण्यासाठी जमलो आहोत.

नुकताच आपण स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा केला. पण खेदाची बाब अशी, की जे कधीही स्वातंत्र्यलढ्यात नव्हते, ज्यांना तिरंगा मंजूर नव्हता, ज्यांना बाबासाहेबांनी दिलेले संविधान मान्य नव्हते ते या अमृतमहोत्सवी वर्षात सत्तेत आहेत व घर घर तिरंगा लावण्याची सक्ती करत आहेत.

ही राजवट स्वातंत्र्यापासून आतापर्यंत आलेल्या सर्व राजवटीत सर्वात घातक आहे. खोट्याला प्रतिष्ठा देणारी, संपूर्ण देशाला मध्ययुगीन क्रौर्याकडे नेणारी, कॉर्पोरेट भांडवलशाही व मनुवाद्यांची अनिष्ट युती करणारी फॅसिस्ट राजवट. सामान्य माणसांची खऱ्याखोट्याची पारख करण्याची समज व नजरच यांनी संपवली. उन्मादी हिंसक धुमाकूळ घालून भीतीचे वातावरण देशभरात तयार केले. टोकाची विषमता वाढवली. बेरोजगारी, महागाई वाढवत नेली. अल्पसंख्यांकविरोधी विशेषतः मुस्लिमविरोधी जहर समाजात पसरवले. स्वयंघोषित गोरक्षकांचा व कायदा हातात घेणाऱ्यांचा धुमाकूळ तर गेली काही वर्षे सतत चालू आहे, ज्यांचे बळी प्रामुख्याने दलित व मुस्लिम परिवार ठरत आहेत. मोहम्मद अखलाख, पहलू खान, उना येथील दलित बांधव, उत्तर प्रदेशातील अत्याचार, महाराष्ट्रातील नितीन आगे, सागर शेजवळ अशी कितीतरी उदाहरणे आहेत.

या राज्यकर्त्यांनी तीन आयुधे त्यांची राजवट पक्की करण्यासाठी सातत्याने वापरली आहेत. भूक, भय व भ्रम. देशातील भूक जिवंत ठेवली, तर मनातील असुरक्षितता व भीती कायम राहते, अशा भयभीत मनात भ्रम रुजवणे व मसिहांची गरज, अवतार पुरुषाची गरज मुरवत राहणे सोपे होते. हीच दिशा ठेवून त्यांचा कारभार चालू आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर भूक निर्देशांकाच्या यादीत भारत १०७ व्या क्रमांकावर खाली घसरतो व सर्वाधिक श्रीमंत असणाऱ्या देशांच्या यादीत तिसरा येतो. याचाच अर्थ असा, की सरकारचे समर्थन व संरक्षण श्रीमंतांना आहे. ज्यांची उपासमार होते त्यांना नाही.

स्वातंत्र्यानंतर प्रमुख उद्दिष्टांपैकी एक होते, देशातील उपासमारीवर मात करणे व दुसरे होते सामाजिक/आर्थिक विषमता कमी करणे. मात्र अमृतमहोत्सवी वर्षात या दोन्ही आघाड्यांवर पीछेहाट आहे. सर्व लोकशाही यंत्रणांवर त्यांनी कब्जा मिळवला आहे. निवडणूक आयोग, सीबीआय, रिझर्व्ह बँक, राष्ट्रीय तपास यंत्रणा, ईडी या सर्व यंत्रणांच्या प्रमुख पदांवर त्यांची हुजरेगिरी करणारी माणसे बसवण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाच्या चार न्यायाधीशांनी पत्रकार परिषद घेऊन सांगितले, की आज सर्वोच्च न्याययंत्रणापण सरकारच्या दबावाखाली आहे. प्रसारमाध्यमांवर दबाव व मुस्कटदाबी, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा हेदेखील सुरू आहे. इतिहासाची तोडमोड व विकृतीकरण सातत्याने सुरू आहे. याकडे दुर्लक्ष व्हावे अशा कंड्या ते वेळोवेळी पिकवत राहतात व आक्रमक खोट्या जाहिराती करत राहतात. जाहिरातींवर चालणाऱ्या कंपन्या आपण पाहिल्या आहेत; पण जाहिरातींवर

चालणारे सरकार हे पहिलेच. देशभर पंतप्रधानांच्या मर्जीत राहण्यासाठी सर्व यंत्रणांमध्ये एक गाणे नियमित वाजवले जात आहे, 'जो तुमको हो पसंद, वोही बात करेंगे, तुम दिनको अगर रात कहो हम रात कहेंगे.'

जी मनुस्मृती बाबासाहेबांनी १९२७ मधे जाळली, तिचे पुनरुज्जीवन २०१४ पासून सुरू आहे. जातीव्यवस्था तिच्या उतरंडीसह कायम करण्याकडे वाटचाल सुरू आहे. मनुस्मृतीवर बनारस हिंदू विद्यापीठात अभ्यासक्रमपण सुरू करण्यात आला आहे आणि या सर्व डावात बहुजन समाजाला हाताशी धरून ते डाव रेटण्यात येत आहेत.

अदानी, अंबानींच्या व बड्या कॉर्पोरेटच्या हितासाठी शेतकऱ्यांच्या भविष्याशी सौदा करणारे कायदे आणले गेले. कामगारांचे कायदे संपवून जुलमी संहिता लादण्यात आल्या. नोटबंदी, जीएसटी, आधार सक्ती, चार तासांच्या मुदतीत अख्खा देश थांबवणारा लॉकडाऊन लादण्यातून धक्के देत असुरक्षितता व भीती वाढवण्याचे विविध प्रयोग करण्यात आले. नीती आयोग गुंडाळला, दारिद्र्यरेषेचे मापन बंद करण्यात आले. माहिती देणाऱ्या यंत्रणा व त्यातून विविध प्रकारची माहिती देणे थांबवण्यात आले, जेणेकरून वास्तव समोर येऊ नये. निवडणूक रोखे व त्यात कंपन्यांची गुंतवणूक ज्या प्रकारे राबवण्यात आले, त्यातून तर भ्रष्टाचाराला प्रचंड मोठ्या प्रमाणावर नियमानुकूल करून भाजपमध्येच भ्रष्ट व काळ्या पैशांचा ओघ जिरवण्याची व्यवस्था करण्यात आली.

नागरिकत्व कायदा, लोकसंख्या रजिस्टर याद्वारे नागरिकत्वाबाबत विशेषत: मुस्लिम समुदायात प्रचंड असुरक्षितता निर्माण करण्यात आली. लव्ह जिहाद हा नवाच भ्रम निर्माण करून महाराष्ट्रात तर उन्मादी जनआक्रोश मोर्चे निघत आहेत. आंतरधर्मीय लग्नांवर नजर ठेवण्यासाठी समिती नेमणारा जीआरदेखील राज्यात काढण्यात आला आहे.

काल परवा राहुल गांधींबाबत एका किरकोळप्रकरणी कोर्टाने सुनावलेली सजा व त्याआधारे लोकसभेतील सदस्यत्व निलंबित करण्याचा निर्णय म्हणजे हुकुमशाही राजवटीचा इशारा आहे, की खबरदार आमच्याबद्दल काही बोलाल तर. आम्ही तोंडाला येईल ते बोलू, पातळी सोडून टीका करू. पण तुम्ही बोलायचे नाही. लोकशाही संपवण्याच्या त्यांच्या इराद्यावर परत एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. संविधान की मनुस्मृती? हा सवाल पण अधोरेखित झाला आहे.

ही राजवट सर्वात घातक असण्याची ही सर्व कारणे आहेतच; पण त्यांच्याकडे त्यांना अभिप्रेत असणाऱ्या हुकुमशाही व्यवस्था व संविधानबदलाचा आराखडा तयार आहे, हे फारच घातक आहे. सर्व स्तरावर त्यांची पातळी घसरते आहे. ही भारतीय संस्कृती नव्हे, ही संतांनी भारतीय समाजाला दिलेली दिशा नव्हे, ही गंगाजमनी तहजीब नव्हे, हा पंडित नेहरूंनी मांडलेला नियतीशी करार नव्हे, हे गांधीजींच्या कल्पनेतले रामराज्य नव्हे, हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाच्या वाटेवरील आधुनिक भारताचा प्रवास नव्हे. ही सर्व स्तरावरील पीछेहाट आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेत दिलेला इशारा आहे, धर्मात भक्तीमार्ग हा मुक्तीमार्ग बनू शकतो. पण राजकारणात भक्तीमार्ग हा अध:पाताचा व पर्यायाने हुकुमशाहीचा खात्रीलायक मार्ग होतो. जात, धर्म, प्रांत व राजकीय पक्ष एकत्र आले व नागरिक स्वत:ची जात/धर्म राज्यघटनेच्या वर मानू लागले तर देश म्हणून, नागरिक म्हणून आपण आपले स्वातंत्र्य गमावून बसू. हा इशारा लक्षात घ्यायला हवा.

ही अंधभक्ती, हे विकृतीकरण, खच्चीकरण थांबवायचे, तर ज्यांच्या खांद्यावर संविधानाने जबाबदारी सोपवली आहे व संविधानाच्या प्रास्ताविकेतील जे पहिले दोन शब्द आहेत, 'आम्ही लोक' ते जागे होऊन उठले पाहिजेत. संविधानविरोधी शक्ती कोणत्याही परिस्थितीत सत्तेवर राहता कामा नये, असे निडरपणे सांगणारी जनचळवळ मजबूत झाली पाहिजे. आम्हा लोकांच्या हातात आता सत्ताधाऱ्यांवर उगारायचा आसूड आहे, त्याचा उपयोग करायला हवा. लोकशाही व संविधानाच्या रक्षणासाठी ते अत्यावश्यक आहे.

या विरोधात लांब पल्ल्याची आखणी व काम आवश्यक आहेच. पण संघ परिवाराच्या कारवायांना असलेले सत्तेचे संरक्षण काढून घ्यायचे हे तातडीचे उद्दिष्ट असायला हवे, त्यासाठी २०२४ हा एक टप्पा आहे. म्हणून संमेलनाचे शीर्षकपण तेच आहे. पंढरपूरच्या या भूमीतून विद्रोहाची, विचारांची ताकद घेऊन उठू या.

एका बाजूला आपल्या समृद्ध पुरोगामी परंपरांची आठवण करून आपण आपल्या प्रेरणा मिळवू, ती प्रेरणा कृतीप्रवण करणारी असावी. त्यात संतपरंपरा, छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई, फातिमा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, कर्मवीर भाऊराव पाटील, क्रांतीसिंह नाना पाटील, विठ्ठल रामजी शिंदे, गाडगे महाराज, संत रविदास, बसवण्णा, जनाबाई , मुक्ताबाई, चोखा मेळा, बिरसा मुंडा या सर्वांच्या लढाऊ, निडर वृत्ती अंगी बाणवत पुढे निघू.

या परंपरेचा वारसा आपल्यालाच पुढे न्यायचा आहे. पुढील पिढीच्या हाती तो सोपवायचा आहे. आधुनिक भारत घडवण्याचे स्वप्न अकाली संपता कामा नये. सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय मंचांवर आपण काय करणार? या हुकुमशाही राजवटीला सत्तेतून पायउतार कसे करणार, हे ठरवण्यासाठी हे संमेलन आहे.

मानवी समाजाची भूमी विचारांची कसदार बनत असते. पण विचार ही गोष्ट अशी आहे, जी रुजवावी लागते. ती आपोआप रुजत नाही. जिथे ते रुजवले जातात, तिथे पुरोगामी परंपरा तयार होतात. जिथे संतांची भूमी असते, तिथे शिवराय जन्म घेतात, त्याच भूमीत मग महात्मा फुले समाज जागवतात, त्यांचाच वारसा पुढील शतकात शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर चालवतात. हा वारसा गमावता कामा नये. या महान दीपस्तंभांच्या उजेडात विचारांच्या वाटा रुंदावायची जबाबदारी आपल्यासारख्या अनेकांची आहे. त्या उजेडात चालताना आपणही प्रकाश बनू या.

शेवटी झुंज घेणे महत्त्वाचे असते. तुम्ही हरणार की जिंकणार, याची काळजी करत बसून चालत नाही. इतिहास नोंद घेतो त्या झुंजीमागच्या प्रेरणेची, विचारांची. हार/जीत कालसुसंगत असते. आजची हार उद्याची जीत ठरू शकते. तुमचा झुंजीमागचा विचार मानवी संस्कृतीला उन्नत दिशेने नेणारा असेल, तर तो काळाच्या पटावर विजयीच ठरतो. विद्रोहाची इतिहासात नोंद होते. निडर, झुंजार जनसमूहासमोर कोणताही हुकुमशहा निष्प्रभच ठरतो. तेव्हा लढायला तयार होऊ या. लडेंगे तो ही जितेंगे. ●●●

**(लेखिका सामाजिक कार्यकर्त्या आहेत.)**

# भारतीय मूलतत्त्ववाद्यांचा नवा प्रयोग : हिंदू गोर बंजाऱ्यांचा कुंभमेळा




प्रभू राजगडकर

**“गोद्री गावात होत असलेल्या कुंभमेळ्याचे अत्यंत दूरगामी परिणाम तांडासंस्कृतीवर होणार आहेत. हे गंभीर परिणाम केवळ जळगाव जिल्ह्यावर होणार आहेत असे नव्हे, तर सबंध तांडासंस्कृतीलाच हा कुंभमेळा घातक ठरणार आहे. धर्मविहीन जीवन जगणाऱ्या सबंध मानवी लोकसमूहासाठीच हा धर्मांध कुंभमेळा अडचणीचा ठरणार आहे.” असा गंभीर इशाराही डॉ. राठोड यांनी या पुस्तिकेत दिला आहे.**

२०२३ या वर्षीच्या सुरुवातीच्या महिन्यात म्हणजे जानेवारी संपता संपता जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुक्यातील गोद्री या गावी (हे गाव विद्यमान मंत्री गिरीश महाजन यांच्या मतदार संघातील आहे.) अखिल भारतीय हिंदू गोर बंजारा व लबाना-नायकडा समाजाच्या वतीने कुंभमेळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याच्या बातम्या सर्व चॅनेल्सवर धडाधड उमटल्याही. चांगली प्रसिध्दी देण्यात आली.

● या कुंभमेळ्यास दोन विशिष्ट पक्षाच्या नेत्यांची गर्दी झाल्याचे स्मरते.

आजकाल कोणीही असे मेळा-वे भरवितात. यापैकी बरेच मेळावे प्रायोजित असतात. अशा प्रायोजित मेळाव्यातून काहींना उपकृत करून ठेवले, की मताचे पीक सहज घेता येते. अशा प्रकारांना बळी पडणारे अलीकडे खूप आहेत. अशा उपटसुंभांना पुढे नेता म्हणून मिरवता येते व चार पैसे गाठीला बांधता येतात.




तर असो.

● मी यवतमाळ जिल्ह्यातील. त्यामुळे बंजारा समूहातील बरीच मंडळी ओळखीची. थोडेफार ऐकून, थोडेफार वाचून या बंजारा समूहाची सांस्कृतिक ओळख आहे.

● पण इतक्या वर्षात पोहरागडच्या यात्रेशिवाय दुसरा उत्सव बंजाऱ्यांचा महाराष्ट्रात, विदर्भात असल्याचे कधी ऐकण्यात, पाहण्यात आले नाही.

● अचानक जानेवारी २०२३ मध्ये जामनेर तालुक्यातील गोद्री येथे कुंभमेळा भरत असल्याचे दृश्य चॅनेल्सवर दिसू लागले. याचे नेमके कारण काय असेल?

● कोणा ओळखीच्या बंजारा बांधवाला विचारावे असे मनात होते. पण ते राहून गेले.

● अलीकडेच एका कार्यक्रमात बाहेर पुस्तकाचा स्टॉल होता. त्यामधील एका पुस्तकाच्या शीर्षकाने लक्ष वेधून घेतले. लेखक परिचित आहे. उत्सुकता म्हणून या पुस्तकासह अन्य दोन पुस्तकेही विकत घेतली.

**हिंदू गोर बंजाऱ्यांचा कुंभमेळा आणि बंजारा धाटीसंस्कृती :**

ही पुस्तिका केवळ ३८ पानांची असल्याने उत्सुकता म्हणून वा-चून काढली आणि क्षणभर मेंदूला झिणझिण्या आल्या. अस्वस्थ झालो. ज्या समूहाने आपली वेगळी सांस्कृतिक ओळख या महाराष्ट्रात निर्माण केली, आज शैक्षणिक क्षेत्रातही बऱ्यापैकी नावारूपास आली तरी बहुसंख्य लोक अद्यापही तांड्यावरच रा-हतात. याच बंजारा समूहातील स्मृतिशेष वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राचे अकरा वर्षे नेतृत्व केले. त्यांचा आदर्श या समाजाच्या पुढील पिढ्यांनी ठेऊन वाटचाल केली-प्रगती केली. हा समूह आदिवासीप्रमाणे वर्णव्यस्थेच्या बाहेरचा.

जसे फार वर्षापूर्वी येथील आरएसएसकडून आदिवासींवर प्रयोग करण्याचे षड्यंत्र रचण्यात येऊन त्यांना आज वनवासी ठरवण्याचा जोरकस प्रयत्न होतो आहे. आदिवासींमध्ये सेवेच्या नावाखाली प्रवेश करून त्यांना त्यांच्या संस्कृती, त्यांच्या असलेल्या सामाजिक मान्यतेपासून विलग करण्याचे कारस्थान सातत्याने गेली ६६ वर्षे

सुरू आहे. त्यामुळेच आता आदिवासींची स्वतःची 'आदिवासी' म्हणून असलेली ओळख लोप पावते की काय, हा प्रश्न ऐरणीवर आला आहे.म्हणूनच भारतभरातील आदिवासी आपापल्या ठिकाणी याविरुद्ध आवाज उठवत आहे.

नेमका असाच प्रयत्न महाराष्ट्रात बंजारा समूहाबाबत होत असल्याने अस्वस्थ झालेले डॉ. प्रकाश राठोड यांनी ही पुस्तिका आपल्या बंजारा बांधवांना जागृत करण्यासाठी लिहून प्रसिद्ध केली, असे मला ठामपणे वाटते; नव्हे खात्री आहे.

मूलतत्त्ववादी विचारपंरपरेचे लोक-संघटना सातत्याने भारतीय समाजव्यवस्थेत विद्वेष पसरवण्याचे काम करत आहेत. ही मंडळी सांस्कृतिक पातळीवर जशी सक्रिय आहे, तशी राजकारणातही आहे. धर्म व राजकारण याची सरमिसळ करण्याचा नव्हे, तर धर्माला स्वतः च्या राजकीय अजेंड्यासाठी वापरण्याचे झालेले/होत असलेले प्रयत्न आपण अनुभवतो आहोतच. धर्माला राजकारणात ओढून-त्याचा बेमालूम वापर करून देशातील सामान्य जनतेचा बुद्धिभेद करण्याचे कारस्थान सतत सुरू आहे. सलोख्याचे सर्व प्रदेश उद्‌ध्वस्त करून धर्माआधारित-धर्माधिष्ठित राज्यव्यवस्थेच्या दिशेने हा देश घेऊन जाण्याचे प्रयत्न होत आहेत. याबाबतही डॉ. बाबासाहेब म्हणतात, धर्म हा सत्तेचा स्रोत आहे हे भारताच्या इतिहासाने सोदाहरण पटवून दिले आहे.

या धर्माधिष्ठित राजकारण करणाऱ्या राजकीय पक्षाचा अजेंडा एव्हाना स्पष्ट व उघड झाल्याचे दिसतेच आहे. त्यामुळे देशातील अल्पसंख्याक समाज एका अनाम दहशतीखाली वावरत असल्याची मतं अनेक मान्यवर विचारवंत/बुद्धिवाद्यांनी वेळोवेळी मांडली आहेत. या बुद्धिवाद्यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या Annihilation of caste या ऐतिहासिक निबंधामध्ये म्हणतात, प्रत्येक देशात बुद्धिवादी लोक, सत्ताधारी वर्ग नसला, तरी प्रभावशाली वर्ग असतो. बुद्धिवादी वर्गास दूरदृष्टी असते, तो सल्ला देऊ शकणारा आणि पुढाकार घेणारा वर्ग असतो. कुठल्याही देशात सामान्य जनसमुदाय स्वबुद्धियुक्त विचार आणि कृती असलेले जीवन जगत नाही. तो बहुतांशी अनुकरण करणारा असून बुद्धिवादी वर्गाचे अनुकरण करतो. या देशाचे भवितव्य बुद्धिवादी वर्गावर अवलंबून असते असे सर्वस्वी म्हणण्यात अतिशयोक्ती नाही. हा वर्ग प्रामाणिक, स्वतंत्र आणि निर्लोभी असेल, तर संकटसमयी पुढाकार घेऊन तो योग्य दिशा देईल, असा भरवसा त्याच्यावर ठेवता येऊ शकतो. या पार्श्वभूमीवर डॉ. प्रकाश राठोड यांनी ही छोटी पुस्तिका लिहून अशी भूमिका पार पाडली, असे ठामपणे म्हणता येईल. डॉ. राठोड या पुस्तिकेत म्हणतात, "कुंभमेळा घेणारे लोक स्वतःला हिंदू गोर बंजारा म्हणवून घेत आहेत. हे हिंदू गोर बंजारा कोणत्या संस्कृतीचे लोक आहेत? हे लोक हिंदू गोर बंजारा केव्हा झाले? या लोकांचा हिंदू धर्माशी संबंध आहे काय? या लोकांना हिंदू गोर बंजारा कोणी केले? का केले? हे लोक कोणाचे हस्तक आहेत? का आहेत? मुळात धर्म न मानणाऱ्या बंजारा समाजाला हिंदू करण्याचे प्रयत्न केव्हापासून होत आहेत? का होत आहेत? असे प्रश्न कुंभमेळ्याचे आयोजन करणाऱ्या आणि त्यात पुढाकार घेणाऱ्या लोकांना बंजारा समाजाने जरा कठोरपणेच विचारले पाहिजे. कुंभमेळा ही बंजारा समाजाची संस्कृती आहे काय? बंजारा समाजाचा हा धार्मिक विधी आहे काय? कुंभमेळा हा बंजारा समाजाचा महत्त्वाचा धार्मिक विधी असता, तर कुंभमेळ्यात बंजारा समाजाच्या मूलभूत प्रश्नांवर चर्चा झाली असती. कुंभमेळा ही बंजारा समाजाची संस्कृती असती किंवा समाजाचे संघटन करण्यासाठी कुंभमेळा हे प्रभावी माध्यम असते, तर संत सेवालाल महाराजांना आणि संत रामराव महाराजांनाही कुंभमेळ्याचे आयोजन करावेसे वाटले असते. बंजारा समाजात असे धार्मिक मेळे यापूर्वी का झाले नाहीत? हजारो वर्षे बंजारा समाजाला जे सुचले नाही ते या मंडळींना कसे सुचत आहे? असे प्रश्न स्वाभाविकपणेच या निमित्ताने पुढे येतात. त्यामुळे या कुंभमेळ्याची बंजारा धाटीसंस्कृतीच्या वैज्ञानिक निकषावर चिकित्सा करणे आज आवश्यक झाले आहे." असे अनेक मूलभूत प्रश्न उपस्थित करत डॉ. प्रकाश राठोड यांनी या कुंभमेळ्याची चिरफाड केली आहे.

या छोट्या पुस्तिकेत त्यांनी ऐतिहासिक तथ्यांची मांडणी करत नेमका बंजारा समाज कसा आहे, याचे खरे चित्र स्पष्टपणे मांडले. गोद्री गावातील कुंभमेळा म्हणजे फॅसिस्ट प्रवृत्ती असल्याचेही नमूद केले आहे. ते म्हणतात, "गोद्री गावात होत असलेल्या कुंभमेळ्याचे अत्यंत दूरगामी परिणाम तांडासंस्कृतीवर होणार आहेत. हे गंभीर परिणाम केवळ जळगाव जिल्ह्यावर होणार आहेत असे नव्हे, तर सबंध तांडासंस्कृतीलाच हा कुंभमेळा घातक ठरणार आहे. धर्मविहीन जीवन जगणाऱ्या सबंध मानवी लोकसमूहासाठीच हा धर्मांध कुंभमेळा अडचणीचा ठरणार आहे." असा गंभीर इशाराही डॉ. राठोड यांनी या पुस्तिकेत दिला आहे.

पुढे ते म्हणतात, "इतकेच नव्हे तर या देशातील सर्वच साधनवंचित लोकसमूहांना वेगवेगळी आमिषे दाखवून त्यांना हिंदुत्वाकडे आकर्षित करण्याचे प्रयत्न केले जात आहेत." गोद्री गावात हिंदू गोर बंजारा कुंभमेळा जाहीर झाल्यानंतर या तथाकथित कुंभमेळ्याविरुद्ध अखिल भारतीय तांडा सुधार समितीने डॉ. प्रकाश यांच्या नेतृत्वात सतत तीन-चार महिने जनजागरण केल्याचेही कळते.

हे आव्हान किती भयंकर-भयावह आहे यांचे सूचनच संपूर्ण पुस्तिकेत डॉ. प्रकाश राठोड करतात. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट'मध्ये म्हणतात, "तुम्हाला त्या व्यवस्थेला खिंडार पाडण्याची इच्छा असेल, तर विवेकाला नकार देणाऱ्या वेद आणि धर्मशास्त्रांना सुरुंग लावलाच पाहिजे." असे सुरुंग लावण्याचे काम डॉ. प्रकाश राठोड यांच्या हिदू गोर बंजाऱ्यांचा कुंभमेळा आणि बंजारा धाटी संस्कृती या छोट्या पुस्तिकेने केले आहे, असे निश्चित म्हणता येते. एक महत्त्वाचा विषय अत्यंत अभ्यासपूर्ण व संयतपणे मांडल्याबद्दल डॉ. प्रकाश राठोड यांचे अभिनंदन. सर्वांनीच आवर्जून वाचावे अशी ही पुस्तिका आहे. ●●●

**हिंदू गोर बंजाऱ्यांचा कुंभमेळा आणि बंजारा धाटी संस्कृती**

लेखक : डॉ. प्रकाश राठोड

प्रकाशक: अखिल भारतीय तांडा सुधार समिती

किंमत : ४० रुपये

# बुद्धाच्या एका मूर्तीसाठी व्याकूळ झालेली बुद्धिस्ट महिला

एक गोष्ट खरीय आणि ती म्हणजे भगवान गौतम बुद्ध आणि बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे परिवर्तनाचे चक्र फिरवण्यात पूर्वाश्रमीची अस्पृश्य आणि त्यातही महार जातीची महिला आघाडीवर होती आणि आज नवबौद्ध बनलेली महिलाच आघाडीवर आहे. १९२७ ला झालेल्या महाडच्या सत्याग्रहात ही महिला मोठ्या संख्येने सहभागी झाली. उन्ह-वाऱ्यात आणि अनेक मैलाचे अंतर तुडवत ती महाडमध्ये दाखल झाली होती. तिला गुलाम करणाऱ्या, पापयोनी ठरवणाऱ्या मनुस्मृतीचे दहन तिनं आपल्या डोळ्यांनी बघितलं होतं. तेथेच मंडपात डॉ. बाबासाहेबांनी दिलेलं क्रांतिसुक्त तिनं आपल्या काळजात पेरलं होतं. महिलांचा सहभाग असल्याशिवाय कोणतेही महत्त्वाचे कार्य यशस्वी होत नाही. कोणतेही परिवर्तन पूर्ण होत नाही, हे ते बाबासाहेबांनी सांगितलेलं सूत्र होतं. ते घेऊनच ही महिला पाच वर्षे चाललेल्या काळाराम सत्याग्रहात उतरली. हेच सूत्र घेऊन ती सर्व परिवर्तनाच्या चळवळीत उतरली. हेच सूत्र घेऊन ती नागपुरात नवबौद्ध होऊन परतली आणि हेच सूत्र घेऊन पुढे कर्मवीर दादासाहेब गायकवाडांनी चालवलेल्या भूमिहीनांच्या सत्याग्रहात लढ लढ लढली. डॉ. बाबासाहेबांच्या चळवळीत तिनं आपलं स्थान इतकं ठळक बनवलंय, की ते कधीच अस्पष्ट होणार नाही. या सर्व आपल्या कर्तृत्वाला तिनं हजारो-लाखो लोकगीतात विणलंय. तेव्हा अशिक्षित असणाऱ्या या लढवय्या महिलांनी स्वतः ला आणि स्वतःच्या लढायांना गीतांतून व्यक्त केलंय. ही सारी गीते किंवा गाणी एकत्र केली, की भीम पर्वाचा धगधगता इतिहास किंवा या पर्वाचंही एक चरित्र आपल्यासमोर उभं राहतं. या इतिहासाचा प्रारंभ सुभेदार रामजी आंबेडकरांपासून सुरू होतो आणि धर्मांतरापर्यंत पोहोचतो. इतिहास घडवणारे महानायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर या साऱ्या इतिहासात भरून पावतात. त्यांच्या सर्व विचारांचे, सर्व हालचालींचे, साऱ्या साऱ्या लढ्यांचे वर्णन या गाण्यांमध्ये येते. खरे तर, ती आंबेडकरी भारताला गाण्यातून मांडणारी आद्य चरित्रकार म्हणावी लागेल. धर्मांतरानंतर या महिलांनी आपली सारी प्रतिभा आणि शहाणपण बुद्ध चरित्र मांडण्यासाठी खर्च केले. गुलामापेक्षा वाईट जीवन जगणारी ही महिला प्रतिभावंत आहे, बंडखोर आहे, विचारी आहे आणि लढाऊ आहे. फुले-आंबेडकरांची ती लेक आहे. तिच्या साऱ्या वाटा निखाऱ्याच्या आणि हातात निळा झेंडा आहे. गळ्यात बुद्धाची प्रतिमा आहे. धर्मांतरानंतर तिच्या जीवनात महाक्रांती घडली. अस्पृश्यकण्य असलेली ही महिला बुद्धकन्या झाली. तिने बुद्ध आपल्या काळजात कोरला. त्याला आपल्या विश्वात आणि युद्ध विश्वात लढण्याचा भाग बनवले. त्याच्यावर लाखो, कोट्यवधी गाणी लिहिली. 'भारत बौद्धमय करेन' ही भीमगर्जना पूर्ण करण्यासाठी



तिनंही अशाप्रकारे आपला सहभाग नोंदवला आहे. त्यासाठी आपलं वैचारिक आणि सांस्कृतिक जग तयार करते आहे. त्यासाठी गाण्याचा आधार घेते आहे. १९७० पर्यंत ही गाणी भरात आली होती. त्यानंतर साक्षरता वाढल्याने या महिला लेखनाकडे वळल्या. सत्तरीपर्यंत या महिलांनी बुद्ध आणि बाबासाहेबांवर लिहिलेली गाणी हेच आपलं सुंदर भाव विश्व आणि सांस्कृतिक विश्व बनलं होतं.

'बुद्धाची मूर्ती' या नावानं खूप प्रसिद्ध झालेलं एक गाणं १९८५ पर्यंतच्या पिढीनं गायलं आहे. भीम जयंती आणि बुद्ध जयंतीला अशा गाण्यांचा जल्लोष असतो. तर हे गाणं आजही साठीत असलेल्या अनेकांच्या ओठांवर आहे. हे गाणं याच अंकात दिलं आहे म्हणून पुन्हा या ठिकाणी देण्याची आवश्यकता नाही. नवबौद्ध महिलेला मोठ्या आनंदासाठी, माहेरला जाण्यासाठी बुद्ध जयंती आणि भीम जयंती हे आनंदाचे दिवस असतात. पूर्वी हिंदू सणावाराला म्हणजे दसरा-दिवाळीला ती माहेरी जायची. धर्मांतरानंतर आणि बाबासाहेबांनी दिलेल्या बावीस प्रतिज्ञांनंतर हे सण संपले आणि यादोन महा जयंत्यांचेच सणात रूपांतर झाले. बौद्ध संस्कृतीमधील या महत्त्वाच्या दिवशी माहेरला जाण्यासाठी तिला ओढ लागते. मुराळी म्हणून तिला घेण्यासाठी येणाऱ्या भावाची तिला आठवण होते. या आठवणीचे, कल्पनेचे रूपांतर सहज सोप्या गाण्यात होते. कल्पनेच्या हिंदोळ्यावर बसून ही सासूरवाशीण भावाला सांगते, की "भावा तू मला बुद्ध जयंतीसाठी न्यायला जरूर ये. पण येताना बाकी काही आणू नकोस तर फक्त बुद्धाची एक मूर्ती घेऊन ये". मूर्तीच

का आणायची याचं वर्णनही ती गाण्यात करते. तिच्या मते, साडी चोळीला काही अर्थ नसतो. भावानं ती आणू नये. चार दिवसांत ती फाटून जाते. माडी-बंगल्याची काही गरज नाही तोही पडून जातो. बुद्धाची मूर्ती घेऊन ये कारण तो जन्मभर बरोबर राहतो. ना तो जुना होतो, ना तुटतो, ना फाटतो. असा बुद्धच मला घेऊन ये. वस्तू आणू नकोस. तसं माझ्या संसारात उणे काहीच नाही. मला घर आहे, जमीन आहे, वस्त्र आहे. फक्त बुद्धाची मूर्तीच हवी आहे, असा आग्रह गाण्यातील बहीण करत राहते. एका अर्थाने ती भौतिकता नाकारते. वस्तूवाद नाकरते. कपडे, घर हे सारं भौतिक आहे आणि त्याला शेवट आहे. यासाऱ्या गोष्टी म्हणजे एका अर्थाने तृष्णा आहे. तृष्णामुक्त होण्यासाठी बुद्धांनी चार आर्यसत्ये सांगितली आहेत. सम्यक जीवनाचा सिद्धांत सांगितला आहे. बुद्ध विचार अमर्त्य आणि वस्तू मर्त्य आहेत. बुद्ध विचार मूर्तीच्या रूपाने जर जवळ राहिला, तर जणू काही संसार समृद्ध होतो आणि त्याचवेळेला तृष्णाहीनही होतो. तृष्णा मुक्त होण्याचा विचार निरक्षर महिलांच्या मनात आला. त्यांनी त्याचे गाणे केले आणि आपल्यासमोर ठेवले. अशा लोकगीतांनी चळवळीला चालना तर दिलीच शिवाय प्रबोधनासाठीही मोठे काम केले. बुद्धाच्या काळातल्या जशा थेरी गाथा तशा आपल्या ह्या बुद्ध गाथा, भीमगाथा आहेत. त्याकडे दुर्लक्ष झाल्यास आपण एक मोठा खजिना गमावून बसू.

# देव देव खेळू या डार्विन, डार्विन मारू या...

देवमय, धर्ममय होऊ पाहणाऱ्या भारतातील सरकारने अखेर डार्विनचा उत्क्रांतीवादाचा सिद्धांत अभ्यासक्रमातून वगळण्याचा निर्णय घेतला आहे. जगभरातील विद्यार्थी हा सिद्धांत शिकतात आणि मानवी जन्माची चित्तरकथा समजून घेतात. खरे तर, धर्मवाद्यांना, त्यातही मूलतत्त्ववाद्यांना हा सिद्धांत तेव्हाही आणि आताही अडथळ्याचा ठरतो आहे. डार्विन माणसाचा जन्म कसा झाला याचे कोडे विज्ञानाच्या सहाय्याने सोडवतो आणि जगभरातील मूलतत्त्ववादी ते चमत्काराच्या मदतीने सोडवतात. डार्विनच्या अगोदर आणि आजही असा वर्ग आहे. सफरचंद खाल्ल्याने, पेरूची फोड खाल्ल्याने, यज्ञातून, वायू आणि सूर्यापासून, मडक्यातून असे नाना प्रकारे लोकांचा आणि त्यांच्या देवाचे जन्म दाखवण्यात आले आहेत. अगदी परवा परवा पर्यंत आणि आताही सिंहासनासाठी सोने गोळा करणाऱ्या एका बुवाने तर आंबा खाल्ला की मुलगा होतो, असे सांगायला कमी केले नाही. या बुवाचे खरे मानले तर कोकणात मुलीच दिसल्या नसत्या. काही असो विज्ञानाची धर्माला नेहमीच भीती वाटत आली आहे. माकडापासून माणूस की देवापासून माणूस, वेदापासून माणूस याप्रश्नात माकडाला पराभूत करण्याचा प्रयत्नही अनेकदा झाला. डार्विनचा सिद्धांत शिकवायचाचं नाही असे काही कायदेही पुराणमतवाद्यांनी तयार केले होते. पण काहींनी ते मोडलेही. वर्गात डार्विन शिकवणाऱ्या एका शिक्षकाला अटकही झाली होती. १९२५ मधील टेनेसी येथील एका शिक्षकाला अटकही झाली होती. ख्रिस्ती धर्मातील काही मूलतत्त्ववादी संस्था



आणि त्यांनी नेमलेले काही भाडोत्री संशोधक आजही डार्विनला विरोध करतात. क्लोनिंगचे तंत्र, डीएनएचे संशोधन विकसित होत असल्याच्या काळातही विरोध कायमच आहे. काहींनी डार्विनची हेटाळणी करण्यासाठी त्याच्या सिद्धांताला 'मंकी लॉ' म्हणजे माकडाचा सिद्धांत असे नाव दिले. या सिद्धांताविरुद्ध काही देशांनी कायदे केले आणि ते रद्दही केले. डार्विनच्या स्मृतिशताब्दीला म्हणजे १९८५ लाही डार्विनला मरणोत्तर कोर्टात खेचण्यात आलं. तेथेही तो मरणोत्तर निकला. डार्विनचे दुष्मन वाढत आहेत आणि त्यापेक्षा समर्थकही वाढत आहेत. धार्मिकदृष्ट्या जगाची म्हणजे माणसाची निर्मिती वेगळ्या पद्धतीनं झालीय, तर डार्विनच्या संशोधनानुसार ती वेगळी आहे. विज्ञान आणि धर्म, आधुनिकतावादी आणि मूलतत्त्ववादी म्हणजेच उजेड आणि अंधार यांतील हा संघर्ष आहे. भारतात ब्रह्मदेव माणूस जन्माला घालतो. त्यासाठी तो आपले तोंड, दंड, मांड्या आणि पाय या अवयवांचा वापर करतो. अवयवानुसार त्या-त्या माणसाला प्रतिष्ठा देतो. कौरव मडक्यातून, कर्ण सूर्यापासून जन्माला येतो. हा जो धर्मातील चमत्कार आहे त्याला मजेत 'देव देव खेळू या' असे म्हटल्यास वावगे होणार नाही. या खेळाला प्रत्यूत्तर म्हणून काहींनी 'डार्विन डार्विन मारू या' असा खेळ रचला आहे. आपल्या शिक्षणातून डार्विन आता हद्दपार होणार आहे कारण 'देव देव शोधू या' असा खेळ सुरू झाला आहे. अभ्यासक्रमाबाबत असे काही होणार याबाबत केंद्रातील एका मंत्र्यानेच सूतोवाच केले होते. डार्विनचा सिद्धांत खोटा आहे, असे म्हटले होते. त्यांच्या सरकारच्या मांडीखाली असलेल्या संस्थेने हे खरे करून दाखवले. विज्ञानाला सामोरे जाणारा नव्हे, तर त्यापासून पळून जाणारा, सोयीचा इतिहास सांगणारा अभ्यासक्रम सुरू होणार हे आता स्पष्टच झाले आहे. जगभरातील हजारो शहाणी माणसं भारत सरकारच्या यानिर्णयाला विरोध करत आली असली, तरी भारत नमणार नाही. उलट या विरोधाला तो विश्वगुरू होण्याची संधी असंही म्हणेल.

एकीकडे डार्विनचे नामोनिशाण पुसून टाकण्याचे प्रयत्न, तर दुसरीकडे भगवे बनलेल्या मध्य प्रदेशातील सरकारने यंदापासून पाठ्यपुस्तकात परशुराम शिकवण्याचे ठरवले आहे. त्याचे वारसदार असणाऱ्या ब्राह्मणांच्या हितासाठी कल्याण मंडळ आणि ब्राह्मण पुरोहितासाठी मासिक मानधनही सुरू करण्याचे ठरवले आहे. एवढेच नव्हे, तर विज्ञानातील, मैदानातील नव्हे, तर पुराणातील

नायक आठवीपर्यंत शिकवले जाणार आहेत. ब्राह्मणी देश धावला. देशासाठी त्याग केला. ते विद्वान आहेत. गरीब आहेत. त्यांच्या कल्याणासाठी आता मंडळ काम करेल. या समाजाचा वीर पुरुष ज्याने एकविस वेळा पृथ्वी प्रदक्षिणा करून सर्व क्षत्रियांना ठार केले. निर्वंश केले त्या परशुरामाचीही पुस्तकात एन्ट्री होणार आहे. त्याच्या नावाने कोट्यवधी रुपये खर्चून तीर्थक्षेत्र उभे केले जाणार आहे. यापुढे जगात सर्वात उंच असा त्याचा पुतळाही उभा केला जाईल आणि सर्वात मोठी कुऱ्हाड दिली जाईल. हे सर्व करत असताना क्षत्रियांना ठार करणाऱ्या परशुरामाने किती हिंसाचार केला असेल, असा प्रश्न कुणालाही पडणार नाही आणि समजा पडलाच, तर तो धर्मद्रोह्यांच्या यादीत जाईल. चार दिवसांपूर्वी देशभर धुमधडाक्यात साजरी झालेली परशुरामाची जयंती पाहायला हरकत नाही. विशेष म्हणजे, ज्यांच्या वारसदाराला म्हणजे वंशावळीला परशुरामाने मारले होते तेही या जयंतीत आघाडीवर होते. मूलतत्त्ववाद कसा मोठा होतो आणि कोण मोठे करते हे आता तरी समजून घ्यायला हरकत नाही. परशुराम झळकणार आणि इतिहासातील बिगर हिंदू पाठ्यपुस्तकातून गायब होणार, गाईच्या पोटातील तेहतीस कोटी देवांना प्रतिष्ठा मिळणार आणि ते शक्य नव्हते असे सांगणाऱ्या म्हणजेच एकूणच दैववाद नाकारणाऱ्या डार्विनच्या वाट्याला पुन्हा तीच उपेक्षा असणार.

## त्र्यंबकला देवीच्या दारांत होणारा पंगत भेद संपला

'सारी देवाची लेकरे असतात' हा कोणी तरी तयार केलेला प्रत्यक्षात मात्र खोटा असतो, हे भारतातल्या जातव्यवस्थेत सातत्यानं सिद्ध होत आलं आहे. त्याविषयी ना कोणाला खंत असते ना कोणाला लज्जा. आपल्याकडे आजही दलितांचे देव वेगळे, त्यांच्या जागा वेगळ्या आणि सवर्णांचे देव वेगळे आणि त्यांच्या जागा वेगळ्या असतात. परमेश्वराची लेकरेच जात व्यवस्थेच्या माध्यमातून हे सारे घडवत असतात किंवा तशी त्यांना सक्ती असते. याला कोणताही धर्म तसा अपवाद नाही. काही वर्षांपूर्वी जसा दलित हिंदू वेगळा होता तसा ख्रिस्ती महार, महार मुस्लिम, महार शीत्वही वेगळे होते. देशात आजही अनेक ठिकाणी त्यांची धर्मस्थळे वेगळी दिसतात. हिंदू धर्म अर्थातच आघाडीवर कारण त्याच्या पोटात चार हजारांहून अधिक जाती. जेवढ्या जाती तेवढे भेद. हे सारे भेद जीवनातील सर्व धार्मिक, सांस्कृतिक कार्यात दिसतात. आजही ब्राह्मणाचे लग्न भल्या सकाळी तर बिगर ब्राह्मणाचे भल्या सायंकाळी लागते. काही समाज सूर्यास्तापूर्वी जेवतो, तर काही सूर्यास्तानंतर. काहींचे देव गावाच्या बाहेर, उकिरड्याच्या आसपास राहतात, काहींचे बांधावर, तर काहींचे गावाच्या काळजात चालतात. काहींना मांसाहारी नैवेद्य तर काहींना शाकाहारी, काहींच्या अंगावर चिंध्या तर काहींच्या अंगावर सोने असते. कर्नाटकात एका देवाला त्याला वापरता यावे म्हणून भले मोठे चप्पल भेट दिले जाते, तर काहींना सोन्याचा मुकूट. तात्पर्य, माणसांत जेवढे भेद आहेत तेवढे त्यांच्या देवांत आणि त्यांच्या कर्मकांडातही आहेत.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने गेल्या काही वर्षांपासून



अंधश्रद्धा आणि अविवेक यांच्या विरुद्ध जागर सुरू केला आणि माणूस घाण वाटणाऱ्या, माणसाची अप्रतिष्ठा करणाऱ्या अनेक कूप्रथांविरुद्ध घटनात्मक मार्गाने आवाज उठवला. जात पंचायत मूठमाती अभियान असेल, जात पंचायत आणि अंधश्रद्धा निर्मूलनासाठीचा कायदा असेल, भोंदू बाबांविरुद्धच्या मोहिमा असतील त्यात या संघटनेने सातत्याने आणि परिणामकारक काम केले आहे. कृष्णा चांदगुडे यांनी जात पंचायतीच्या अत्याचाराविरुद्ध खूप मोठे काम केले आहे. त्यावर ग्रंथही लिहिले आहेत. अनिसने कामाच्या सोयीसाठी ज्या वेगवेगळ्या उपशाखा बनवल्या आहेत, त्यात जात पंचायतींकडे जाणिवपूर्वक लक्ष देऊन काम सुरू केले आहे. गोराणे, घोडेराव आदी अनेक कार्यकर्त्यांची फळी जाती प्रथा आणि त्यातून येणारी विषमता याविरुद्ध प्रबोधन, आंदोलन या मार्गाने काम करते आहे. त्र्यंबकेश्वर हे तीर्थक्षेत्र आहे आणि अशाच ठिकाणी वेगवेगळ्या कारणांनी भेदाभेद तयार झालेले असतात. लोक आंधळेपणाने ते पाळतही असतात. त्र्यंबकेश्वरमध्ये महादेवी गावाची एक ग्राम देवता आहे. बहुतेक गावांना ग्राम देव किंवा ग्राम देवता असते. गावाच्या रक्षणाची जबाबदारी त्यांच्यावर असते. त्या मोबदल्यात लोक भक्ती करतात. महानैवेद्य तयार करतात आणि अजूनही काही करत असतात. त्र्यंबकेश्वरमध्ये वर्षातून एकदा घरटी धान्य, पैसा अशी वर्गणी जमा करून महानैवेद्य तयार केला जातो. गाव पंगत बसवून सर्वांना नैवेद्य वाढला जातो, म्हणजे जेवणच दिले जाते. हे सारे करत असताना अर्थातच जातव्यवस्थाही पुढं यायची. सोवळ्यातील ब्राह्मणांसाठी वेगळी पंगत आणि उर्वरित लोकांसाठी वेगळी पंगत असायची. सारीच परमेश्वराची लेकरे हे सूत्र एकीकडे आणि लेकरांमधील भेदाभेद दुसरीकडे, असा हा प्रकार होता आणि अर्थातच तो भूदेवांनी म्हणजे ब्राह्मणांनी तयार केला होता. अनेक वर्षे तो कायम राहिला. लोक आपापल्या पायऱ्यांप्रमाणे बसत राहिले आणि उठतही राहिले. त्र्यंबकेश्वरमध्येच नव्हे, तर बहुतेक तीर्थक्षेत्रात आणि इतरत्रही असेच घडायचे. सवर्णांच्या लग्नात ज्या पंगती बसत त्यात दलितांची शेवटचीच असायची. काळाच्या ओघात आणि सामाजिक, धार्मिक सुधारणांसाठी होत असलेल्या आंदोलनात या प्रकारांना धक्के बसू लागले. पंढरपुरातही बरीच वर्षे जातवार दिंड्या यायच्या आणि बडव्यांच्या ताब्यातील मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश असायचा नाही. चोखा महाराची पायरी अजूनही त्याची साक्ष आहे. इतकी वर्षे झाली; पण मरणोत्तरही त्याला वरची पायरी मिळालेली नाही. त्र्यंबकेश्वरमध्ये अंनिसने प्रबोधन, विचार, चर्चा आणि सर्व समाजाला विश्वासात घेऊन पंक्तिभेद संपवला, हे चांगले आणि ऐतिहासिक झाले. आता प्रश्न आहे तो पंक्तिभेदानंतर मतभेद संपवण्याचा.

**– तात्या विंचू**

# बुद्धाची ज्ञानगंगा

बुद्धाची ज्ञानगंगा दाखवते मार्ग आम्हाला....
देते प्रज्ञाशील करुणा जगाला

तत्त्वज्ञान मांडिले तयांनी
येते दुःख वाट्याला...
तृष्णेमुळे मानवाला

दिधली छाया अशी सर्वांना
बुद्धाच्या अमोघ तत्त्वज्ञानाने
जगात ओळखतात भारताला



दिली स्त्रियांना शिकवण सन्मानाला
अर्थ माणूस म्हणून जगण्याला
गेली ती आम्रपाली सामोरी प्रकाशाला

अंगुलीमालही चालत राहिला
अत्: दीप् भव्च्या वाटेला
मिळाला नसणाऱ्यांना चेहरा ....
स्वतःच प्रकाशमान व्हा या सार्थ वचनाला

मिळून आपण सर्वजण भेटू अंधाराला
चालत राहू बुद्धाच्या मार्ग दीपाला
आणू या नव प्रकाशाला

दिली ही शिदोरी बाबासाहेबांनी दलितांना...
जी कधीही नव्हती. ...
आणि आयुष्यभर पुरणारी आम्हाला
विश्वाला तारण्या आता नको काही
फक्त बुद्ध हवा! बुद्ध हवा जगाला!!

**– सौ. लता कांबळे,** नाशिक

# मार्गदाता

पत्नी, राजमहल त्यागून त्यांनी सत्याचा मार्ग दिला
अवघ्या जगाचा तो देव नाही, पण एक मार्गदाता झाला

मार्ग दावूनी या जगाला
अवघी धरती बुद्धमय झाली
बघून ज्ञानाचा साठा
आम्रपाली बुद्धांना शरण आली

हिंदूराष्ट्र बोलून विसर पडतोय
तुम्हा सत्यवादी धम्माचा
पण या जमिनीने सांगून दिले
हा देश फक्त गौतम बुद्धाचा

या दलित समूहात जर भीमाचा जन्म झालाच नसता
तर हा विज्ञानवादी धम्म आम्हा कधी मिळालाच नसता

तुमचे होत असतील चमत्कार, पण
माझ्या बुध्दाने सत्याचा मार्ग दाखवला
बुद्धविहारांना मंदिराचं नाव देऊन
तुम्ही आमचा गौतम बुद्धच लपवला

प्रत्येकाच्या ह्रदयावर राजा अशोकाने बौद्ध धम्म कोरला
हळद-कुंकू लावून यांनी माझा बुद्धच चोरला

बुद्धांचा विचार हा फक्त मूर्तीतच बंदिस्त ठेवला
अरे, बुद्ध चोरला तर चोरला अन् बुद्धांसमोर निवद ठेवला

बनवून बुद्धाची देवी नाकात तुम्ही नथ घातली
आमचा बुद्ध चोरताना तुम्हाला लाज नाही वाटली

काही लोक भारतात राहून
हिंदू धर्माची तुरा सांभाळताय
पण बाहेरदेशात पडल्यावर
गौतम बुद्धाची ओळख सांगताय

पायी येतो पंढरीला, आम्हालासुद्धा
भंडारा माखवा
पण त्या विठू-माऊलीत लपलेला
आमच्या बुद्धांचा चेहरा दाखवा

बाहेर भिकारी आणि मंदिरात
तुमच्या दगडात असते आई
पण आमच्या बुद्धविहारासमोर
तुम्हाला एकही भिकारी दिसणार नाही

मनुवादी जरी बुध्दाचा खरा इतिहास लपवत असतात
पण लेण्यांच्या प्रत्येक दगडावर बुद्ध कोरलेले दिसतात

**– अनिकेत काशीद** (त्र्यंबकेश्वर)

# अहंकाराचा संहार

बाबासाहेबांचा विचार घ्यावा की अनुभव
शिका, संघटित व्हा, संघर्ष करा; की
पढे लिखे लोगोंने मुझे धोका दिया है?
पण आपण त्यांचा बुद्ध घेतला

भगवान बुद्धाची शिकवण घ्यावी की अनुभव?
बुद्ध शरणं गच्छामि; की
हर कोई खुद को दे रहा है धोका
क्षणक्षण जगाकर अपनी तृष्णा!

सुख आहे तोडण्यात आसक्तीच्या श्रृंखला
अन् स्वीकारण्यात एक शाश्वत सत्य
बदल हाच निसर्गाचा धर्म...
पण आपण घेतले त्रिशरण

जीवन राग-द्वेष, काल-उद्याने भरलेला श्वास
अनासक्त कॉज अन् इफेक्ट पाहत
अत् दीप भव् म्हणत
व्हावं प्रत्येकानं एक द्वीप, अन् मग दीपही...

भंग ज्ञानाच्या अनुभवातून प्रज्ञेपर्यंत
अनित्याचा पाठ घेत
विझवावी युद्धे अन् हिंसा चित्तातून

बामियानमध्ये
महाकाय मूर्तींचा भंग पाहिला जरी
शेकडो कपारीत भग्न झालेल्या कल्पमूर्ती
कोरतात मनामनावर चीरकालीन धम्म पुन्हापुन्हा...

बुद्धाच्या आधीही होऊन गेले अनेक बुद्ध अन्
पुढेही होईल साजरी बुद्ध आणि भीमजयंती
त्यातून घ्यावा कोणता बुद्ध अन् बाबासाहेब किती?

व्हावं दीप अन् ओळखावे दुःख जगाचे
पंचशील अन् अष्टांगिक मार्गाने
जगत 'भवतु सब्ब मंगलम'चा अर्थ
करत श्वासाच्या संवेदनेतून अहंकाराचा संहार
जोडावा रोज एक नवा माणूस
करुणा, मैत्री अन् शांतीचा दूत...

निवडावा भोवतालचा 'मार' नष्ट करणारा महामानव
त्यात असावा बहुजनहिताय, बहुजनसुखाय म्हणणारा
एक बुद्ध अन् एक बाबासाहेब
एक महात्मा अन् एक शाहू
तशीच असावी एक सावित्री अन् एक रमाई...
तशीच असावी एक सावित्री अन् एक रमाई...

**– प्रा. नागार्जुन वाडेकर,** नाशिक

# शरण बुद्धाला आलो

विश्व तारण्या महान मानव बुद्ध आले जन्मा
निसर्गाच्या दाही दिशी भरला सुगंधाचा वारा
शरण बुद्धाला आलो
शरण धम्माला आलो
शरण संघाला आलो

राजमहाली होती धनसंपत्ती अन् अफाट पैसा
पण रमले नाही मन या भोगविलासी विश्वा
शरण बुद्धाला आलो
शरण धम्माला आलो
शरण संघाला आलो

मानवी मनाला दु:ख होते उगम कुठून
दु:खाचा निरोध शोधण्या निघाले
बुद्ध नगरीतून
शरण बुद्धाला आलो
शरण धम्माला आलो
शरण संघाला आलो

तथागतांनी विश्वात पदोपदी घेतले मार्गदर्शन
पण कुठेच नाही त्यांचे झाले समाधान
शरण बुद्धाला आलो
शरण धम्माला आलो
शरण संघाला आलो



स्वत:चा मार्ग स्वत: शोधिला
दु:खाचा निरोध करण्याला
बोधीवृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली वैशाखी पौर्णिमेला
शरण बुद्धाला आलो
शरण धम्माला आलो
शरण संघाला आलो

सत्याचा उपदेश करण्या निघाले तथागत भगवान
गौतम बुद्ध
सर्व प्राणीमात्रांचे त्यांच्या उपदेशाने झाले मन शुद्ध
शरण बुद्धाला आलो
शरण धम्माला आलो
शरण संघाला आलो

तथागतांनी उपदेश केला शिष्य आनंदाला
तुम्हा सांगतो खरा सद्धम्म समजला या आनंदाला
शरण बुद्धाला आलो
शरण धम्माला आलो
शरण संघाला आलो

जगाला तारणारा एकच धम्म, तो आहे बौद्ध धम्म
लागू नका रे इतरांच्या नादी नाही तर होणार नतभ्रष्ट
शरण बुद्धाला आलो
शरण धम्माला आलो
शरण संघाला आलो

**– प्रा. डॉ. आनंद रत्नाकर अहिरे,**
नाशिक

---

# बुद्ध करूणासागरा


सम्यक ज्ञानाने तुझ्या
दिपवले धरा, अंबरा
'अत् दीप्' व्हा म्हणे
तू बुद्ध करूणा सागरा...

दिले विज्ञान जीवनाचे
प्रज्ञा शील करूणा...
मूळ दु:खाचे शोधले
क्रोध, तृष्णा, वासना...
अष्टांग मार्ग देऊनी
नाकारले तू संगरा...
'अत् दीप्' व्हा म्हणे
तू बुद्ध करूणा सागरा...

ज्ञानेंद्रियांना जे कळते
ते जीवनाचे सत्य आहे
वाटते शाश्वत जे जे
ते सारे अनित्य आहे
सिद्धांत अनित्यतेचा
बुद्धाचा ठरला खरा...
'अत् दीप्' व्हा म्हणे
तू बुद्ध करूणा सागरा...

अंधारातून प्रकाशाचा
धम्म दु:खमुक्तीचा
स्वातंत्र्य, समता, बंधुता
तू शास्त्रज्ञ नितीशास्त्राचा
तूच पहिला तोडणारा
विषमतेचा पिंजरा...
'अत् दीप्' व्हा म्हणे
तू बुद्ध करूणा सागरा...

**– प्रा. निशांत गुरू**



# त्रिवार वंदन तथागता

करूणेचा अथांग सागर तू
विश्वशांतीचा वाटसरू तू
साऱ्या विश्वाचा मार्गदाता तू..
दाखवलास आम्हा शांतीचा महामार्ग तू
दिलेस आम्हा 'प्रज्ञा-शील-करूणा' तू..
सांगितलेस तृष्णा दु:खाचे कारण तू..
हे तथागता आम्हास बळ दे
या शांतीच्या मार्गाने जाण्यास तू..
जगही जिंकता येते प्रेमाने
युद्धाने नव्हे हा मंत्र दिलास तू..
अनित्य हेच असते नित्य
हीच सम्यक दृष्टी दिलीस तू..

पंचशीलाचे पालन करूनि
होऊ शकतो आपण मानव
हा धडा आम्हा दिलास तू..
'अत् दीप् भव्' व्हा
'स्वयंप्रकाशित' व्हा
हा यशाचा मार्ग दाखवलास तू
हा यशाचा मार्ग दाखवलास तू..
त्रिवार वंदन तथागता तुला
त्रिवार वंदन तुला तथागता...

**– करूणा वाडेकर,** नाशिक

पाक्षिक

स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायासाठी

# द पीपल्स पोस्ट

## वार्षिक वर्गणीदारांना

२०%

## सवलत!

देश आणि राज्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक घटनांचा वेध घेणारे निपक्षः निर्भीड पाक्षिक

**हो, मी "द पीपल्स पोस्ट" चा वर्गणीदार बनू इच्छितो!**

खाली आपल्या आवडीच्या ऑफरवर निषाण लावून वाचक-वर्गणीदारचा फॉर्म भरून खालील पत्त्यावर पाठवावा

सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

| टिक करा | अवधि | एकूण अंक | कव्हर किंमत (रू.) | आपल्याला द्यावे लागतील (रू.) | |
|---|---|---|---|---|---|
| ☐ | १ वर्ष | २४ | ९६० | ८०० | |
| ☐ | ६ महिने | १२ | ४८० | ४०० | |
| ☐ | ३ महिने | ६ | २४० | २०० | |

(वार्षिक विशेषांक – ४) / (६ महिने – २)

चेक किंवा डीडी ने पेमेंट

मी 'द पीपल्स पोस्ट' च्या नावाने पाठवत आहे. ---------------------- दिनांक -------- (बँकेचे नाव) ----------------

चेक/डीडी क्र. ---------------------.

किंवा माझ्या क्रेडीट कार्ड ने वसूल करा ☐ MasterCard ☐ VISA ☐ AMERICAN EXPRESS कार्ड नं. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

कार्डधारकाचे नाव : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ कार्ड एक्सपायरी दिनांक : ---- महिना---- वर्ष-----

कार्डधारकाची स्वाक्षरी : ------------------------------ जन्म तारीख : ---------- दिवस----- महिना------ वर्ष-----

नाव : ------------------------------------------------ पत्ता : ------------------------------

------------------------------------------------ शहर : ----------------------------------------

राज्य : ------------------------ पिन कोड : ------------------- फोन नं. (घर) : ---------------------------

मो. नं. : ----------------------- इ-मेल : ---------------------------------------------------

आपण या माध्यमांद्वारेही सबस्क्राईब करू शकता

WhatsApp व्हॉट्स अप क्रं. ८८८८५४१८२२ किंवा ७३५००९१५६९ क्र. वर फोन करा:

इ-मेल करा thepeoplespost2014@gmail.com

लॉग ऑन करा peoplespost.in

कृपया लक्ष द्या : ही ऑफर मर्यादीत कालावधीसाठी आहे. द पीपल्स पोस्ट यांच्याकडे ह्या ऑफरशी संबंधीत कुठल्याही नियम व अटींना कमी करणे किंवा वाढवण्याचे अधिकार आरक्षित आहेत.

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2022-2024
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

With Best Compliments




Sos. Agrotech Pvt.Ltd

